अध्यात्म २४

गीता - ज्ञानेश्वरी

२४ रहस्य

३५ [illegible]
स्वल्पमत
अध्यात्म ४
ता. ... ...

गीता-ज्ञानेश्वरी रहस्य.

साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र । परि संसार जिणे तें शस्त्र ।
आत्मा आवतरवी ते मंत्र । अक्षरें इये । ज्ञानेश्वर.

असल्या अनुपमेय शास्त्रांतील अर्थरसस्वाद आबालवृद्ध स्त्रीपुरुष जनांच्या जिव्हाग्रीं अक्षरमंत्राच्या बलानें सहजगतीनें जाऊन पोचावा याच केवळ हेतूनें **श्रीज्ञानेश्वर** महाराजांची ही अल्पशी सेवा केली आहे: ही अशा प्रकारची अल्प सेवा करण्याचा अंतःकरणांतील फारा दिवसांचा हेतु होता, परंतु तो सिद्धीस जाण्यास मध्यंतरी अनेक प्रकारच्या अडचणी आल्या-किंबहुना श्रीज्ञानेश्वर भक्त कोल्हापूरचे वकील रा० रा० भावे यांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथावर केलेली " अर्थचंद्रिका " ही प्रसिद्ध होऊन, इच्यापासून आपल्या कार्यास थोडें साह्य मिळायचें होतें, असेंच शुद्धांतःकरणानें ह्मटलें तरी चालेल. या रहस्यांत पहिल्या ९ अध्यायांतील वेंचे घेतले आहेत, आणि प्रत्येक पानावर डाव्या बाजूला मूळ ज्ञानेश्वरींतील ओंवी दिली असून उजव्या बाजूवर साधता आला तितका अर्थसंबंध राखून प्रस्तुत पद्धतीला रुचेल अशा प्रकारची भाषारचना करण्याचा यत्न केला आहे. मूळ ग्रंथ अत्यंत पवित्र आणि महाप्रासादिक-तशांतून ६०० वर्षांच्या जुन्या भाषेंत लिहिलेला, तथापि या सारस्वतांतील शब्दसौंदर्य, अर्थगांभीर्य, दृष्टांत शैली, आणि विषयविवेचन यांजविषयीं विचार करीत बसलें असतां, मन कांहीं वेळ चकित होऊन कांहीं एक प्रकारचा चित्तावर अनुग्रह झाल्यावांचून रहात नाहीं; अथवा अति उत्तम प्रकारचा व बोलून दाखिवता न येण्यासारखा संस्कार मनावर घडतो. ह्या अनुभवाच्या आणि पदोपदीं अनुभव देणाऱ्या गोष्टी आहेत. असो. रहस्यानें थोडक्यांत कां होईना; परंतु महदलाभ होणारा आहे. या रहस्यांतील भाषा सरळ आणि पुस्तकी भाषेच्या धर्तीवर असल्यानें मागचा पुढचा संबंध लवकर लक्षांत येण्यास अडचण पडणार नाहीं. तेव्हां या कारणानें या रहस्यांतील भाषारचना क्वचित स्थलें सोडून अर्थचंद्रिकेहून भिन्न असणारच, व बऱ्याचठिकाणीं या रहस्यांत व अर्थचंद्रिकेंत अर्थभेदही दिसण्याचा संभव आहे. व कैक ठिकाणीं रहस्य व अर्थचंद्रिका यांत दिलेल्या अर्थांहूनही कोणकोणाचा अर्थ अगदीं भिन्न होण्याचा संभव आहे. रहस्यकाराची येवढीच विनंती आहे, कीं हें रहस्य लक्षपूर्वक वाचून अर्थांत ज्या ज्या ठिकाणीं कोणाला भिन्नता वाटेल, अथवा अमुक ठिकाणचा अर्थ चुकीचा आहे असें कोणाला वाटेल, तर त्यानें कृपा करून रहस्यकारास कळविण्याची मेहेरबानी करावी. ह्या रहस्याला मूळ येथील जगदीश्वर छापखान्यांत छापलेल्या "ज्ञानेश्वरी" चें धरलें आहे. ह्या ग्रंथाच्या सेवनानें भिक्षापात्र हातीं येतें अशी कुटीलं लोकांनीं कुई पसरून दिली आहे, ती निःसंशय खोटी असून या ग्रंथाच्या नित्य सेवेनें अवतरणांत दर्शित झाल्याप्रमाणें आपलें खरें स्वरूप आपल्या नजरेपुढें दिसूं लागतें इतकेंच नाहीं; परंतु खरें स्वातंत्र्य आणि आपल्या आंगांतील प्रभाव त्याला जाणतां येतो. याची साक्ष ज्या राजपुत्राला भगवान् श्रीकृष्णांनीं हें शास्त्र प्रथम सांगितलें-त्या अर्जुनाचीच बस्स आहे.

मिती वैशाख शुद्ध. २
शके १८१८

नारायण हरि भागवत.
मुंबई-अनंतऋषीची वाडी-मार्केट पोस्ट.

६८
१८९६

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ७
ठाणे सन १८९

श्री
गीता-ज्ञानेश्वरी-रहस्य.

दुर्योधन आदिकरून आपले १०१ पुत्र कौरव आणि बंधुपुत्र पांडव ५ यांच्यांत कलह उत्पन्न होऊन आज जे दोन्ही पक्ष आपापल्या जय्यत तयारीनें कुरुक्षेत्रांत रणभूमीवर एकमेकांचे प्राण घेण्यास उद्युक्त झाले आहेत, त्यांत उभयतांच्या तयारीकडे पाहून कौरवांना यश येईल असें आपलें अनुमान सांगून धृतराष्ट्र राजानें, तुझें कसें काय अनुमान आहे, असा संजयास प्रश्न केला. त्या प्रश्नावर संजयानें उत्तर दिलें:-

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

महाराज, दुसरी तिसरी कांहीं गोष्ट मला कळत नाहीं--पण इतकी गोष्ट खरी आहे, कीं आयुष्याबरोबर जिवंतपण, चंद्राबरोबर चांदणें, श्रीशंकरासन्निध पार्वती, संतांच्या बरोबर विवेक, दयेबरोबर धर्म, धर्मांबरोबर सुखप्राप्ती, सुखप्राप्तीबरोबर पुरुषोत्तम (ईश्वरलाभ), गुरुबरोबर ज्ञान, ज्ञानाबरोबर आत्मदर्शन, आणि आत्मदर्शना बरोबर समाधान, हे प्रकार जसे एकमेकांना धरून आहेत, त्याप्रमाणें निजांगानेंच विजयरूप श्रीकृष्ण ज्या पक्षाचा साह्यकारी आहे, त्याच पक्षाला जय हा ठेवलेला आहे-असें माझें मत आहे असें संजयानें धृतराष्ट्र राजास सांगितलें.

यया बोला संजयो ह्मणे । जी येरयेरांचें मी नेणें ।
परि आयुष्य तेथें जिणें। हें फुडें कीं गा॥१६३२
चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथें अंबिका ।
संत तेथें विवेका । असणें कीं जी ॥ १६३३ ॥
दया तेथें धर्म । धर्म तेथें सुखागम ।
सुखीं पुरुषोत्तम । असे जैसा ॥ १६३५ ॥
गुरु तेथें ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन ।
दर्शनीं समाधान । आथी जैसें ॥ १६३७ ॥
कृष्ण विजयस्वरूप निजांगें ।
तो राहिला असे जेणें भागें ।
तैं जय लाग वेगें । तेथेंचि आहे ॥ १६४१ ॥

हे विश्वात्मक देवा, हा जो मी वाग्यज्ञ केला-गीतेवर ज्ञानेश्वरी नांवाची टीका केली-त्या यज्ञानें संतोष पावून आपण मला असा प्रसाद द्या, कीं खळ (दुर्बुद्धि) जे आहेत, त्यांची वक्रदृष्टी (दुष्टबुद्धि) नाहींशी होऊन त्यांना सत्कर्माचरणाची रती ह्मणजे अभिरुची उत्पन्न व्हावी, आणि त्या योगानें परस्पर जीवांची एकमेकांशीं मैत्री जमावी; दुरित ह्मणजे पापरूपी जो अंधकार, त्याचा नाश होऊन स्वधर्मरूपी सूर्याचा प्रकाश विश्वांत व्हावा, प्राणीमात्र ह्मणून जी जी कांहीं इच्छा करील, ती ती परिपूर्ण व्हावी; सदासर्वकाळ जगतांचें कल्याण इच्छिणारे भाग्यवान असे ईश्वरनिष्ठांचे समुदायच्या समुदाय निरंतर प्रा

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १७९४ ॥
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो ।
मैत्र जीवाचें ॥ १७९५ ॥
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो ।
प्राणिजात ॥ १७९६ ॥
वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तया
भूतां ॥ १७९७ ॥ अ० १८

चलां कल्पतरूचे अरव । चेतनां चिंताम-
णीचे गांव । बोलते जे अर्णव ।
पीयूषाचे ॥ १७९८ ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥१७९९॥

क्षीरसिंधू परिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं ।
नेणो कैं श्रीत्रिपुरारीं । सांगितलें जें ॥ १७९२॥
तें क्षीरकल्लोळाआंत । मकरोदरीं गुप्त ।
होता तयाचा हात । पैठें जाले ॥ १७९३ ॥
तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा
चौरंगीं । भेटला कीं तो सर्वांगीं ।
संपूर्ण जाला ॥ १७९४ ॥
मग समाधि अव्यत्यया । भोगावी वास-
ना यया । ते मुद्रा श्रीगोरक्षराया ।
दिधली मीनीं ॥ १७९५ ॥
तेणें योगाब्जिनी सरोवर । विषय वि-
ध्वंसैकवीर । तियेपदीं कां सर्वेश्वर ।
अभिषेकिले ॥ १७९६ ॥
मग तिहींते शांभव । अद्वयानंद वैभव ।
संपादिलें सप्रभव । श्रीगैणीनाथा ॥ १७९७ ॥
तेणें कळिकळित भूतां । आला देखोनि
निरुता । ते आज्ञा श्रीनिवृत्तीनाथा ।
दिधली ऐसी ॥ १७९८॥
ना आदि गुरु शंकरा-। लागोनि शिष्य
परंपरा । बोधाचा हा संसरा । जाला
जो आमुते ॥ १७९९ ॥
तो हा तू घेऊनि आंघवा । कळी गिळि-
तयां जीवां । सर्व प्रकारीं धांवा ।
करीं पां वेगीं ॥ १७९० ॥ अ. १८
तया गीतार्थाची थोरी । स्वये शंभु विवरी ।
जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनी ॥ ७०॥
तेथ हर म्हणे नेणिजे । देवी जैसें
कां स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे ।
गीतातत्त्व ॥ ७१ ॥ अ० १

मात्रास भेटावेत; आणि जसें कांहीं कोव्यावधि चालते कल्पवृक्षच, अथवा जिवंत चिंतामणीचे गांवच, किंवा अमृताचे जसे कांहीं समुद्रच, अथवा कलंकरहित जसा चंद्र, किंवा तापरहित जसा सूर्य, असे जे संत, ते सर्वांचे सोयरे म्हणजे आप्तच होवोत.

क्षीरसिंधूच्या संनिद्धभागीं श्रीशंकरांनीं पार्वतीच्या कानांत ज्यावेळीं या अध्यात्मविद्येचा उपदेश केला, त्यावेळीं क्षीरसमुद्राच्या लाटांत मकरोदरामध्यें मत्स्येंद्रनाथ गुप्तपणानें होते, त्यांना ही विद्या प्राप्त झाली. हे मत्स्येंद्रनाथ सप्तशृंग पर्वतावर येऊन हातपाय तुटून पडलेल्या चौरंगीनाथास भेटतांच तो संपूर्णावयव झाला. नंतर गोरक्षनाथानें समाधिसुख भोगावें अशी मत्स्येंद्रनाथास इच्छा झाल्याकारणानें, मत्स्येंद्रनाथांनीं गोरक्षनाथास या अध्यात्मविद्येची मुद्रा-अर्थात् दीक्षा दिली, आणि योगरूप कमळिणीच्या सरोवरांतील विषयविध्वंसैक अशा सर्वेश्वर पदावर मत्स्येंद्रनाथांनीं गोरक्षनाथास पट्टाभिषेक केला. त्या शांभवी—अर्थात् अध्यात्मविद्येचें अद्वयानंदवैभव गहीनीनाथांनीं (मत्स्येंद्रनाथापासून) सप्रभव संपादन करून कलिग्रस्त जीवांचा उद्धार करण्याकरितां, गहीनीनाथांनीं श्रीनिवृत्तिनाथास अशी आज्ञा केली, कीं आदिगुरू श्रीशंकरापासून शिष्यपरंपरेनें जो बोध-अर्थात् अध्यात्मज्ञानाचा विस्तार आमच्या पर्यंत येऊन पोंचला आहे, त्या बोधानें कलिग्रस्त जीवांचे सर्व प्रकारें (निवृत्तीनाथा,) तूं रक्षण कर.—पुढें निवृत्तीनाथांनीं ज्ञानेश्वर महाराजांस उपदेश केल्यावर ज्ञानेश्वर महाराजांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला आहे.—

जगद्गुरू श्रीशंकर गीतार्थाच्या थोरवीचें वर्णन करूं लागले असतां एकाएकीं चमत्कार वाटून असा गीतार्थ तरी काय आहे, या आशयाचा पार्वतीनें प्रश्न केल्यावरून श्रीशंकर म्हणाले—हे देवी, तुला नित्य नवी कळा प्राप्त होत असल्यानें तुझ्या स्वरूपाचें ठाम वर्णन

हा वेदार्थ सागर । जया निद्रिताचा घोर ।
तो स्वयें श्रीसर्वेश्वर । प्रत्यक्ष अनुवादला ॥७२॥

जसें करतां येत नाहीं, त्याप्रमाणें जों जों विचार करावा, तों तों या गीतातत्त्वांत नित्य कांहीं तरी नूतनपणाच दिसत असतो. कारण ज्याच्या निद्रेच्या घोरांत वेदार्थ सागर उत्पन्न झाला, त्याच सर्वेश्वर श्रीकृष्णानें हें गीतातत्व स्वतः सांगितलें आहे.

जे अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम ।
परम मंगळधाम । अवधारिजो ॥ ४९ ॥
आतां भारतकमळपराग । गीताख्य प्रसंग ।
जो संवादला श्रीरंग । अर्जुनेसी ॥ ५० ॥
नातरी शब्दें ब्रह्माब्धी । मथियला व्यासबुद्धि ।
निवडिलें निरवधि । नवनीत हें ॥ ५१ ॥
मग ज्ञानाग्नी संपर्कें । कडसिलें विवेकें ।
पद आलें परिपाकें । अमोदासी ॥ ५२ ॥
जें अपेक्षिजे विरक्तीं । सदां अनुभविजे संतीं ।
सोहंभावें पारंगती । रमिजे जेथ ॥ ५३ ॥
जें आकर्णिजे भक्तीं । जें आदिवंद्य त्रिजगतीं ।
तें भीष्मपर्वीं संगती । सांगिजेल ॥ ५४ ॥
जे भगवद्गीता म्हणिजे । जे ब्रह्मेशानीं प्रशंसिजे
जे सनकादिकीं सेविजे । आदरेसीं ॥ ५५ ॥
जैसें शारदीचिये चंद्रकळे । माजीं
अमृतकण कोंवळे । ते वेंचिती मनें मवाळें ।
चकोरतळगे ॥ ५६ ॥
तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणूनिया ॥ ५७ ॥
हे शब्देवीण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोला आदि झोंबिजे । प्रमेयासी ॥ ५८ ॥
अ० १

याच गीतातत्त्वाचें ज्ञानेश्वर महाराजांनीं पुढें दिल्याप्रमाणें वर्णन केलें आहें:- हें गीतातत्त्व अद्वितीय-उत्तम-अत्यंत पवित्र-निरूपम आणि परम मंगलधाम- म्हणजे मोक्षाचें मुख्याधिष्ठान असें आहे. या गीतातत्त्वाचा उगम भारती युद्धाच्या प्रसंगीं प्रसंगानुरोधानें अर्जुनाला श्रीकृष्णानें उपदेश केला, त्यांत असल्यानें, या गीतातत्त्वाला महाभारतरूपी कमलांतील पराग असें म्हटलें आहे. श्रीव्यासांनीं आपल्या बुद्धिबलानें अपार अशा वेदसागराचें मंथन करून नवनीत काढलें तें हेंच गीतातत्त्व. याच नवनीताला ज्ञानरूपी अग्नीचा कढ मिळतांच आत्मानात्म विचाररूपी स्वाद उत्पन्न झाला. त्या स्वादाची विरक्त इच्छा करतात; साधु त्याच स्वादाचा निरंतर अनुभव घेतात; आणि संसारांतून पार गेलेले ब्रह्मनिष्ठ ब्रह्मैक्यभावानें त्यांतच रममाण होतात—अशी त्रैलोक्यवंद्य कथा, व ज्या कथेंतील तत्त्व केवळ भक्तीनें आकळलें जातें, ती कथा महाभारतांत भीष्मपर्वारंभीं सांगितली आहे. त्या कथेला भगवद्गीता म्हणतात, व याच कथेची ब्रह्मदेव-श्रीशंकर आदिकरून स्तुति करीत असून सनकादिक मुनी अत्यंत आनंदानें या कथेचें सेवन (श्रवण) करतात. चकोर पक्ष्याची पिल्लीं शरद्ऋतूच्या चांदण्यांतलें कोवळे कोवळे अमृतकण मवाळ मनानें जसे वेचून घेतात, त्याप्रमाणें श्रोत्यांनीं या कथेंतील रहस्य (अमृतकण) चित्ताला हळुवारपण (स्थैर्य) आणून अनुभवानें घ्यावे. म्हणजे या कथाश्रवणाचा अनुभव शब्दसंवादावांचून आणि इंद्रियांना कळूं दिल्यावांचून भोगावा—अर्थात् बोल निघण्या पूर्वीच प्रमेयाला झोंबावें.

आतां आत्मप्रभा नित्यनवी । तेचि
करूनि ठाणदिवी । जो इंद्रियांते चोरूनि जेवी ।
तयासीचि फावे ॥ २३ ॥
तेथ श्रवणाचेनि पांगें । वीण श्रोतयां व्हावें लागे ।
हे मनाचेनि निजांगें । भोगीजेगा ॥ २४ ॥

नित्य नूतन उत्पन्न होणाऱ्या तेजोमय ज्ञानप्रकाशाची ठाणदिवी करून इंद्रियांना चोरून—अर्थात् इंद्रियांना न कळूं देतां, जो या—तत्त्वरसाचें—सेवन करील, त्यास हें ज्ञान प्राप्त होणार आहे. या कथेंतील शब्दरस श्रवणेंद्रियांतून घेऊन त्याचें शुद्ध मनानें से-

आहाच बोलाचि वालीफ फेडिजे । आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे । मग सुखेसी सुरवाडिजे । सुखाचिमाजीं ॥ २५ ॥
ऐसें हळुवारपण जरी येईल । तरीच हें उपेगा जाईल । येऱ्हवी आघवी गोष्टी होईल । मुकया बहिरयाची ॥ २६ ॥
परि ते असो आतां आघवें । नलगे श्रोतयांते कडसावें । जे अधिकारिये एथ स्वभावें । निष्काम काम ॥ २७ ॥
जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी । ते वांचुनि येथिची गोडी । नेणती आणिक ॥ २८ ॥
परि ते मनाच्या कानीं ऐकावें । बोल बुद्धिच्या डोळां देखावे । हे सांटोवाटीं घ्यावे । चित्ताचिया ॥ ४९४ ॥
अवधानाचेनि हातें । ने या पां हृदयाआंतौतें । हे रिझवतील आयणीते । सज्जनाचिये ॥ ४९५ ॥
हे स्वहिताते नीचविती । परिणामाते जीवविती । सुखाची वाहती । लाखोली जीवा ॥ ४९६ ॥

अ० ६

वन केलें म्हणजे वरवरच्या बोलाची गवसणी निघून ब्रह्मस्वरूपासीं ऐक्य होतें. तेव्हां अर्थातच आत्मसुखामध्यें सुखानें आत्मसुखभोग प्राप्त होतो. अशा प्रकारें मनाला हळुवारपण (स्थैर्य) येईल, तरच या कथेचा उपयोग होईल—नाहींतर मुक्या बहिऱ्याच्या गोष्टीसारखा या निरूपणाचा प्रकार होईल. अशा प्रकारानें श्रोत्यांना सावध करण्याचें कारण नाहीं. कारण स्वभावेंकरूनच जे निष्काम झाले आहेत, तेच या गीतार्थश्रवणाचे अधिकारी होत. कारण आत्मबोधाच्या गोडीकरतां त्यांना स्वर्ग व संसारसुखाची ओंवाळणी करावी लागते. इतरांचा हा विषय नाहीं.

श्रीकृष्ण म्हणतात—हा विषय मनाला कानाच्या ठिकाणीं आणून ऐकवावा, आणि डोळ्यांच्या ठिकाणीं बुद्धिला आणून हा विषय पहावा, आणि मग चित्ताच्या साह्यालोच्यानें हा विषय घ्यावा व द्यावा; आणि अशा प्रकारें एकाग्रतेनें या विषयाला अंतःकरणांत नेलें असतां सज्जनांना आनंददायक होईल;—म्हणजे अशा प्रकारच्या श्रवणापासून स्वहित नित्य वाढतें, शेवट गोड होतो, आणि सुखाची जिवाला लाखोली होते.

प्रथम अध्यायाचें नांव अर्जुनविषाद असें आहे. यांत अलंकाररूपानें सकल देवतांचें व गुरूचें नमन करून अर्जुनाच्या मनांत युद्धप्रसंगीं विषाद कसा उत्पन्न झाला, त्या स्थितीचें ऐतिहासिक वर्णन दिलें आहे. पांडव पराक्रमी आहेत, आणि ते केव्हांतरी आपल्याजवळ राज्यभाग मागतील, हें वैमनस्य मनांत बाळगून दुर्योधन, कर्ण-शकुनी-दुःशासन वगैरेंच्या साह्यानें, पांडवांचा नाश करण्याविषयीं सदासर्वकाळ विचार करीत असे. कौरवेश्वरानें धर्मादिकरून पांच पांडवांना जाळून टाकण्याच्या इराद्यानें लाक्षागृह तयार करून त्यांत त्यांना कांहीं निमित्यानें रहायला घालून, त्या लाक्षागृहास आग तर लावून दिली; कपट द्युतांत पांडवांस जिंकून त्यांची राज्यलक्ष्मी हरण करून घेतली, आणि द्युतांत जिंकली असें म्हणून पांचालीस (द्रौपदीस) सभेंत आणून तिची विटंबना केली. अखेर बारा वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास करण्यास कौरवेश्वर दुर्योधनानें पांडवांस लावलें. ह्या तेरा वर्षांच्या मुदतींत कौरवांनीं पांडवांचा करवला तितका छळ केला; परंतु तेराही वर्षे वनवास व अज्ञातवास भोगून पांडव परत आले, आणि आपला राज्यभाग कौरवेश्वराजवळ मागू लागले. दुर्योधन राज्यभाग देण्यास अजिबात नाकबूल असल्यानें, अर्धभाग तर राहिला, परंतु एकेकाला एकेक असे पांच गांव पांडवांना देण्याबद्दल शिष्टाई करण्यास भगवान श्रीकृष्ण दुर्योधनराजाकडे गेले, तेव्हां मानी दुर्योधनानें पांच गांव तर काय, परंतु सुईच्या अग्रावर राहण्याइतकादेखील जमिनीचा तुकडा पांडवांस देणार नाहीं, असा दांडगाईचा जबाब दुर्योधनानें भगवंतास दिला. हें उभयकुळांत लढाई उत्पन्न होण्यास मूळ झालें, आणि याच कारणावरून उभय पक्षांकडील वीर आपापल्या पक्षाचें साह्य करण्याकरितां युद्धेच्छेनें मोठ्या जय्यत तयारीनें कुरुक्षेत्रांत समरभूमीवर येऊन उभे राहिले. दुर्योधनानें रणभूमीवर येऊन सेनारचना कशी काय केली आहे, व सबल निर्बल पक्ष कोणता दिसतो, हें पाहून, भीष्माचार्यास सेनाधिपत्य दिलें.

तेव्हां भीष्मांनीं मोठ्या उल्हासानें अद्भुत सिंहनाद केला, आणि लगेच दिव्य शंख वाजिवला. ह्या दोन्ही शंखांचे एकत्र नाद होतांच, दुसऱ्या वीरांनींही भेरी- मांदळ- काहाळा (झांज) भोंगळ(तुतारी) वगैरे रणवाद्यें वाजिवण्यास सुरवात केली. इतक्यांत पांडवसैन्यांत गरुडाच्या बरोबरीनें चालणारे असे चार घोडे ज्या रथास जोडले असून विजयाचें निज सारच, अथवा महातेजाचें भांडारच, अथवा पंखाचा जसा कांहीं मेरू पर्वतच, असा रथ, ज्या रथाचें सारथ्य श्रीवैकुंठाधीशानें पतकरलें असून ध्वजस्तंभावर प्रत्यक्ष शंकराचा अवतार मारुती बसला आहे– त्या रथांतून श्रीकृष्णानीं पांचजन्य नांवाचा शंख वाजविला. त्या नादावरोवर कौरवकुळांतील रणवाद्यांचा भयासूर होत असलेला नाद लोपून गेला! धनुर्धरानें (अर्जुनानें) आपला शंख वाजिवतांच दोन्ही नाद एकत्र झाले, आणि ब्रह्मकटाहाचे शंभर तुकडे होतात कीं काय असें भय उत्पन्न झालें. नंतर भीमसेन- धर्मराज-नकूळ-सहदेव-धृष्टद्युम्न-विराट वगैरे योध्यांनीं आपापले शंख वाजिवले. अशा प्रकारचा रणकल्लोळ एक होऊन गेला आहे, इतक्यांत युद्ध करण्याकरतां जमलेल्या वीरांत मजवरोवर युद्ध करण्यासारखे कोण आहेत, ते वीर एकवेळ मला पाहण्याकरतां रथ सेनेच्या मध्यभागीं ने असें अर्जुनानें श्रीकृष्णास सांगितलें. ह्मणून श्रीकृष्णानें सेनेच्या मध्यभागीं रथ नेऊन उभा केला. तेव्हां अर्जुनानें कौरवपक्षाकडे आपल्यावरोवर युद्ध करण्यास कोण कोण वीर रणामध्यें उभे आहेत, हें न्याहाळून पहाले असतां त्यांत अजोबा भीष्म, परमपूज्य ब्राह्मणश्रेष्ठ गुरू द्रोण, महावीर कर्ण, सगळे कौरवकूळ, शिवाय इतर जवळचे आप्त, सखे, सोयरे व ज्यांनीं पांडवांवरोवर वैर आहे असें ऐकतांच प्राण सोडावे असेही लोक आले हे त्याच्या दृष्टीस पडले, व यांना आपण आतां मारणार आणि असा प्रकार झाल्यावर हजारों स्त्रिया गतभर्तृका होऊन वर्णसंकर होईल, व त्यायोगें महत्पाप आपल्या पदरीं येऊन भगवान श्रीकृष्णाचा आपल्याला अंतराय होईल– या सर्व कल्पना एकसमयावच्छेदें अर्जुनाच्या मनांत येऊन त्याला अत्यंत गहिंवर आला, आणि त्यायोगें राज्यप्राप्ती करून घेण्यापेक्षां वनकंदरीं जाऊन रहावें, अथवा शुद्ध भिक्षा मागून कालक्रमण करावें हें वरें, अशा प्रकारची अर्जुनाच्या मनांत उपरती उत्पन्न झाली, आणि तिजवरोवर मोहानें अथवा कृपालूपणानें अर्जुनाच्या हातचें गांडीवधनुष्य गळून पडलें, आणि त्यावरोवर त्यानें रथाखालीं उडी टाकली. अशा ऐनरणप्रसंगीं अर्जुनाच्या मनांत अनिवार उत्पन्न झालेला मोह घालवून, त्याला वर्णाश्रमधर्मानुसार उचित कर्म करण्याकरितां प्रवृत्त करण्याविषयीं भगवंतांनीं अध्यात्मज्ञानाचा रणभूमीवर उपदेश केला आहे. त्या अध्यात्मज्ञानाचा आवालवृद्धांस व शहाण्यां–मूर्खांस लाभ व्हावा एतदर्थ गीता आणि गीतेसह ज्ञानेश्वरी हे दोन महाप्रासादिक ग्रंथ या भूतलावर अर्जुनाच्यायोगानें प्रत्यक्षानें श्रीव्यास व श्रीज्ञानेश्वर या रूपांनीं अवतीर्ण झाले आहेत. त्या अध्यात्म उपदेशांतील मुख्य मुख्य रहस्याचे मुद्दे दुसऱ्या अध्यायापासून नवव्या अध्यायापर्यंत या भागांत घेतले आहेत. यांतील मुख्य रहस्य मननपूर्वक वाचलें असतां, " हरीचे आह्मी " असे आचारयुक्त स्वधर्मानें आणि निःसिम भक्तीच्या जोरावर ह्मणवून घेतलें, तरच या जगांत आपल्या आंगीं अतुल तेजाचा प्रभाव उत्पन्न होणार आहे, आणि याच अध्यात्मज्ञानाच्या नादीं लागलें असतां, परवशतेचा वीट वाटून धर्म- अर्थ- काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त होऊन इहलोकीं व परलोकीं निश्चयानें सुखप्राप्ती आहे असें वाटणार आहे. असो हा पहिल्या अध्यायांतील ऐतिहासिक भीष्मपर्वांतील पहिला अध्याय संपला. याच्यापुढें दुसऱ्या अध्यायापासून अर्जुनाच्या शंका मनांत घेऊन श्रीकृष्णांनीं अर्जुनास उपदेश करण्यास सुरुवात केली आहे.

ओं नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥
देवा तूचि गणेश । सकळमति प्रकाश ।
म्हणे निवृत्तीदास । अवधारिजो जी ॥ २ ॥
अ० १

महाराज, अनादिसिद्ध जे आपण-ज्याच्या अनादि-सिद्धपणामुळें-वेदांनीं ज्याचें प्रतिपादन केलें आहे, अर्थात् करवेल तितका विचार करून अखेर थकल्या, वर "नेति नेति" असें म्हटलें आहे,-जें अनादिसिद्ध स्वसंवेद्य--अर्थात् स्वस्वरूप जाणणारे अथवा स्वतःस जाणणारे--व जें आत्मरूप म्हणजे स्वरूप अभेदानें चराचरांमध्यें सर्वत्र व्यापून आहे, असे जे देवा तुम्ही-सकळ गुणांचे ईश गणेशदेव, सकलार्थ ज्ञानाविषयीं बुद्धीस प्रकाशविणारे, त्या तुमचा जयजयकार करून मी (ज्ञानदेव) तुम्हांला नमस्कार करतो.

तरी सांग पां अर्जुना । तुजपासूनि स्थिति
या त्रिभुवना । हे अनादि विश्वरचना ।
तें लटकें कायी ॥ ९५ ॥
एथ समर्थ एक आथी । तयापासूनि भूतें होती ।
तरी हें वांयाचि काय बोलती । जगामाजीं॥९६॥
हो कां सांप्रत ऐसें जाहालें । जे हे जन्म
मृत्यु तुवा सृजिलें । आणि नाश पावे
नाशिलें । तुझेनि कायी ॥ ९७ ॥
तू भ्रमलेपणें अहंकृती । यांसी घात न
धरिसी चित्तीं । तरी सांगें कायी हे होती ।
चिरंतन ॥ ९८ ॥
कीं तूं एक वधिता । आणि सकळ
लोक हा मरता । ऐसी भ्रांति झणें चित्ता ।
येवों देसी ॥ ९९ ॥
अनादिसिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें ।
तरी तुवा कां शोचावें । सांगे मज ॥ १०० ॥

देखे विवेकी जे होती । ते दोहींतेंहि
न शोचिती । जे होय जाय हे भ्रांति ।
म्हणउनिया ॥ १०२ ॥
अर्जुना सांगेन ऐक । एथ आम्ही तुम्ही देख ।
आणि हे भूपती अशेख । आदि करूनि ॥१०३॥
नित्यता ऐसेचि असोनि । नातरी निश्चित
क्षया जाऊनि । हे भ्रांति वेगळी करूनि ।
दोन्ही नाहीं ॥ १०४ ॥
हे उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे ।

अर्जुना सांग पाहूं--ही अनादि विश्वरचना लटकी असून या त्रिभुवनाला अस्तित्व तुझ्याच पासून आहे काय ? अथवा--

सर्वसमर्थ परमात्मा एक आहे, आणि त्याच्या पासून सर्व भूतें झालीं असें म्हणतात, तें वायांच तर ? अथवा असेंच झालें म्हणावयाचें तर--जन्ममृत्यु उत्पन्न केलेला आज काय तो तूंच आहेस ! आणि तूंच जर त्यांचा नाश करशील, तरच ते नाश पावणार !

पण कायरे, या भ्रमांत जो तुला अहंकार प्राप्त झाला आहे, त्याच्या योगानें कौरवांचा घात करण्याची गोष्ट तूं मनांत आणली नाहींस, तर ते चिरंजीव होतील नाहीं ?

अथवा--वधकर्ता काय तो तूंच एक, आणि हे तुझ्या शिवाय सकळ लोक मरणारे अशी भ्रांती तुझ्या चित्ताला होत असेल; परंतु अशी भ्रांती होऊं देऊं नकोस. कारण "होत-जात" म्हणजे उत्पन्न होणें आणि लय पावणें हें स्वभावताच अनादिसिद्ध आहे, तर तूं या करतां शोक कां करावास हें मला सांग.

' होय-जाय ' म्हणजे उपजणें आणि लय पावणें हें दोन्हींहि प्रकार भ्रांतिमूलक आहेत; म्हणून या दोन्हींहि गोष्टींचा विचारवंत शोक करीत नाहींत. अर्जुना, आम्ही-तुम्ही आणि हे सर्व भूपति (राजे) आदि-करून हल्लीं आहोंत असेंच निश्चयानें राहूं, किंवा निश्चयानें क्षय (लय) पावूं, अशी होणारी जी भ्रांती आहे, तेवढी नाहींशी केली म्हणजे उपजणें आणि लय हें दोन्हींहि प्रकार खरे नाहींत असें वाटेल. कारण जें उपजतें आणि नाश पावतें तें मायेच्या योगानें भासतें; परंतु तत्त्वतः वस्तु--अर्थात् ब्रह्म म्हणून जें आहे,

येन्हवी तत्त्वता वस्तु जें असे ।
तें अविनाशचि ॥ १०६ ॥
आइके शरीर तरी एक । परि वयसाभेदें अनेक ।
हें प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ॥ १०८ ॥
एथ कौमारत्व दिसे । मग तारुण्यीं तें भ्रंशे ।
परि देहचि न नाशे । एकेकासवें ॥ १०९ ॥
तैसी चैतन्याच्या ठायीं । इये शरीरांतरें
होती जाती पाहीं । ऐसें जाणें तया नाहीं ।
व्यामोह दुःख ॥ ११० ॥
एथ नेणावया हेंचि कारण । जें इंद्रियां
आधीनपण । तिहीं आकळिजे अंतःकरण ।
म्हणऊनि भ्रमे ॥ १११ ॥
इंद्रियें विषय सेविती । तेथ हर्षशोक उपजती ।
ते अंतर आघविती । संगें येणें ॥ ११२ ॥
जया विषयांच्या ठायीं । एकनिष्ठता कहीं नाहीं ।
तेथ दुःख आणि कांहीं । सुखहि दिसे ॥ ११३ ॥
देखे शब्दाची व्याप्ती । निंदा आणि स्तुती ।
तेथ द्वेषाद्वेष उपजती । श्रवणद्वारें ॥ ११४ ॥
मृदु आणि कठीण । हे स्पर्शाचे दोन्ही गुण ।
जे वपुचेनि संगें कारण । संतोष खेदा ॥ ११५ ॥
भ्यासुर आणि सुरेख । हें रूपाचें स्वरूप देख ॥
जें उपजवी सुख दुःख । नेत्रद्वारें ॥ ११६ ॥
सुगंध आणि दुर्गंध । हा परिमळाचा भेद ।
जो घ्राणसंगें विषाद । तोष देता ॥ ११७ ॥
तैसाचि द्विविध रस । उपजवी प्रीती त्रास ।
म्हणूनि हा अपभ्रंश । विषयसंग ॥ ११८ ॥
देखे इंद्रियां आधीन होइजे । तैं शि-
तोष्णातें पाविजे । आणि सुखदुःखीं आकळिजे ।
आपणपे ॥ ११९ ॥
या विषयांवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा
रम्य नाहीं । ऐसा स्वभावचि पाही ।
इंद्रियांचा ॥ १२० ॥
हे विषय तरी कैसे । रोहिणीचें जळ जैसें ।
कां स्वप्नींच्या आभासे । भद्रजाती ॥ १२१ ॥
देखे अनित्य ते यापरी । म्हणऊनि तू अव्हेरीं ।
हा सर्वथा संग न धरीं । धनुर्धरा ॥ १२२ ॥

तें अविनाशीच आहे.—याचें प्रत्यक्ष प्रमाण पहाण्याला शरीराचीच गोष्ट घे.—शरीर एकच असतें, परंतु वयसा भेदानें (वयपरत्वें) त्याला अनेक दशा प्राप्त होतात. पहिल्यानें कौमारत्व दिसतें, परंतु त्याचा तारुण्यदशेंत नाश होतो. (आणि वृद्धपणीं तारुण्यहि नाहींसे होते.) परंतु प्रत्येक अवस्थे बरोबर जसा शरीराचा लय होत नाहीं असें समजतें, तसें चैतन्याच्या ठिकाणीं हीं शरीरांतरें होतात व जातात असें जो समजतो, त्याला व्यामोहदुःख होत नाहीं. अंतःकरणाला विषय आकळून घेत असल्याकारणानें तें भ्रम पावतें. कारण अंतःकरण इंद्रियांच्या आधीन आहे म्हणून चैतन्य अविनाशी आहे असें त्याला कळत नाहीं. इंद्रियें विषयभोग घेत असतां, त्या भोगांत हर्षशोक उत्पन्न होऊन त्यांतच अंतःकरण बुडून जातें, आणि विषयांत तरी सुखच अथवा दुःखच असा एकच प्रकार नसून एकाच विषयांत केव्हां सुख व केव्हां दुःख प्राप्त होतें. शब्द विषयाची व्याप्ती निंदा आणि स्तुति यांत असून त्यापासून श्रवणद्वारें द्वेषाद्वेष उत्पन्न होतात. स्पर्श विषयांत मृदु आणि कठीणपणा हे दोन गुण असून शरीराच्या संबंधानें संतोष व खेद उत्पन्न होतो. रूप विषयांत भ्यासुर आणि सुरेख हे दोन गुण असल्यानें नेत्रद्वारें सुख दुःख उत्पन्न करतात. सुगंध आणि दुर्गंध हे परिमळाचे (गंधाचे) गुण असून ते घ्राणाच्या (नाकाच्या) द्वारें संतोष व त्रास उत्पन्न करतात. त्याच प्रमाणें रसाच्या आंगीं द्विविध (दोन) गुण असल्यानें (रसनेच्या द्वारें) आवड आणि नावड त्यापासून उत्पन्न होते—म्हणून अंतःकरणाला विषयसंग हा नाशास कारण आहे. विचार कर कीं, इंद्रियांच्या आधीन आपण झालों, तरच शीत किंवा उष्ण अथवा सुख-दुःख यांचा अंमल आपल्यावर बसतो. कारण इंद्रियांचा स्वभावच असा कांहीं आहे, कीं त्यांना विषयांवांचून अन्य कांहीं रम्यच नाहीं. परंतु या विषयांची किंमत पहाशील तर शुद्ध मृगजलवत् अथवा स्वप्नांत दिसणाऱ्या हत्तींच्या समुदायासारखी आहे—तेव्हां याजवरून अर्जुना, विषय हे अनित्य आहेत असें समजून तूं त्यांचा अव्हेर कर—सर्वथा संगच धरू नकोस. हे विषय ज्याच्यावर अंमल बसवीत नाहींत, तो सुखदुःखांत लिप्त होत नसून त्याचा गर्भवासहि सरतो.

हे विषय जयाते नाकळिती । तया सुख
दुःखें दोनी न पवती । आणि गर्भवास संगती ।
नाहीं तया ॥ १२३ ॥
तो नित्यरूप पार्था । ओळखावा सर्वथा ।
जो या इंद्रियार्था । नागवेचि ॥ १२४ ॥
या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।
तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ॥ १२५ ॥
सलिली पय जैसें । एक होऊनि मीनलें असे
परि निवडूनि राजहंसें । वेगळें कीजे ॥ १२६ ॥
तैसें विचारितां निरसलें । तें प्रपंच सहजे
सांडवलें । मग तत्त्वतातत्त्व उरलें ।
ज्ञानियांसी ॥ १३१ ॥
म्हणोनि अनित्याच्या ठायीं । तया आ-
स्तिक्य बुद्धि नाहीं । निष्कर्ष दोहींही ।
देखिला असे ॥ १३२ ॥
देखे सारासार विचारिता । भ्रांति ते पाही
असारता । तरी सार ते स्वभावता ।
नित्य जाणें ॥ १३३ ॥
हा लोकत्रयाकार । तो जयाचा विस्तार ।
तेथ नाम-वर्ण-आकार । चिन्ह नाहीं ॥ १३४ ॥
जो सर्वदां सर्वगत । जन्म-क्षयातीत ।
तया केलियाहि घात । कदा नोहे ॥ १३५ ॥
आणि शरीर जात आघवें । हे नाशवंत
स्वभावें । म्हणोनि तुवा जुंझावें । पंडुकुमरा ॥ १३६ ॥
तूं धरूनि देहाभिमानातें । दिठीसूनि शरीरातें ।
मी मारिता हे मरते । म्हणत आहासी ॥ १३७ ॥
तरी अर्जुना तू हे नेणसी । जरी तत्त्वता
विचारिसी । तरी वधिता तू नव्हसी ।
ते वध्य नव्हती ॥ १३८ ॥
तैसे शरीराच्या लोपीं । सर्वथा नाश
नाहीं स्वरूपीं । म्हणऊनि तू हे नारोपी ।
भ्रांति बापा ॥ १४३ ॥
जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे ।
तैसें देहांतराते स्वीकारिजे । चैतन्यनाथें ॥ १४४ ॥
हा अनादि नित्यसिद्ध । निरुपाधि विशुद्ध ।

फार काय सांगू, पार्था, जो या इंद्रिय-अर्थाच्या तडाक्यांत सांपडत नाहीं, अथवा जो इंद्रिय-अर्थांला नागवला गेला, तोच नित्यरूप समजावा.

तत्त्वज्ञ संत जे आहेत, ते उपाधीमध्यें (देहांत) गुप्त असलेलें चैतन्य सर्वभर आहे असें मानतात; परंतु दूध आणि पाणी यांचा मिलाफ झाला असतां, राजहंस जसें दूध आणि पाणि निराळें करून घेतो, त्याप्रमाणें देह आणि चैतन्य यांची तत्त्वज्ञ संत निवड करतात. अशा प्रकारच्या विचारानें प्रपंच मिथ्या ठरल्यावर तत्त्व तेंच ज्ञानसंपन्नाजवळ रहातें. म्हणून अनित्याच्या ठिकाणीं ज्ञान्याची सत्यबुद्धि रहात नाहीं; कारण नित्य व अनित्य या दोन गोष्टींचा त्यानें निर्णय केलेला असतो.

सारासार गोष्टींचा विचार करूं लागलें असतां, भ्रांति असार, आणि स्वभावताच नित्य असणारें तें सार, असें समज. हें त्रैलोक्य ज्याचा विस्तार आहे, त्याला नांव-वर्ण-आकार यांपैकीं कांहींच नाहीं; परंतु जें नित्य (ब्रह्म) सर्वव्यापी व जन्ममृत्युरहित आहे, त्याचा नाश करूं म्हटल्यानें कधींहि होत नाहीं. तथापि अणुरेणुपासून तों थेट ब्रह्मदेवापर्यंत-शरीरी जे आहेत, ते स्वभावताच नाशवंत आहेत; म्हणून पंडुकुमरा अर्जुना, तूं युद्ध करावेंस हें रास्त आहे. परंतु अर्जुना, तूं शरीरावर दृष्टी ठेवून केवळ देहाभिमानानें मी काय तो मारणारा व हे सर्व मरणारे आहेत असें म्हणतोस, पण असें म्हणण्यांत तूं अगदीं अज्ञानी आहेस. कारण तत्त्वतः जर विचार करशील, तर तूं दुसऱ्याचा वध करणारा नाहींस, व दुसरे तुझे वध्यहि नाहींत. कां म्हणशील, तर शरीराच्या नाशावरोबर स्वरूपाचा (आत्म्याचा) नाश होत नाहीं. म्हणून ही भ्रांति देखील तूं आपल्या मनांत येऊं देऊं नकोस. नवें वस्त्र परिधान करण्याच्या हेतूनें जसें जुने वस्त्र टाकून देतात, त्याप्रमाणें चैतन्यनाथ (आत्मा) दुसरा देह धारण करण्याकरतां पहिला देह सोडतो. हा चैतन्यनाथ कसा आहे म्हणशील, तर हा अनादि म्हणजे उत्पत्तिरहित असून नित्यसिद्ध उपाधिरहित

ह्मणऊनि शस्त्रादिकीं छेद। न घडे यया॥१४५॥
हा प्रळयोदकें नाम्लवे। हा अग्नीदाह न संभवे।
एथ महाशोष न प्रभवे। मारुताचा ॥ १४६ ॥
अर्जुना हा नित्य। अचळ हा शाश्वत।
सर्वत्र सदोदित। परिपूर्ण हा ॥ १४७ ॥
हा तर्काचिये दिठी। गोचर नोहे किरिटी।
ध्यान याचिये भेटी। उत्कंठा वाहे ॥ १४८ ॥
हा सदा दुर्लभ मना। आप नोहे साधना।
निःसीम हा अर्जुना। पुरुषोत्तम ॥ १४९ ॥
हा गुणत्रयारहित। अनादि अविकृत।
व्यक्तिसी अतीत। सर्वरूप ॥ १५० ॥
अर्जुना ऐसा हा जाणावा। सकळात्मक
देखावा। मग सहजें शोक आघवा।
हरेल तुझा ॥ १५१ ॥
जे आदि-स्थिती-अंत। हा निरंतर असे नित्य।
जैसा प्रवाह अनुस्यूत। गंगाजळाचा ॥ १५३ ॥
तें आदि नाहीं खंडलें। समुद्रीं तरी असे मिनलें।
आणि जातांचि मध्यें उरलें। दिसे जैसें ॥१५४॥
इये तिन्ही तयापरी। सरसीच सदा अवधारी।
भूतांसी कवणीं अवसरीं। ठाकती ना ॥१५५॥
तरी येथें कांहीं। तुज शोकासी कारण नाहीं।
हे जन्ममृत्यु पाही। अपरिहर ॥ १५८ ॥
उपजे तें नाशे। नाशलें पुनरपि दिसे।
हें घटिकायंत्र तैसें। परिभ्रमेगा ॥ १५९ ॥

व विशेषेंकरून शुद्ध असल्यानें शस्त्रादिकांनीं याचा छेद होत नाहीं. प्रळयकाळच्या पाण्यानें हा बुडत नसून अग्नीपासून याला दाह होत नाहीं. फार काय सांगावें–शोषण करून घेणाऱ्या प्रलयवाऱ्याचा प्रभावहि याजपुढें चालत नाहीं. त्या योगानें हा कसा आहे ह्मणून ह्मणशील, तर नित्य–अचळ–शाश्वत–सर्वत्र ठिकाणीं सदोदित आणि परिपूर्ण असा आहे. अर्जुना, तर्काच्या दृष्टीनें हा दृष्टीस पडत नाहीं, ध्यान याच्या भेटीला उत्कंठित झालेलें असतें, मनालाहि हा दुर्लभच असून साधनांनाहि हा असाध्यच आहे. असा हा सीमारहित पुरुषोत्तम आहे. हा पुरुषोत्तम सत्व-रज-तम या त्रिगुणांनीं रहित आहे. हा अनादि–(स्वयमेव)–अविकृत–(विकार न पावणारा)–अर्थात् व्यक्ति अतीत ह्मणजे देहधर्मी नसून सर्वरूप–(स्वरूप कोठें नाहीं असें नाहीं)–असा आहे. अर्जुना, अशा प्रकारचें पुरुषोत्तमाचें सर्वव्यापकत्व तूं समजून घेतलेंस, ह्मणजे सहजच तुझा शोक नाहींसा होईल.–इतकी व्यापकदृष्टी तुझी झाली नाहीं, तथापिहि तुला शोक करण्याचें कारण नाहीं. कारण–गंगाजळाच्या अखंड प्रवाहाप्रमाणें आदि (उत्पत्ती) स्थिति (पालन) आणि अंत (संहार) या तिन्हीकाळीं हा नित्य पुरुषोत्तम निरंतर असतो. उत्पत्तीस्थळीं गंगाजल असतें, प्रवाह जातांना वाटेंत असतें, आणि समुद्रांत मिळतेवेळींहि गंगाजल असतेंच. त्याप्रमाणें उत्पत्ती-स्थिती व संहार या तिहीकाळीं भूतांना (प्राणिमात्रांना) सोडून चैतन्यनाथ जात नाहीं. अथवा जन्ममृत्यू हे अपरिहार्य आहेत असा जरी तूं विचार करशील, तरी तुला शोक करण्याचें कारण नाहीं. कारण उपजतें तें नाश पावतें, आणि नाश पावलेलें पुन्हां दिसूं लागतें. ह्मणजे जन्ममृत्यूचा खेळ हें जसें कांहीं घटकायंत्रच आहे, अथवा रहाटगाडग्यासारखा प्रकार आहे.

जियें समस्तें इयें भूतें। जन्माआदी अमूतें।
मग पातलीं व्यक्तीते। जन्मलेया ॥ १६४ ॥
तिये क्षयासी जेथ जाती। तेथ निभ्रांत
आनें नव्हती। देखे पूर्व स्थितीच येती।
आपुलिये ॥ १६५ ॥
येरमध्यें जें प्रतिभासे। तें निद्रिता स्वप्न जैसें।
तैसा आकार हा मायावशें। सत्स्वरूपीं ॥ १६६॥

हीं सर्व भूतें (प्राणीमात्र) जन्मापूर्वी (दिसूं लागण्यापूर्वी) गुप्त असून उत्पन्न झाल्यावर दिसूं लागतात. परंतु ज्यावेळीं त्यांचा नाश होतो, त्यावेळीं तीं पूर्वस्थितीसच लय पावतात–ह्मणजे गुप्तपणांत जातात. तेव्हां उत्पत्ती आणि लय यांच्या दर्म्यान जी स्थिति दिसते, ती निद्रावश झालेल्याच्या स्वप्नासारखी असते–ह्मणजे दृश्यस्थिती ही सत्स्वरूपाच्या मायेचा प्रकार आहे, ह्मणून दृश्य स्थितींत सत्यत्व नाहीं–

तैसें आदीचि जें नाहीं । तयालागीं तूं
रुदसी कायी । तूं अवीट तें पाहीं ।
चैतन्य एक ॥ १६९ ॥
जें सर्वत्र सर्वहि देहीं । जयाकरितांहिघात नाहीं ।
तें विश्वात्मक तूं पाहीं । चैतन्य एक ॥ १७७ ॥
इयाचेनि स्वभावें । हे होत जात आघवें ।
तरी सांग काय शोचावें । एथ तुवा ॥ १७८ ॥
तरी स्वधर्म एक आहे । तो सर्वथा त्याज्य नोहे ।
मग तरिजेल काय पाहे । कृपाळुपणें ॥ १८२ ॥
तैसें आनींआन करितां । नाश होईल हिता ।
म्हणऊनि तूं आतां । सावध होईं ॥ १८४ ॥
वांयाचि व्याकूळ कायी । आपुला निज-
धर्म पाही । जो आचरितां बाध नाहीं ।
कवणे काळीं ॥ १८६ ॥
आपण या उचिता । स्वधर्मे रहाटतां ।
जें पावे तें निवांता । साहोनि जावें ॥ २२८ ॥

तर अर्जुना, तूं त्या करतां कां रडतोस ? अविनाशी असें जें त्यांत चैतन्य विश्वात्मक आहे, तें तूं पहा म्हणजे झालें. हें चैतन्य सर्वत्र व सर्व देहांत असून ज्याचा करूं लागलें असतांहि घात होत नाहीं, अशा विश्वात्मक चैतन्यावर तूं लक्ष दे. उत्पन्न होणें आणि नाहींसें होणें हें या चैतन्याचें स्वभावेंकरूनच आहे, तर मग तूं शोक कां करावास हें सांग पाहू ?- हा एक विचार राहिला-परंतु कशाहि प्रसंगीं आपला जो स्वधर्म आहे त्याचा सर्वथा त्याग करतां येत नाहीं. त्याचा त्याग केल्यावर मग या कृपाळूपणानें तूं तरशील का याचा विचार कर. कारण दुसऱ्यानें दुसऱ्याच्या धर्माचा स्वीकार केला असतां त्याजयासून त्याचा नाश होतो. याजकरतां तूं आतांच सावध हो आणि व्यर्थ व्याकूळ न होतां स्वधर्मावर लक्ष दे. कारण स्वधर्माचरण केलें असतां, त्यापासून कधींहि बाधा (पाप) होत नाहीं. आपण स्वधर्मेंकरून आचरण करीत असतां जें जें प्राप्त होईल, त्याचा शांतपणानें स्वीकार करावा-(म्हणजे झालें.)-

जया बुद्धियुक्ता । जालिया पार्था ।
कर्मबंध सर्वथा । बाधू न पवे ॥ २३१ ॥
जैसे वज्रकवच लेइजे । मग शस्त्रांचा
वर्षाव साहिजे । परि जैतेसी उरिजे ।
अचुंबित ॥ २३२ ॥
तैसें अहिक तरी न नशे । आणि मोक्ष
तो उरला असे । जेथ पूर्वानुक्रम दिसे ।
चोखाळत ॥ २३३ ॥
कर्माधारें राहाटिजे । परि कर्मफळा न
निरिक्षिजे । जैसा मंत्रज्ञ न बधिजे ।
भूतबाधा ॥ २३४ ॥
तियापरी जे सुबुद्धि । आपु जालिया निरवधि ।
हा असतांचि उपाधी । आकळूं न सके ॥ २३५
जेथ न संचरे पुण्यपाप । जे सूक्ष्म अति निष्कंप ।
गुणत्रयादि लेप । न लगति जेथ ॥ २३६ ॥
अर्जुना तें पुण्यवशें । जरी अल्पचि
हृदयीं बुद्धि प्रकाशे । तरी अशेषहि नाशे ।
संसारभय ॥ २३७ ॥

—येथपर्यंत श्रीकृष्णानीं अर्जुनाला सांख्यस्थिती (आत्मानात्मविचाराची सरणी) सांगितली. याच्या पुढें बुद्धियोग सांगण्यास सुरवात केली आहे.—बुद्धियुक्त झालें असतां, पार्था, कर्मांची बाधा होऊं शकत नाहीं. विजय संपादन करण्यास मागें रहावें एतदर्थ शस्त्रांचा वर्षाव सहन करण्याकरितां ज्याप्रमाणें वज्रकवच द्यावें, त्याप्रमाणें कर्मांची बाधा न व्हावी एतदर्थ बुद्धियुक्तपणा आहे. बुद्धियुक्त झालें असतां इहलोकीचें सुख नाश पावत नसून मोक्ष देणारी सांख्यस्थिती मूर्तिमंत असते. म्हणून कर्माचरणानें वर्तन करावें; परंतु कर्मफळाची इच्छा धरूं नये. कशी म्हणशील तर मंत्रज्ञ (पंचाक्षऱ्या) सारखी. पंचाक्षऱ्याला मंत्रजपापासून भूतबाधा होत नाहीं. (कारण त्या मंत्राचा तो आपल्या करतां कांहीं उपयोग करीत नाहीं) त्याप्रमाणें सुबुद्धि अपरिमित वाढली असतां उपाधीपासून पीडा होऊं शकत नाहीं. कां म्हणशील, तर त्या सुबुद्धींत पापपुण्याचा संचार होत नसून गुणत्रयाचा स्पर्शहि तिला होत नाहीं.—अशी ती अति सूक्ष्म आणि निष्कंप (स्थिर) आहे. अशी सुबुद्धि पुण्याईच्या जोरानें अंतःकरणांत थोडीशी जरी प्रकाशमान होईल, तरी तेवढ्यानें ति-

स्वलभत

जैसी दीपकळिका धाकुटी । परि बहुतें-
जातें प्रगटी । तैसी सद्बुद्धि हे थेकुटी ।
ह्मणों नये ॥ २३८ ॥
पार्था बहुतीं परी । हे अपेक्षीजे विचारशूरीं ।
जे दुर्लभ चराचरीं । सद्वासना ॥ २३९ ॥
आणिकासारिखा बहुवस । जैसा न जोडे परिस ।
कां अमृताचा लेश । दैवगुणें ॥ २४० ॥
तैसी दुर्लभ सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि ।
जैसा गंगेसी उदधी । निरंतर ॥ २४१ ॥
तैसे ईश्वरावांचूनि कांहीं । जिये आणिक
लाहणें नाहीं । ते एकचि बुद्धि पाहीं ।
अर्जुना जगीं ॥ २४२ ॥
येर ते दुर्मती । जे बहुधा असे विकरती ।
तेथ निरंतर रमती । अविवेकिये ॥ २४३ ॥
तू गुणत्रयातें अव्हेरी । मी माझे हें न करी ।
एक आत्मसुख अंतरीं । विसंव ह्मणी ॥ २९९॥
जरी वेदें बहुत बोलिले । विविध भेद सूचिले ।
तऱ्ही आपण हित आपुलें । तेंचि घेपे ॥२९०॥
तैसे ज्ञानी जे होती । ते वेदार्थातें विवरिती ।
मग अपेक्षित तें स्विकारिती । शाश्वत जें ॥२९३॥
परि कर्मफळीं आस न करावी । आणि
अकर्मीं संगती न व्हावी । हे सत्क्रियाचि
आचरावी । हेतूवीण ॥ २९९ ॥
तूं योगयुक्त होउनी । फळाचा संग टाकुनी ।
मग अर्जुना चित्त देउनी । करीं कर्में ॥२९७॥
परि आदरिलें कर्म देवें । जरी समाप्तीतें पावे ।
तरी विशेषें तेथ तोषावें । हेही नको ॥ २९८॥
कीं निमित्तें कोणे एकें । तें सिद्धी न
वचताचि ठाके । तरी तेथिचेनि अपरितोखें ।
क्षोभावेना ॥ २९९ ॥
आचरतां सिद्धि गेलें । तरी काजाची कीर आलें ।
परि ठेलयाहि सगुण जाहालें ।
ऐसेंचि मानीं ॥ २७० ॥
देखें जेतुलालें कर्म निपजे । तेतुलें आदि-
पुरुषीं समर्पिजे । तरी परिपूर्ण सहजें ।
जाहालें जाणें ॥ २७१ ॥

व्यापासून संसारभयाचा सर्वतोपरी नाश होईल.—बाबा, सद्बुद्धि अल्प ह्मण नये. असें पहा- दिव्याची जोत लहान असते, तथापि तिच्यापासून पुष्कळ प्रकाश पडतो--तसा सुबुद्धीचा प्रकार आहे, ह्मणून सुबुद्धीला थेकुटी (अल्प-थोडीशी) असें कधींहि ह्मणू नये. पार्था, या चराचर सृष्टीमध्यें सद्वासना ही फार दुर्लभ आहे, ह्मणून विचारशूर पुरुष बहुत प्रकारेंकरून इची इच्छा धरतात. कारण ही सुबुद्धि प्राप्त होणें ह्मणजे परिसाचा खडा अथवा अमृताचा लेश प्राप्त होण्यासारखी दैवाची गोष्ट आहे. कारण या दुर्लभ सद्बुद्धीचा परिणाम समुद्राला निरंतर मिळणाऱ्या गंगा नदीप्रमाणें परमात्म्यासी मिसळून जाणारा आहे. ह्मणून एका ईश्वरावांचून बुद्धींत दुसरी गोष्टच येत नाहीं-अशी जी सद्बुद्धि, तिचाच अर्जुना तूं विचार कर. कारण विकार पावणारी अर्थात् सकाम बुद्धि जी आहे, तिच्या ठिकाणीं अविचारी जन निरंतर रममाण होतात. याजकरितां तूं काय कर, कीं सत्व-रज-तम या तीन गुणांचा अव्हेर करून मी-मी-माझें-माझे असें न करतां एका आत्मसुखावर अंतःकरणांत नजर ठेव. वेदामध्यें पुष्कळ गोष्टी आणि अनेक मार्ग सुचिवले आहेत. तथापि आपल्या हिताचें त्यांतून जितकें दिसेल, तेवढेंच आपण घ्यावें; ह्मणून ज्ञानी जे आहेत, ते वेदाचा विचार करतात, आणि त्यांतून शाश्वत असें जें अपेक्षित, त्याचाच स्वीकार करतात.—वेदांत सांगितल्याप्रमाणें कर्म करावें; परंतु—कर्म करीत असतां अशा चोख रीतीनें करावें, कीं त्यांत अकर्माची तर संगती होऊं नये, आणि फलाशा न धरतां हेतुविरहित सत्कर्माचरण आचरावें. अशा प्रकारचा अर्जुना, तूं योगयुक्त हो, आणि कर्मफलाची आशा सोडून अंतःकरणपूर्वक कर्में कर. मग आरंभ केलेलें कर्म करीत असतां दैवयोगानें सिद्धीस गेलें, तर त्याजबद्दल विशेषेंकरून संतोष मानूं नकोस—अथवा कांहीं कारणानें तें सिद्धीस न जातां अर्धेंच राहिलें, तथापि त्या दुःखानें क्षोभहि मानूं नकोस.—तात्पर्य—कर्म करीत असतां सिद्धीस गेलें, तर कामच झालें—अर्धेंच राहिलें,तरी झालें तितकें बरेंच झालें असें समज.—याला उत्तम तोड अशी आहे कीं—जितकें जितकें ह्मणून कर्म करावें, तितकें तितकें आदिपुरुषास (ईश्वराला) अर्पण करावें, ह्मणजे तें सहजच परिपूर्ण होतें असें समज.

देखे सतासत कर्मीं । हें जें सरसेपण मनोधर्मीं ।
तेंचि योगस्थिती उत्तमीं । प्रशंसिजे ॥ २७२ ॥
अर्जुना समत्व चित्ताचें । तेंचि सार जाण
योगाचें । जेथ मन आणि बुद्धीचें ।
ऐक्य आथी ॥ २७३ ॥
तो बुद्धियोग विवरता । बहुते पाडे पार्था ।
दिसे हा अरुता । कर्मयोग ॥ २७४ ॥

परि तेंचि कर्म आचरिजे । तरीच हा
योग पाविजे । जें कर्मशेष सहजें ।
योगस्थिती ॥ २७५ ॥
ह्मणोनि बुद्धियोग सधर । तेथ अर्जुना
होई स्थीर । मनें करी अव्हेर ।
फळहेतूचा ॥ २७६ ॥
जे बुद्धियोगा योजिलें । तेंचि पारंगत जाहालें ।
इहीं उभयसंबंधीं सांडिलें । पापपुण्यीं ॥२७७॥
ते कर्मीं तरी वर्तती । परि कर्मफळा नातळती ।
आणि यातायाती लोपती । अर्जुना तया॥२७८॥
मग निरामयभरित । पावती पद अच्युत ।
ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ॥ २७९ ॥
तू ऐसा तैं होसी । जैं मोहाते यया सांडिसी ।
आणि वैराग्य मानसीं । संचरेल ॥ २८० ॥
मग निष्कलंक गहन । उपजेल आत्मज्ञान ।
तेणें निचाड होईल मन । अपैसें तुझें ॥२८१॥
तेथ आणिक कांहीं जाणावें । का मा-
गील तें स्मरावें । हें अर्जुना आघवें ।
पारुषेल ॥ २८२ ॥
इंद्रियांचिया संगतीं । जिये पसर होतसे मती ।
ते स्थिर होईल मागुती । आत्मस्वरूपीं ॥२८३॥
समाधि सुखीं केवळ । जैं बुद्धि होईल निश्चळ ।
तैं पावसी तूं सकळ । योगस्थिती ॥ २८४ ॥

ह्मणे अर्जुना परियेसीं । जो हा अभिलाषप्रौढ मान-
सीं । तो अंतराय स्वसुखेसी । करीत असे॥२९१॥

अर्जुना, योगस्थिती ह्मणून जी ह्मणायची, अथवा ज्या योगस्थितीची उत्तम उत्तम पुरुष प्रशंसा करितात, ती स्थिती सतासत् कर्मांच्या ठिकाणीं मनोधर्मांत सारखेपणा मानण्याची असते. ह्मणून अर्जुना, या योगाचें जें काय सार आहे, तें चित्ताच्या समत्वांत आहे– त्या समत्वांत मन आणि बुद्धीचें ऐक्य असतें. त्या बद्धियोगाचें विवरण करीत असतां हा अलिकडचा कर्मयोगच आहे असें दिसतें.

परंतु अर्जुना–तें कर्म केलें पाहिजे, तरच हा योग साधतो. कारण अशा प्रकारचें कर्म करणें हीच या योगाची सहजस्थिती आहे; ह्मणून फळहेतूचा मनानें त्याग करून या सधर (उत्तम) बुद्धियोगाच्या ठिकाणीं तूं स्थिर हो. कारण ज्यांनीं या बुद्धीयोगाची योजना केली, तेच इहपर पापपुण्याच्या तडाक्यांतून सुटून जन्ममरणांतून मुक्त झाले आहेत, असे जे संसार पारंगत होतात–अर्थात् जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतात, ते कर्म तर करतातच; परंतु कर्मफळाला मात्र ते शिवत नाहींत, ह्मणून ब्रह्मानंदभरित होत्साते ते अढळपद पावतात–अशा कर्मनिष्ठांना बुद्धियोगयुक्त असें ह्मणतात. पार्था, तूं असा बुद्धियोगयुक्त तेव्हां होशील– कीं जेव्हां हा तुझा मोह जाऊन तुझ्या मनांत वैराग्याचा संचार होईल. आणि असा ज्यावेळेस होशील, त्यावेळेस निष्कलंक आणि गहन असें आत्मज्ञान प्राप्त होऊन तुझें मन सहजच निचाड होईल. असें तुझें मन निरीच्छ झाल्यावर मग आणखी ज्ञान प्राप्त करून घ्यावें, अथवा मागील कांहीं गोष्टींची आठवण करावी असला कांहीं एक प्रकार तुझ्या मनांत रहाणार नाहीं. अशी स्थिती झाल्यावर इंद्रियांच्या संगतीनें बुद्धीचा जो पसर होत असतो, तो नाहींसा होऊन ती बुद्धी पुन्हां आत्मस्वरूपीं स्थिर होईल, आणि मग केवळ समाधिसुखांत तुझी बुद्धि निश्चळ(स्थिर) झाल्यावर तुला ही योगस्थिती पूर्णपणीं साधेल.

(ही स्थिती ओळखण्याचीं कांहीं लक्षणें, व कोणतीं लक्षणें असतां त्याला काय ह्मणावें, हें यापुढें सांगितलें आहे.)

सर्वदा नित्यतृप्त आणि अंतःकरणभरित असणाऱ्याच्या आत्मसुखास अंतर करणारा मनांत प्रौढ झाले

जो सर्वदा नित्य तृप्त । अंतःकरणभरित ।
परि विषयामाजीं पतीत । जेणे संगें कीजे॥२९२॥
तो काम सर्वथा जाये । जयाचें आत्मसंतोषीं
मन राहे । तोचि स्थितप्रज्ञ होये ।
पुरुष जाणे ॥ २९३ ॥

ला अभिलाष (काम) सर्वथा जातो, आणि ज्याचें मन आत्मसंतोषी रहातें, त्याला अर्जुना, स्थितप्रज्ञ ह्मणतात.

नाना दुःखीं प्राप्तीं । जया उद्वेग नाहीं चित्तीं ।
आणि सुखाचिया आर्तीं । आडपैचिजेना॥२९४
अर्जुना तयाच्या ठायीं । काम क्रोध स-
हजे नाहीं । आणि भयाते नेणें कहीं ।
परिपूर्ण तो ॥ २९५ ॥
ऐसा जो निरवधी । तो जाण पा स्थिरबुद्धि ।
तो निरसुनि उपाधी । भेदरहित ॥ २९६ ॥

नानाप्रकारचीं दुःखें प्राप्त झालीं असतां ज्याच्या चित्ताला उद्वेग होत नाहीं, आणि सुखाच्या इच्छेनें जो जाचला जात नाहीं, त्याच्याठिकाणीं काम-क्रोध सहजच नाहींसे होऊन भय ह्मणजे काय हें ज्याला ठाऊकही नसतें, असा जो निःसिम व जो उपाधींना सोडून भेदरहित होतो, तो केवळ स्थिरबुद्धि असें पार्था समज.

जो सर्वत्र सदासरिसा । परिपूर्ण चंद्र का
जैसा । अधमोत्तम प्रकाशा । माजीं न
ह्मणे ॥ २९७ ॥
ऐसी अनवच्छिन्न समता । भूतमात्रीं
सदयता । आणि पालट नाहीं चित्ता ।
कवणे वेळे ॥ २९८ ॥
गोमटे कांहीं पावे । तरी संतोषें तेणें
नाभिभवे । जो ओखटेनि नागवे
विषादासी ॥ २९९ ॥
ऐसा हरिख-शोकरहित । जो आत्म-
बोधभरित । तो जाण पां प्रज्ञायुक्त ।
धर्नुधरा ॥ ३०० ॥

उच्चनीच भेद मनांत न आणतां सर्वांना व सर्वठिकाणीं समसमान प्रकाश देण्याच्या कामीं जसा कांहीं पूर्णचंद्रच-अशाप्रकारें भेदरहित समसमान भूतमात्रांच्या ठिकाणीं दया असून ज्याच्या चित्ताचा कधींहि पालट होत नाहीं, आणि एकादि चांगली गोष्ट घडून आली असतां आनंदांत जो मग्न होत नाहीं, अथवा वाईट गोष्ट झाली असतां ज्याला तिच्याबद्दल विषादहि वाटत नाहीं, असा जो हर्षशोकरहित व आत्मबोधभरित, त्याला धनुर्धरा, प्रज्ञायुक्त ह्मणतात.

कां कूर्म जियापरी । उवाईला अवेव पसरी ।
नातरी इच्छावशें आवरी । आपुले आपण३०१
तैसीं इंद्रियें आपैतीं । जयाचे ह्मणितले करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पावली
असे ॥ ३०२ ॥

प्रसन्नपणा असतां कूर्म (कासव) ज्याप्रमाणें आपले अवयव पसरतो, अथवा इच्छेनुरूप तेच जसें आवरून धरतो-त्याप्रमाणें ज्याचीं इंद्रियें स्वाधीन झालीं आहेत-ह्मणजे हटलेलें काम ज्याचीं इंद्रियें करतात, त्याच्या स्थितीला स्थितप्रज्ञस्थिति असें ह्मणतात.

तोचि तू जाण । योगनिष्ठेसी कारण । जयाचें
विषयसुखें अंतःकरण । झकवेना ॥ ३१६ ॥

आतां याजवरून तुझ्या लक्षांत येईलच कीं-ज्याचें अंतःकरण सुखानें झकवलें जात नाहीं- ह्मणजे विषय

जो आत्मबोधयुक्त । होऊनि असे सतत । जो माते हृदयां आंत । विसंबेना ॥ ३१७ ॥
येऱ्हवी बाह्य विषय तरी नाहीं । परी मानसीं होईल जरी कांहीं । तरी साद्यंतचि पाहीं । संसार असे ॥ ३१८ ॥
जैसा कां विषाचा लेश । घेतलियां होय बहुवस । मग निभ्रांत करी नाश । जीवितासी ॥ ३१९ ॥
तैसी विषयाची शंका । मनीं वसती देखा ॥ घात करी अशेखा । विवेकजाता ॥ ३२० ॥
जरी हृदयीं विषयस्मृती । तरी निःसंगाही आपजे संगती । संगें प्रकटे मूर्ती । अभिलाषाची ॥ ३२१ ॥
जेथ काम उपजला । तेथ क्रोध आधीचिआला । क्रोधीं असे ठेविला । संमोह जाणे ॥ ३२२ ॥
संमोहा जालियां व्यक्ती । तरी नाश पावे स्मृती । चंडवातें ज्योती । हत जैशी ॥ ३२३ ॥
कां अस्तमानीं निशी । जैसी सूर्यतेजातें ग्रासी । तैसी दशा स्मृतिभ्रंशी । प्राणियासी ॥ ३२४ ॥
मग अज्ञानांध केवळ । तेणें आप्लविजे सकळ । तेथ बुद्धि होय व्याकूळ । हृदयामाजीं ॥ ३२५ ॥
जैसे जात्यंधा पळणी पावे । मग ते काकुळती सैरा धावे । तैसी बुद्धिसी होती भंवे । धनुर्धरा ॥ ३२६ ॥
ऐसा स्मृतिभ्रंश घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे । तेथ समूळ हें उपडे । ज्ञातजात ॥ ३२७ ॥
चैतन्याच्या भ्रंशी । शरीरा दशा जैशी । तैसे पुरुषाबुद्धिनाशीं । होय देखे ॥ ३२८ ॥
म्हणोनि आइके अर्जुना । जैसा विस्फुलिंग लागे इंधना । मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना । पुरो शके ॥ ३२९ ॥
तैसे विषयांचें ध्यान । जरी विपायें वाहे मन । तरी येसणें हें पतन । गिंवसीत पावे ॥ ३३० ॥
म्हणोनि विषय आघवे । सर्वथा मनौनि सांडावे । मग राग द्वेष स्वभावें । नाशतील ॥ ३३१ ॥

पाहून ज्याचें मन भुलत नाहीं, आणि जो सतत आत्मबोधयुक्त असल्यानें हृदयांतून मला कधींहि विसंबत नाहीं–असा जो, तोच योगनिष्ठेस कारण (अर्थात् योग्य) असें समज. नाहींतर बाहेरून मात्र विषय नाहींत, परंतु अंतर्यामीं थोडा का (वासनारूपानें) विषय असला, तथापि बाबा, त्या प्राण्यास संसारच आहे असें समज. ही विषयाची जरा का शंका (स्मृति) मनांत आली, तर ज्याप्रमाणें थोडेंसें विष घेतलें असतां जिवाचा निश्चयानें नाश होतो त्याप्रमाणें विषयस्मृतीनें सर्व विचारांचा नाश होतो. निःसंग असे जे आहेत, त्यांच्या अंतःकरणांत विषयस्मृती झाली, तर त्या स्मृतीसंगानें मूर्तीमंत अभिलाषाची मूर्ती जो काम, तो (प्रत्यक्ष) उत्पन्न होतो, आणि ज्या ठिकाणीं काम उत्पन्न होतो, तेथें त्याच्या पूर्वीच क्रोध येऊन वसतो–आणि क्रोधाबरोबर संमोह (भ्रम) हा जोडीदार असतोच. सम्मोह प्राप्त झाला ह्मणजे प्रचंड वाऱ्यानें जशी दिव्याची ज्योत जाते (विझते), त्याप्रमाणें स्मृतीचा लय (भ्रंश) होतो. आणि असा स्मृतिभ्रंश झाला, ह्मणजे अस्तमान झाल्यावर रात्र जशी सूर्यतेजाला ग्रासून टाकते, तद्वत स्मृतिभ्रंशानें प्राण्याची स्थिती होते. मग तो प्राणी केवळ अज्ञानांधारांत बुडून जात असल्यानें त्याची हृदयस्थ बुद्धी अगदीं व्याकूळ होऊन जाते, आणि मग, एकाद्या जन्मांधास धावपळीचा प्रसंग आला असतां, तो जसा काकुळती येऊन सैरावैरा धावूं लागतो, त्याप्रमाणें अर्जुना, त्याची बुद्धि धावपळ करूं लागते–अर्थात् चंचल होते. अशा प्रकारचा स्मृतिभ्रंश झाल्यावर बुद्धि सर्वप्रकारें करून अवघडली जाते. आणि त्यायोगें सर्व ज्ञान समूळ विलयास जातें. चैतन्य (जीव) नाहींसें झाल्यावर शरीराची ज्याप्रमाणें अवस्था होते, त्याप्रमाणें बुद्धिनाश झाल्यावर पुरुषाची स्थिती होते; अथवा लाकडाला एकादी विस्तवाची ठिणगी लागून तिजपासून त्रिभुवनाला आग घालण्यासारखा पुष्कळ अग्नी तयार होतो, त्याप्रमाणें चुकून जरी विषयांचें स्मरण मनास झालें, तरी त्यापासून (वर सांगितल्या प्रकारची) पतनस्थिती ही ठेवलेलीच. ह्मणून सर्व विषयच आधीं मनांतून काढून टाकावेत, ह्मणजे सहजच रागद्वेषांचा नाश होईल.

पार्था आणिकही एक । जरी नाशले हे राग-द्वेष । तरी इंद्रियांविषयीं बाधक । रमतां नाहीं ॥ ३३२ ॥

जैसा सूर्य आकाशगत । रश्मीकरें जगातें स्पर्शत । तरी संगदोषें काय लिंपत । तेथिचेनि ॥ ३३३ ॥

तैसा इंद्रियार्थीं उदासीन । आत्मरसेंचि निर्भिन्न । जो काम-क्रोध-विहिन । होऊनि असे ॥ ३३४ ॥

तरी विषयां तया कांहीं । आपणपे वाचूनि नाहीं । मग विषय कवण काई । बाधितील कवणा ॥ ३३५ ॥

जरी उदकीं उदकें बुडिजे । का अग्नि आगी पोळिजे । तरी विषयसंगें आक्रविजे । परिपूर्ण तो ॥ ३३६ ॥

ऐसा आपणाचि केवळ । होऊनि असे निखिल । तयाची प्रज्ञा अचळ । निश्रांत मानीं ॥ ३३७ ॥

देखे अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥ ३३८ ॥

जैसा निर्वातीचा दीप । सर्वथा नेणे कंप । तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूप । योगयुक्त ॥ ३४१ ॥

म्हणूनि अयुक्तपण मनाचें । तेंचि सर्वस्व दुःखाचें । या कारणें इंद्रियांचें । दमन कीजे ३४७ ॥

म्हणोनि आपुली आपणपया । जरी इंद्रियें येती आया । तरी अधिक कांहीं धनंजया । सार्थक असे ॥ ३५१ ॥

देखे कूर्म जियापरी । उवाईला अवयव पसरी । नातरी इच्छावशें आवरी । आपणपेचि ॥ ३५२ ॥

तैसीं इंद्रियें अपैतीं होती । जयाचे म्हणितले करिती । तयाचि प्रज्ञा जाण स्थिती । पातली असे ॥ ३५३ ॥

देखें भूतजात निदेलें । तेथेंचि जया पाहालें । आणि जीव जेथ चेईले । तेथ निद्रित जो ३५५

तोचि तो निरुपाधि । अर्जुना तो स्थिरबुद्धि । तोचि जाणे निरवधि । मुनीश्वर ॥ ३५६ ॥

पार्था, आणखी असेंहि आहे, कीं रागद्वेषादिकांचा नाश झाला असतां या इंद्रियांच्या ठिकाणीं रममाण झाल्यानें कांहीं बाधा होत नाहीं. कसें म्हणून म्हणशील, तर असें पहा—आकाशांतून गमन करीत असतां किरणरूप करांनीं सूर्य जगास स्पर्श करतो, तथापि संगदोष त्याला बाधत नाहीं. त्याप्रमाणें कामक्रोधरहित जो इंद्रियविषयांविषयीं उदासीन असतो, आणि आत्मरसांत—ब्रह्मस्वरूपांत—निमग्न असतो, अशाचीं इंद्रियें विषयांविषयीं रममाण असलीं म्हणून त्यांच्यापासून त्याला बाधा होऊं शकत नाहीं. कारण आपल्यावांचून विषयांत दुसरें कांहीं नाहीं असें त्यास वाटत असतें, म्हणून विषय कोण आणि त्यांनीं कोणाला म्हणून बाधा करावी ? असा त्यांत प्रकार असतो. म्हणून पाणीच पाण्याला बुडवील, अथवा विस्तवच विस्तवाला पोळील, तर मात्र परिपूर्ण असा जो असेल, तो विषयसंगानें बुडेल. इंद्रियें व विषय हीं केवळ जो आपणच बनून गेला असेल, त्याची प्रज्ञा अचल (शाश्वत ज्ञान) झाली आहे असें तूं निश्चयानें समज. अर्जुना, जो आपल्या अतःकरणांत अखंडित प्रसन्नता ठेवतो, त्याच्या ठिकाणीं कोणत्याहि प्रकारच्या दुःखाचा शिरकाव होत नाहीं. कारण निर्वातीच्या दिव्याला जसा कंप नाहीं, त्याप्रमाणें योगयुक्त जो असतो, त्याची बुद्धि स्थीर असते. म्हणून सर्वस्व दुःखाचें कारण मनाच्या अयुक्तपणांत आहे—याजकरतां इंद्रियांचें दमन केलें पाहिजे. परंतु कूर्मा (कासवा) प्रमाणें प्रसन्नतेबरोबर अवयव पसरता येणें, व इच्छेनुरूप आवरता येणें- अशा प्रकारें आपल्या आपणच इंद्रियें ताब्यांत येतील, आणि आपलें म्हटलें करूं लागतील, तर मग आणखी सार्थक तें काय असायला पाहिजे, त्याचीच प्रज्ञा स्थित झाली असें समज.—अर्जुना, पूर्णाचें आणखी एक चिन्ह सांगतों, लक्षांत ठेव.—ज्या ठिकाणीं प्राणीमात्र निजलें आहेत त्या ठिकाणीं जो जागत असतो, आणि ज्या ठिकाणीं प्राणिमात्र जागताहेत, त्या ठिकाणीं जो निजलेला असतो—तोच निरुपाधि, स्थिरबुद्धि, आणि परिपूर्ण असा मुनीश्वर समज.

तेथ कर्म आणि कर्ता । उरेचि ना पाहता । ऐसें मत तुझें श्रीअनंता । निश्चित जरी ॥ २ ॥
हां गा कर्म तूंचि अशेष । निराकरिसी निःशेष । तरी मजकरवीं हें हिंसक । कां करविसी४
जे बुद्धियोग सांगतां । सांख्य मत संस्था । प्रकटिली स्वभावता । प्रसंगें आम्ही ॥ ३३ ॥
अवधारीं वीरश्रेष्ठा । या लोकीं या दोनी निष्ठा । मजचि पासुनि प्रकटा । अनादि सिद्धा ॥३५॥
एक ज्ञानयोग ह्मणिजे । जो सांख्यीं अनुष्ठिजे । जेथ बोळखी सवे पाविजे । तद्रूपता ॥ ३६ ॥
एक कर्मयोग जाण । जेथ साधकजन निपुण । होऊनिया निर्वाण । पावती वेळे ॥ ३७ ॥
हे मार्ग तरी दोनी । परि एकवटती निदानीं । जैसी सिद्धसाध्यभोजनीं । तृप्ती एक ॥ ३८ ॥
तैसे देख पां विहंगममतें । अधिष्ठुनि ज्ञानातें । सांख्य सद्य मोक्षाते । आकळती ॥ ४३ ॥
येर योगिये कर्माधारें । विहितेंचि निजाचारें । पूर्णता अवसरें । पावते होती ॥ ४४ ॥
वांचोनि कर्मारंभ उचित । न करितां सिद्धवत । कर्महीना निश्चित । होईजेना ॥ ४५ ॥
जंव निरातंता नाहीं । तंव व्यापार असे पाहीं । मग संतुष्टीच्या ठायीं । कुंठे सहजे ॥ ४९ ॥
ह्मणोनि आईके पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था । तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥५०॥

अर्जुन ह्मणतो– देवा, आपण मागल्या प्रकर्णांत जो विचार सांगितलात–त्याजवरून पहातां, कर्म आणि कर्ता हे मुळींच उरत नाहींत असें आपलें निश्चित मत असून कर्माचाहि आपण निषेध करतां ! मग हें हिंसाकर्म माझ्याकडून कां करवितां ? –याजवर श्री कृष्ण उत्तर देतात.– अर्जुना, बुद्धियोग सांगत असतां सहज त्यांत सांख्यमतसंस्था प्रकट करण्यांत आली; परंतु हे वीरश्रेष्ठा, अनादिसिद्ध हे दोन्हीहि मार्ग माझ्या पासूनच या जगांत प्रकट झाले आहेत. ज्या मार्गांत ब्रह्माची ओळख होतांच जे ब्रह्मस्वरूपीं मिळतात, असा जो सांख्यमार्ग, त्याला ज्ञानयोग ह्मणतात. आणि दुसरा जो कर्मयोग आहे, त्यांत साधकजन निपुण झाल्यावर अंतकाळीं ब्रह्मस्वरूपीं मिळतात. हे दोन्ही मार्ग जरी निरनिराळे आहेत, तरी सिद्ध-आणि साध्यभोजनीं तृप्ती जशी एकाच प्रकारची असते–ह्मणजे तयार अन्नाचें भोजन, आणि करून तयार केलेल्या अन्नाचें सेवन केलें असतां समाधान जसें एकाच प्रकारचें होतें– त्याप्रमाणें परिणामास हे दोन्हीहि मार्ग एकच आहेत; परंतु जे सांख्य ह्मणजे आत्मानात्म विचारी आहेत, ते ज्ञानाचा आश्रय करून विहंगममतें (पक्षीमार्गानें) मोक्षाला तात्काळ आकळून धरतात. आणि कर्मयोगी जे आहेत, ते निजकर्मानुसार–अर्थात् स्वधर्माचारानें कर्में करून पूर्णता झाल्यावर मोक्षपद पावतात. ह्मणून ज्ञानवानाला जी प्राप्ती होते, ती उचित कर्मारंभ केल्यावांचून कर्महीनाला निश्चयेंकरून व्हायची नाहीं. कारण जोंपर्यंत निरिच्छता प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत व्यापार केलाच पाहिजे. परंतु तीच इच्छा तृप्त होण्याबरोबर सर्व व्यापार बंद पडतात. ह्मणून पार्था, ज्याला नैष्कर्म्य पदाची आस्था आहे, त्यानें तर उचित कर्माचा सर्वथा त्याग करताच कामा नये.

जव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । अपैसी असे ॥ ९३ ॥
देखें विहित कर्म जेतुलें । तें सगळे जरी वोसंडिलें । तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ॥ ९४ ॥

जोंपर्यंत प्रकृतीचें (मायेचें) अधिष्ठान (आश्रय) आहे, तोंपर्यंत करणें अथवा सोडणें हें ह्मणणेंच अगदीं अज्ञानणणाचें आहे. कारण ह्या चेष्टा (व्यापार) गुणाधीन (सत्व-रज-तमाधीन) आहेत; ह्मणून जेवढें कांहीं विहितकर्म आहे, त्या सगळ्यांचा जरी त्याग केला, तथापि इंद्रियांचे स्वभावगुण काय नाहींसे होणार आहेत ? प्रकृतीच्या गुणानुरूप पराधीनपणानें

कर्म पराधीनपणें । निपजत असे प्रकृतिगुणें। येरीं धरीं मोकळीं अंतःकरणें । वाहिजे वायां ॥ ५९ ॥

तैसें प्रकृति आधारें। कर्मेंद्रिय विकारें । निष्कर्महि व्यापारे । निरंतर ॥ ६२ ॥

ह्मणऊनि संग जंव प्रकृतीचा । तंव त्याग न घडे कर्माचा । ऐसियाहि करूं ह्मणती तयांचा । आग्रहचि उरे ॥ ६३ ॥

कर्म निपजतें, तेव्हां कर्म करणें आणि कर्म सोडणें हें ह्मणणेंच आर्धी वाया (खोटें) आहे. कारण प्रकृतीच्या आधारानें कर्मेंद्रियें विकार पावून, निष्कर्म जे असतात, तेहि व्यापार करूं लागतात. ह्मणून प्रकृतीचा जोंपर्यंत संग आहे, तोंपर्यंत कर्मत्याग घडणेंच अशक्य आहे. आणि असा प्रकार असूनहि कर्माचा त्याग करूं असें जे ह्मणतील, तो त्यांचा निवळ आग्रहच आहे.

जो अंतरीं दृढ । परमात्मरूपीं गूढ । बाह्यांतरीं रूढ । लौकिक जैसा ॥ ६८ ॥

तो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी । प्राप्तकर्म नाव्हेरी । उचित जेंजें ॥ ६९ ॥

तो कर्मेंद्रियें कर्मीं । रहाटतां तरी न नियमी । परि तेथिचेनि उर्मी । झांकोळेना ॥ ७० ॥

तो कामनामात्रें न धे पे । मोहमळें न लिंपे । जैसे जळीं जळें न शिंपे । पद्मपत्र ॥ ७१ ॥

तैसा संसर्गामाजी असे । सकळां सारिखा दिसे । जैसे तोयसंगें आभासे । भानुबिंब ॥ ७२ ॥

तैसा सामान्यत्वें पाहिजे । तरी साधारणचि देखिजे । येन्हवीं निर्धारितां नेणिजे । सोय जयाची ॥ ७३ ॥

ऐशा चिन्हीं चिन्हित । देखसी तोचि मुक्त । आशापाशरहित । वोळख पां ॥ ७४ ॥

तूं मानसा नियम करीं । निश्चळ होये अंतरीं । मग कर्मेंद्रियें व्यापारीं । वर्ततुसुखें ॥ ७६ ॥

–परंतु हींच कर्मे बाधत नाहींत; पण कोणाला? जो पुढें सांगितल्याप्रमाणें असेल त्याला–ह्मणजे आंतून (मनानें) जो दृढ (निश्चल) असून परमात्मरूपांत (परब्रह्म स्वरूपाच्या ठिकाणीं) निमग्न असतो, आणि बाहेरून जसा कांहीं संसारांत रूढ (जसा कांहीं संसारीच) बनलेला दिसतो, तो इंद्रियांना कांहीं करण्याविषयीं आज्ञा करीत नाहीं, व विषयांचे भय धरीत नाहीं, आणि उचित अशा प्राप्त कर्मांचा अव्हेरहि करीत नाहीं. परंतु काय करतो, कीं कर्मेंद्रियांना न आवरतां, तो त्यांना खुशाल कर्मे करूं देतो, मात्र त्या कर्मांपासून उत्पन्न होणाऱ्या उर्मींत (सुखदुःखाच्या लहरींत) तो सांपडत नाहीं. पद्मपत्र (कमलाचें पान) पाण्यांत असूनहि जसें पाण्यानें भिजत नाहीं, त्याप्रमाणें तो कोणतीही कामना (इच्छा) धरीत नसून मोहमळानें लिंपला जात नाहीं. तसाच तो संसर्गांत असल्यानें लोकांसारखाच दिसतो, परंतु पाण्यांत दिसणाऱ्या भानु (सूर्य) बिंबाप्रमाणें अलग असतो. अशा पुरुषाकडे सामान्य दृष्टीनें पाहिलें असतां तो साधारण लोकांप्रमाणेंच दिसतो; परंतु विचारपूर्वक पहालें असतां, तो काय (वस्तु) आहे हें कळण्याचीही मारामार पडते. अशा चिन्हांनीं जो चिन्हित तोच आशापाशरहित मुक्त आहे असें समज. ह्मणून अर्जुना, तू काय कर, कीं अंतःकरणांत निश्चळ होण्याचा नियम कर, आणि मग कर्मेंद्रियांना हवेतसें वर्तन करूंदे.

स्वधर्म जो बापा । तोचि नित्य यज्ञ जाण पां । ह्मणोनि वर्ततां तेथ पापा । संचार नाहीं ॥ ८१ ॥

अर्जुना, आपला जो स्वधर्म आहे तोच नित्ययज्ञ असल्यानें, त्याचें आचरण केलें असतां त्यांत पाप-

हा निजधर्म जै सांडे । आणि कुकर्मीं रतिघडे ।
तैंचि बंध पडे । सांसारिक ॥ ८२ ॥
ह्मणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञयाजन ।
जो करी तया बंधन । कांहींच न घडे ॥८३॥
जैं येणें करूनि समस्तां । परितोष होईल देवतां । मग ते तुह्मां इप्सितां । अर्थाते देती ९५
या स्वधर्मपूजा पूजिता । देवतांगणां समस्तां ।
योगक्षेम निश्चिता । करिती तुमचा ॥ ९६ ॥
तुह्मी देवांते भजाल । देव तुह्मां तुष्टतील ।
ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ॥ ९७ ॥
तेथ तुह्मी जे करूं ह्मणाल । तें अपैसें सिद्धी जाईल । वांछितहि पुरेल । मानसींचें ॥ ९८ ॥
वाचा सिद्धी पावाल । आज्ञापक होआल । ह्मणियें तुमतें मागतील । महाऋद्धि ॥ ९९ ॥
जैसें ऋतूपतीचें द्वार । वनश्री निरंतर । वोळगे फळभार । लावण्येसीं ॥ १०० ॥
तैसें सर्वसुखें सहित । दैवचि मूर्तीमंत । येईल देखा काढत । तुम्हां पाठी ॥ १०१ ॥
एसे समस्त भोग भरित । होआल तुह्मी अनार्त । जरी स्वधर्मैक निरत । वर्ताल बापा ॥ १०२ ॥
कीं जालिया सकळ संपदा । जो अनुसरेल इंद्रियमदा । लुब्ध होऊनियां स्वादा । विषयांचियां ॥ १०३ ॥
तिहीं यज्ञ भावितीं सुरीं । जे हे संपत्ती दिधली पुरी । तया स्वधर्मी सर्वेश्वरी । न भजेल जो ॥ १०४ ॥
अग्नीमुखीं हवन । न करील देवतापूजन । प्राप्त वेळे भोजन । ब्राह्मणाचें ॥ १०५ ॥
विमुख होईल गुरुभक्ती । आदर न करील अतिथी । संतोष नेदील ज्ञाती । आपुलिये १०६
ऐसा स्वधर्म क्रियारहित । आथिलेंपणें गर्वित । केवळ भोगासक्त । होईल जो ॥ १०७ ॥
तया मग अपावो थोर आहे । जेणें तें हातिचें फळ जाये । देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगूं ॥ १०८ ॥
तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा संचार होत नाहीं. ह्याच आपला निजधर्म (स्वधर्म) सुटून कुकर्मीं रती (प्रीती) जडली असतां संसाराचा (जन्ममृत्यूचा) बंध पडतो. ह्मणून स्वधर्मानुष्ठान हेंच नित्याचें यज्ञयाजन जो करतो, त्याला संसाराचें बंधन कधींच होत नाहीं. या यज्ञयाजनाच्या योगानें समस्त देवतांना परितोष (प्रसन्नता) होईल; आणि मग ते तुमचे इच्छितार्थ पूर्ण करतील. ह्मणून अशा प्रकारें देवतांचें पूजन केलें असतां, ते तुमचा योगक्षेम (अप्राप्त वस्तूची प्राप्ती आणि प्राप्त वस्तूचें रक्षण) निश्चयानें करतील. असें करण्यापासून काय होईल, कीं–तुह्मी देवाचें भजन केलें असतां, देव तुमच्यावर तुष्ट होतील, आणि परस्परांमध्यें प्रीती उत्पन्न होईल. मग तुह्मी जें जें करूं ह्मणाल, तें तें सहज सिद्धीला जाईल, आणि तुमच्या मनांतील इच्छाहि पूर्ण होतील. तुह्मी वाचासिद्धी पावाल–आज्ञा करणारे व्हाल–आणि तुमच्या काय आज्ञा आहेत ह्मणून विचारण्यास महाऋद्धी तुमच्या तावेदार होतील. मग जसें कांहीं ऋतुपतीच्या (वसंतऋतूच्या) द्वारांत लावण्यसहित फळभारानें भारावलेली वनश्री जशी असते, त्याप्रमाणें सर्व सुखासहित मूर्तिमंत दैवच तुमचा पाठलाग करीत येईल. स्वधर्मरत जर तुह्मी रहाल, तर सर्व प्रकारच्या सुखोपभोगांनीं संपन्न असे तुह्मी होऊन, तुह्मांला कसलीहि इच्छा रहाणार नाहीं–अर्थात तुह्मी अनार्त व्हाल. परंतु अशाप्रकारें सकल संपत्ती प्राप्त झाल्यावर विषयांच्या गोडीला भुलून जो इंद्रियमदानें वागूं लागेल, आणि ज्या देवतांनीं ही आपल्याला संपत्ती दिली असेल, त्या देवतांचें स्वधर्माप्रमाणें भजन जो करणार नाहीं–अग्निमुखीं हवन आणि देवतांचें पूजन जो करणार नाहीं–त्याचप्रमाणें वेळेस आलेल्या ब्राह्मणाला भोजन देणार नाहीं–गुरुभक्तीला विमुख होईल-अतिथीचा आदरसत्कार करणार नाहीं–आपल्या जातीला संतोष देणार नाहीं–अशाप्रकारें स्वधर्म क्रियारहित व संपन्नतेच्या योगानें गर्विष्ट होऊन केवळ भोगासक्तच जो होईल, त्याला थोर (मोठाले) असे अपाय प्राप्त होतील. त्यायोगानें त्याच्या हातीं येणारें फळ नाहींसें होईल इतकेंच नाहीं, परंतु प्राप्त झालेल्या फळाचा भोगहि त्यास होणार नाहीं. कारण दिवा जाण्याबरोबर जसा प्रकाश नाहींसा होतो, तद्वत स्वधर्मलोपा बरोबर सर्व सुखांचा- आ-

थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥
तैसी निजवृत्ती जेथ सांडे । तेथ स्वतंत्रतें वस्ती न घडे । आईका प्रजाहो फुडे । विरंची ह्मणे ॥ १११ ॥
देखा विहित क्रियाविधि । निर्हेतुका बुद्धि । जो असतिये समृद्धी । विनियोग करी ॥११९॥
गुरु-गोत्र अग्नी पूजी । अवसरीं भजे द्विजीं । निमित्तदिकी यजी । पितरोद्देशें ॥ १२० ॥
या यज्ञक्रिया उचिता । यज्ञेसीं हवन करितां । हुतशेष स्वभावता । उरे जें जें ॥ १२१ ॥
तें सुखें आपुले घरीं । कुटुंबेसी भोजन करी । कीं भोग्यचि ते निवारी । कल्मषातें ॥ १२२ ॥
हे संपत्तीजात आघवे । हवन द्रव्य मानावें । मग स्वधर्म यज्ञें अर्पावे । आदिपुरुषीं ॥१३०॥
अन्नास्तव भूतें । प्ररोह पावती समस्तें । मग पर्जन्य या अन्नाते । सर्वत्र प्रसवे ॥ १३४ ॥
तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञाते प्रकटी कर्म । कर्मासी आदि ब्रह्म । वेदरूप ॥ १३५ ॥
मग वेदांतें परात्पर । प्रसवतसे अक्षर । ह्मणऊनि हे चराचर । ब्रह्मबद्ध ॥ १३६ ॥
परी कर्माचिये मूर्तीं । यज्ञीं आधीवास श्रुती । ऐकें सुभद्रापती । अखंड गा ॥ १३७ ॥

श्रयच नाहींसा होतो. विरंची (ब्रह्मदेव) ह्मणाले, प्रजाजनहो, ज्या ठिकाणीं निजवृत्ती (स्वधर्माचरण) चुकते त्या ठिकाणची स्वातंत्र्याची वस्तीच नाहींशी होते.-ह्मणून काय करा कीं-आपल्या जवळ जितकी संपत्ती असेल, तिचा निर्हेतुकपणें विहित क्रियाविधीं विनियोग करा. ह्मणजे गुरू-गोत्र व अग्नी यांचें पूजन करा-वेळेस आलेल्या ब्राह्मणाचें भजन (आदरातिथ्य) करा आणि पितरांच्या उद्देशानें श्राद्धादि-नैमित्तिक कर्मे करा. अशा या विहित यज्ञक्रिया यज्ञभोक्त्यास अर्पण करून हुतशेष (यज्ञशेष) जें राहील, त्यांत आपल्या घरच्या कुटुंबी माणसांसह भोजन केलें असतां, त्याजपासूनच पापाचा नाश होतो. ह्मणून सर्व प्रकारची संपत्ती-हवन द्रव्य (अर्पण करण्याच्या वस्तु) आहे असें समजून स्वधर्म यज्ञानें आदिपुरुषास (यज्ञभोक्त्या परमेश्वरास) अर्पण करावें. या यज्ञाचा महिमा कसा आहे पहा-अन्नापासून प्राणिमात्र उत्पन्न होतात, आणि पर्जन्यापासून हें अन्न सर्वत्र उत्पन्न होतें. त्या पर्जन्याला यज्ञापासून जन्म आहे, आणि यज्ञ कर्मापासून उत्पन्न होतो. त्या कर्माला वेदरूप शब्दब्रह्म कारण आहे. वेदांची उत्पत्ती अक्षरा (परात्परब्रह्मा) पासून आहे ह्मणून हें चराचर (स्थावर जंगमात्मक) जग ब्रह्मस्वरूपीं (ब्रह्मानें भरलेलें) आहे. परंतु हे सुभद्रापते अर्जुना-यज्ञाच्या ठिकाणीं कर्माच्या रूपानें निरंतर श्रुति (वेद) असतात.

मी जेणें जेणें अवसरें । जें जें होऊनि अवतरे । तें तें समस्तहि स्मरे । धनुर्धरा ॥ ४३ ॥
ह्मणोनि हे आघवें । मागील मज आठवे । मी अजही परी संभवे । प्रकृतीयोगें ॥ ४४ ॥
माझे अव्ययत्व तरी न नसे । परी होणें जाणें एक दिसे । तें प्रतिबिंबे मायावशें । माझ्याचि ठायीं ॥ ४९ ॥
माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीन ऐसा आवडे । तेंहि भ्रांति बुद्धि तरी घडे । येऱ्हवीं नाहीं ॥ ४६ ॥
कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधा-

अर्जुना, ज्या ज्या वेळीं जे जे अवतार घेऊन मी अवतरलों, त्या त्या वेळचे सगळें कांहीं मला स्मरतें. मी अजन्मा (जन्मरहित) आहें. तरी प्रकृतीच्या (मायेच्या) योगानें मी अवतार धारण करतों. ह्मणून माझें अव्ययत्व (अविनाशीपण) नासत नाहीं परंतु मध्यंतरी जें कांहीं होतें जातें असें दिसतें, तें प्रतिबिंब मायेच्या योगानें माझ्याच ठिकाणीं दिसतें, तथापि माझी स्वतंत्रता मोडत नाहीं. परंतु बुद्धिभ्रंशानें मी कर्माधीन असा दिसतों- विचार कर कीं, आरशाच्या योगानें एका वस्तूच्या दोन वस्तु दिसतात, परंतु वस्तुविचार केला असतां प्रतिबिंबांत दुजेपण आहे काय ? त्याप्रमाणें अर्जुना, मी अमूर्त

रें । येऱ्हवीं काय वस्तु विचारें । दुजे आहे ४७
तैसा अमूर्तचि मी किरिटी । परी प्रकृती जैं अधिष्टीं । तैं साकारपणें नटनटी । कार्या-
लागीं ॥ ४८ ॥
जे धर्मजात आघवें । युगायुगीं म्या रक्षावें । ऐसा ओघ हा स्वभावें । आद्य असे ॥ ४९ ॥
म्हणोनि अजत्व परते ठेवी । मी अव्यक्तपणही नाठवीं । जे वेळीं धर्माते अभिभवी । अधर्म
हा ॥ ५० ॥
तेवेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकार होऊनि अवतरे । मग अज्ञानाचे आंधारें । गि-
ळूनि घालीं ॥ ५१ ॥
अधर्माची अवधी तोडीं । दोषांचीं लिहिलीं फाडीं । सज्जना करवीं गुढी । सुखाची उ-
भवीं ॥ ५२ ॥
दैत्यांचीं कुळें नाशीं । साधूंचा मान गिंवसी । धर्मासीं नीतीशीं । शेस भरीं ॥ ५३ ॥
मी अविवेकाची काजळीं । फेडूनि विवेक दीप उजळीं । तैं योगियां पाहें दिवाळी । निरंतर
॥ ५४ ॥
स्वसुखें विश्व कोंदे । धर्मचि जगीं नांदे । भक्तां निघती दोंदे । सात्विकांचीं ॥ ५५ ॥
तैं पापाचा अचल फिटे । पुण्यार्चा पहाट फुटे जैं मूर्ती माझी प्रगटे । पंडुकुमरा ॥ ५६ ॥
ऐसेया काजालागीं । अवतरे मी युगीं युगीं । परि होंचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया५७
माझें अजत्वें जन्मणें । अक्रियताचि कर्म करणें । हे अविकार जो जाणे । तो परममुक्त ॥ ५८ ॥
तो चालिला संगें न चले । देहीचा देहीं ना कळे । मग पंचत्वीं तंव मिळे । माझ्याचि
रूपीं ॥ ५९ ॥
येऱ्हवीं तरी पाहीं । जे जैसे माझ्या ठायीं । भजती तयां मीही । तैसाचि भजे ॥ ६६ ॥
देखे मनुष्यजात सकळ । हे स्वभावता भजन शीळ । जाहले असे केवळ । माझ्या ठायीं ॥६७॥

(निराकार) असतां मायेच्या आश्रयानें कार्याकरतां नटनटीच्या वेषासारखी साकार स्वरूपें धारण करतों. कशाकरतां म्हणशील, तर जे जे म्हणून सर्व धर्म आहेत, त्यांचे युगायुगीं मी रक्षण करावें असा स्वाभाविक ओघच पडून गेला आहे. म्हणून जेव्हां जेव्हां अधर्मांचा पगडा जास्त बसून धर्माचा पराभव होऊं लागतो, तेव्हां तेव्हां माझें अजत्व (जन्मरहितपण) एकीकडे ठेवून अव्यक्तपणाची (निराकारत्वाची) आठवणहि ठेवीत नाहीं. आणि अशा वेळीं आपल्यांचा कैवार घेऊन मी साकाररूप प्रकट करतों, आणि अज्ञानांधाराचा-अर्थात दुष्टांचा नाश करतों, आणि अधर्मांचा मार्ग तोडून (बंद करून) दोषांचा (पापाचा) नाश करतो, आणि सज्जनांकडून सुखाची गुढी उभी करिवतों. आणखीं काय करतों म्हणशील, तर दैत्यकुळांचा नाश करून साधूंचा मान करतों, आणि धर्म आणि नीती यांची शेस भरतों-म्हणजे या दोघांचें ऐक्य करतों. अविवेकरूप काजळी झाडून टाकून योग्यांना निरंतर दिवाळी व्हावी म्हणून विवेकरूप दिवा उजळतों. तेव्हां स्वसुखानें विश्व कोंदलें जाऊन जिकडे तिकडे धर्मच दिसूं लागतो. आणि त्या योगानें माझ्या भक्तांस सात्विकपणाची दोंदें वाढतात. अर्जुना, माझ्या अवतरण्याचा असा प्रभाव आहे कीं, पापाचे पर्वतच्या पर्वत नाहींसे होऊन पुण्याची पहाट उजाडते. अशा या कारणाकरतां युगायुगीं मी अवतरतों असें जो ओळखतो, तोच जगामध्यें विवेकी समजावा. आणखीं माझा जन्म अजत्वानें (जन्मरहितपणानें) आहे, व माझी सर्व क्रिया अक्रिय (क्रियारहित) चालते असें जो अविकारपणानें जाणतो, तोच एक जगामध्यें परममुक्त आहे असें समज. असा हा परममुक्त (ब्रह्मनिष्ठ) देही असतांनाहि देहगुणांनीं आकळला जात नाहीं म्हणून तो देहसंगानें चालत असला, तरी तो देहसंगानें चालत नसून पंचत्वी (प्रयाण-मरण-काळीं) माझ्या स्वरूपीं मिळतो. अर्जुना- माझा तरी बाणाच असा आहे कीं- जे जे म्हणून मला जितके जितके भजतात (माझी भक्ती करतात), तितक्या तितक्या मानानेंच मी त्यांना भजतो (पावतो). हे सकळ मनुष्यजात (सर्व लोक) स्वभावताच माझ्या ठायीं भजनशील आहेत- परंतु एक ज्ञान नसल्यानें त्यां-

परी ज्ञानेवीण नाशिले । जे बुद्धी भेदासी आले । त्याणीं एकाचि यया कल्पिलें । अनेकत्वें ॥ ६८ ॥

ह्मणऊनि अभेदीं भेद देखती । यया अनामया नामें ठेविती । देवी देवो ह्मणती । अचर्चिते ॥ ६९॥

जे सर्वत्र सदा सम । तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें सभ्रम । विवंचिती ॥ ७० ॥

च्यांत बुद्धिभेद झाला--अर्थात त्यांच्या बुद्धींत विकल्प येऊन मी एकच असतां, त्यांनीं माझ्याठायीं अनेक कल्पना केल्या. ह्मणून मज अभेदांत भेद मानतात. मी अनाम असतांहि मला नांवें ठेवतात, आणि मी अचर्चा असतांहि मलाच देव आणि देवी असें ह्मणतात-- परंतु सर्वत्र-- सदा (नित्य) आणि सम (सर्वत्र सारखा) असणाऱ्यास अधमोत्तम (उत्तमकनिष्ठ) मानतात. हा प्रकार मति (बुद्धी) संभ्रमाचा (भ्रंशाचा) आहे.

मग नाना हेतु प्रकारें । यथोचितें उपचारें । मानिलीं देवतांतरें । उपासिती ॥ ७१ ॥

एथ जें जें अपेक्षित । तें तैसेचि पावती समस्त । परी तें कर्मफळ निश्चित । वोळख तूं ७२

वांचुनि देतें घतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक । एथ कर्मफळ सूचक । मनुष्य लोकीं ॥ ७३ ॥

तैसा समस्तां या भजनां । मी साक्षीभूत पैं अर्जुना । एक प्रतिफळे भावना । आपुलाली ॥ ७६ ॥

आतां याचि परी जाण । चारी हे वर्ण । सृजिलें म्यां गुण । कर्मविभागें ॥ ७७ ॥

जे प्रकृतीचेनि आधारें । गुणाचेनि व्यभिचारें । कर्में तदनुसारें । विवंचिलीं ॥ ७८ ॥

एथं एकचि हे धनुष्य पाणी । परी जाहाले गा चहूवर्णीं । ऐसी गुणकर्मकडसणी । केली सहजे ७९

ह्मणोनि आइके पार्था । हे वर्णभेद संस्था । मी कर्ता नव्हे सर्वथा । याचिलागीं ॥ ८० ॥

हें मजचिस्तव जाहलें । परी म्यां नाहीं केलें । ऐसें जेणें जाणितलें । तो सुटला गा ॥ ८१ ॥

तरी कर्म ह्मणजे स्वभावें । जेणें विश्वाकार संभवे । ते सम्यक आधीं जाणावें । लागे एथ ॥ ८९ ॥

मग वर्णाश्रमासीं उचित । जें विशेष कर्म

अशा बुद्धिभ्रंशानें-- नानाप्रकारचे हेतु मनांत धरून सांग उपचारानें अनेक मानलेल्या देवांची उपासना (भक्ती) करतात. त्या योगानें जें जें कांहीं त्यांचें अपेक्षित (इच्छित) हेतु असतात, ते त्यांस प्राप्त होतात. परंतु अर्जुना, हें फळ निश्चयेंकरून कर्माचें आहे असें समज. कारण कर्मावांचून साररूपा मोबदल्याचा निश्चयेंकरून देवघेवच होत नाहीं. ह्मणून मनुष्य लोकांत कर्म हेंच प्राप्तीचें फळ सूचक आहें. अर्जुना– या सर्व देवतांतराच्या भजनाचा (भक्तीचा) साक्षिभूत मीच असल्यानें ज्याची त्याची भावना ज्याला त्याला फळते. (ह्मणजे मी त्या त्या देवतेच्या रूपानें त्यास पावतो.)-- आतां याच प्रकारानें गुणकर्म विभागानुसार हे चारी वर्ण मी निर्माण केले, आणि प्रकृतीचा (मायेचा) आश्रय आणि गुणभिन्नतेचें कमी ज्यास्त मिश्रण यांच्या अनुरोधानें त्यांच्या कर्माची वाटणी केली. परंतु अर्जुना, यांत ब्रह्म एकच आहे, तथापि गुणकर्मांच्या विचारानें सहजच चार वर्णांचें झालें. ह्मणून पार्था, ही गोष्ट लक्षांत ठेव, कीं या वर सांगितलेल्या कारणावरून या वर्णभेद संस्थेचा कर्ता सर्वथा मी नव्हे. आणि माझ्या योगानेंच ही वर्णव्यवस्था झाली आहे असें जरी दिसतें,तथापि ती मी केली नाहीं-अर्थात प्रकृति आणि गुण यांचा हा खेळ आहे असें जो समजेल, तोच जन्ममरणाच्या फेऱ्यांतून चुकेल. अर्जुना, कर्मांच्या योगानेंच जर हा विश्वाकार झाला आहे, तर तें कर्म ह्मणजे काय हेंच आधीं समजून घेतलें पाहिजे. आणि मग वर्णाश्रमाला उचित (योग्य) असें जें विशेष विहित कर्म तें उपयोगासह ओळखून (पारखून) घेतलें पाहिजे. जसें विहित कर्म ओळ-

विहित । तेहि बोळखावें निश्चित ।
उपयोगेसीं ॥ ९० ॥
पाठी जें निषिद्ध ह्मणिपे । तेंहि बुझावें
स्वरूपें । येतुलेनि कांहीं न गुंफे । आ-
पैसेचि ॥ ९१ ॥
येन्हवीं जग हें कर्माधीन । ऐसी याची
व्याप्ती गहन । परि तें आइकें चि-
न्ह । प्राप्तांचें ॥ ९२ ॥

खून घ्यायाला पाहिजे, त्याचप्रमाणें निषिद्धकर्महि समजून घेतलें, ह्मणजे त्यापासून कर्मबंध प्राप्त होणार नाहीं. असो. या जगांत सर्वत्र कर्मांचीच व्याप्ती आहे, ह्मणून आतां प्राप्तांचें (पूर्णाचें अथवा ब्रह्मनिष्ठांचें) लक्षण सांगतों.

जो सकळ कर्मीं वर्ततां । देखे आपुली
नैष्कर्म्यता । कर्मसंगें निराशता । फ-
ळाचिया ॥ ९३ ॥
आणि कर्तव्यतेलागीं । जया दुसरें नाहीं
जगीं । ऐसिया नैष्कर्म्यता तरी चांगी ।
बोधला असे ॥ ९४ ॥
तरी क्रियाकलाप आघवा । आचरत दिसे
बरवा । तोचि तो ये चिन्हीं जाणावा ।
ज्ञानियागा ॥ ९५ ॥
जैसा का जळापासी उभा ठाके । तो जरी आ-
पणपे जळामाजी देखे । तरी तो निभ्रांत बो-
ळखे ॥ ह्मणे मी वेगळा आहें ॥ ९६ ॥
तैसें सर्व कर्मी असणें । तें फुडें मानुनि वायाणें
मग आपण जो जाणे ॥ नैष्कर्म्य ऐसा ॥ ९८ ॥

प्राप्त जो असतो, तो आपलीं सर्व कर्मे करीत असतो. परंतु कर्मे करीत असल्याचा बोजा तो आपल्यावर घेत नाहीं–ह्मणजे कर्मे करीत असूनही आपण तें कर्मच करीत नाहीं असें मानतो, आणि कर्मसंगानें जी फलप्राप्ती व्हायची तिज विषयीं तो अगदीं निराश असतो. (अशा कर्तव्यतेला नैष्कर्म्य असें ह्मणतात)--आणि जगांत आपलें जें कांहीं कर्तव्य आहे तें कर्म करून फलाविषयीं अगदीं निरिच्छ असणें यावांचून आपल्यावर कर्मांचा बोजा घेण्यासारखें जगांत त्याला दुसरें कर्तव्यच नाहीं, अशा प्रकारचा त्याला चांगला बोध झालेला असतो. ह्मणून अशा ज्ञान्याला ओळखण्याचीं चिन्हें ह्मटलीं ह्मणजे तो सर्व कर्मे उत्तम प्रकारानें आचरीत असल्याचें दिसतेः–तथापि तो असा असतो, कीं--एखादा मनुष्य पाण्याजवळ (नदी-विहीर-तळें-अथवा हौद यांच्या कांठावर) उभा असतां आपण पाण्यांत आहों असें पाहूनहि मी अगदीं वेगळा आहें असें जसें तो निभ्रांत समजतो. त्याप्रमाणें सर्व कर्मांत आपण असून कर्मीं मी नाहीं--अर्थात कर्मकर्ता मी नाहीं, अशा प्रकारानें तो (ज्ञानी) आपल्याला नैष्कर्म्य असें समजतो.

अर्जुना वेद जयांचें मूळ । जे क्रियाविशेष
स्थूळ । जया नव्हाळियेचें फळ । स्वर्ग-
सुख ॥ १९८ ॥
ते द्रव्यादि याग कीर होती । परी ज्ञानयज्ञा-
ची सरी न पवती । जैसी तारातेज संपत्ती ।
दिनकरापाशीं ॥ १९९ ॥

कर्म फळ अथवा कर्मांची किंमत काय आहे हें अर्जुनाला श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे–अर्जुना, ज्याचें (यज्ञाचें) मूळ वेद आहेत, त्या वेदानुसार विशेष क्रिया (कर्मे) केलीं असतां त्यांपासून नवे अथवा अपूर्व प्राप्तीचें फळ ह्मटलें, तर काय तें स्वर्गसुखच आहे. आणि हें कर्म वेदांना अनुसरून क्रियाविशेष असें अनेक प्रकारचे याग जरी केले, तथापि त्यां-

देखे परमात्मसुख निधान । साधावया योगी-
जन । जे न विसंबिती अंजन । उन्मेषनेत्रीं ॥
जें धांवतया कर्माची लाणी । नैष्कर्म्य बोधा
खाणी । जे भुकेलिया धणी । साधनाची ॥ १६१
जेथ प्रवृत्ति पांगूळ जाहली । तर्काची दृष्टी
गेली । जेणें इंद्रियें विसरली । विषय-
संग ॥ १६२ ॥
मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचें बोलकेपण
ठेलें । जयामाजी सांपडले । ज्ञेय दिसे ॥ १६३ ॥
जेथ वैराग्याचा पांग फिटे । विवेकाचाहि सोस
तुटे । जेथ न पहातां सहज भेटे ।
आपणपे ॥ १६४ ॥

च्यानें ज्ञानयज्ञाची बरोबरी करवत नाहीं. याला उप-
मा सूर्य आणि तारातेज संपत्ती सारखी आहे.--ह्मणजे
सूर्यतेजांत जशी तारातेज संपत्ती येते, तद्वत ज्ञान-
यज्ञांत द्रव्यादि यज्ञ नाहींसे होऊन जातात. अर्थात
ज्ञानयज्ञापुढें द्रव्ययज्ञाची मातबरी मुळींच नाहीं.
ह्मणून परमात्म सुखनिधान (आत्मसुखाचा ठेवा)
साधून घेण्याकरतां योगीजन आपल्या डोळ्यांत
उन्मेषांजन (ज्ञानांजन) घालण्यास विसंबत नाहींत.
उन्मेषांजनाचा प्रभाव कसा आहे ह्मणशील, तर--धांव-
त्या कर्माचा (कर्मफळइच्छेचा) शेवट जी नैष्क-
र्म्य बोधाची खाण, ती दिसू लागून आत्मसुखाकर-
तां साधन करीत असलेल्या भुकेलेल्याची (तळमळत
असणाऱ्याची) तृप्ती होते. आणखी प्रवृत्ती (याता-
यातीं) बंद पडून तर्काची दृष्टी (धांव) थांबते,
इंद्रियें विषयसंग विसरतात. मनाचें मनपण (मनन
करण्याचा व्यापार) थांबते, बोलाचें बोलकेपण राहते,
(ह्मणजे बोलण्यासारखे कांहीं उरत नाहीं) ज्ञाना-
वांचून दुसरें कांहींच दिसत नाहीं. वैराग्य दारिद्र्याचा
नाश होतो (पूर्ण वैराग्य प्राप्त होतें), आणि विवेका-
चा सोस नाहींसा होऊन आपोआपच आपली आप-
ल्याशीं गांठ पडते--अर्थात जीवशिवाचें ऐक्य होतें.

तें गा ज्ञान पैं बरवें । जरी मनीं आथी आ-
णावें । तरी संतांतें भजावें । सर्वस्वेसीं ॥१६५॥
जें ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारि-
वंटा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी
॥ १६६ ॥
तरी तनु-मनु-जीवें । चरणासीं लागावें ।
आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥१६७॥
मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगतांचि
पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा
नये ॥ १६८ ॥
आत्मसुखाचिया गोडिया । विटे जो कां
सकळ विषयां । जयाच्या ठायीं इंद्रियां ।
मान नाहीं ॥ १६७ ॥
जो मनासी चाड न सांगे । जो प्रकृतीचें

असें हें जीवशिवैक्य करणारें ज्ञान जाणावें अशी
मनांत इच्छा असेल, तर सर्वभावें करून संतांचे
(सिद्ध पुरुषांचे) भजन केलें पाहिजे.--ह्मणून काय
केलें पाहिजे, कीं--ज्ञानाच्या घराचा उंबरठा सेवा
करून आधीं स्वाधीन करून घेतला पाहिजे. आणि
मग तन-मन आणि धन यांहीं करून अगवर्ता--अर्थात
गरीबीनें त्यांचे दास्य (सेवकपण) करावें ह्मणजे मग
जें काय आपलें इच्छित असेल, तें त्यांना विचारलें असतां,
ते आपल्या अंतःकरणावर अशा प्रकारचा बोध करती-
ल, कीं त्यापासून अंतःकरणांत संकल्प ह्मणून पुन्हां
उद्भवणार नाहीं. आणि मग अशा प्रकारची त्याची
स्थिती होईल, कीं-- त्याला आत्मसुखाची गोडी
लागून विषयावरील त्याचें मन विटेल.--ह्मणजे अ-
र्थातच त्याच्याजवळ इंद्रियांचा मान रहाणार नाहीं.
मग मनाची चाड (इच्छा) तो कोणाजवळ सांगणार ?
आणि प्रकृतीनें (मायेनें) केलेलें तरी तो कोणाकरता

केलें ने घे । जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया जाहाला ॥ १८८ ॥
तयातेंचि गिवसित । तें ज्ञान पावे निश्चित । जयामाजी अचुंबित । शांति असे ॥ १८९ ॥
तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकूर फुटे । मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ॥ १९० ॥
मग जेउति वास पाहिजे । तेउति शांतीची देखिजे । तेथे आपपर नेणिजे । निर्धारिता ॥ १९१ ॥

स्वीकारणार ? अर्थातच श्रद्धासंभोगानें (भक्तीच्या योगानें) तो (आत्म) सुखांत रहाणार.—आणि अशा श्रद्धासंभोगांत तो राहला असतां, शांतिसह ज्ञान त्याचा शोध करीत येतें. अशा प्रकारानें हृदयांत (अंतःकरणांत) ज्ञानाचा प्रवेश झाला, ह्मणजे शांतीला अंकूर फुटूं लागून आत्मबोधाचा विस्तार प्रकट होऊं लागतो. असा आत्मबोधाचा विस्तार प्रकट होऊं लागला, ह्मणजे जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे त्याला शांतीच दिसूं लागते, आणि आपले व परके याचा विचार करूं लागलें असतां, हे आपपर प्रकार तो जाणत नाहीं—अर्थात अद्वैत बनतो.

तरी गेलियाची से न करी । न पवतां चाड न धरी । जो सुनिश्चळ अंतरीं । मेरु जैसा ॥ १९ ॥
आणि मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥ २० ॥
जो मनें ऐसा जाहला । संगी तोचि सांडिला । ह्मणोनि सुखें सुख पावला । अखंडित ॥ २१ ॥
आतां गृहादिक आघवें । तें कांहीं नलगे त्यजावें । जें घेते जाहले स्वभावें । निःसंग ह्मणउनी ॥ २२ ॥
देखे अग्नी विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळ होये । तैं ते कापुसे गिवसुये । जियापरी ॥ २३ ॥
तैसा असतेनि उपाधी । नाकळिजे तो कर्मबंधीं । जयाचिये बुद्धि । संकल्प नाहीं ॥ २४ ॥
ह्मणोनि कल्पना जें सांडे । तेंचि गा संन्यास घडे । इयेकारणें दोनी सांगडे । संन्यास योग ॥ २५ ॥
आणि सांख्यीं जें पाविजे । तेंचि योगी गमिजे । ह्मणोनि ऐक्य दोहींते सहजे । इयापरी ॥ २६ ॥

संन्याशी कोणाला ह्मणावें असें जर विचारशील तर अर्जुना, मी आणि माझें—हें (अहंकृत्व) ज्याच्या अंतःकरणांतील आठवणींतून समूळ विसरून गेलें असून, गेल्या गोष्टीची जो आठवणहि करीत नाहीं, व अमुक एक मिळावें अशी आशाहि जो धरीत नाहीं, तो निरंतरचा संन्यासी आहे असें समज. अशा प्रकारचे ज्याचें मन संन्यासी बनतें, तोच इंद्रियांच्या द्वारें विषयसंगापासून सुटून अखंड सुखाला (आत्मसुखाला) प्राप्त होतो. आतां अशा संन्यासी बनलेल्याला गृह आदिकरून कांहीं एक वस्तूचा त्याग करण्याची जरूर नाहीं. कारण स्वभावता निःसंग बनून त्यानें त्याचा स्वीकार केलेला असतो.— अर्थात गृहादि वस्तु असल्या काय आणि नसल्या काय, या दोहींची किंमत त्यास सारखीच असते.— ह्मणून गृहादिकांच्या उपाधींत तो जरी असला, तथापि विस्तव विझून गेल्यावर त्याची राखोंडी कापसांत बांधली असतां, जशी तिजपासून कापसाला जळण्याची भीती नसते, त्याप्रमाणें त्याच्या बुद्धींतील संकल्प नाहींसा झाल्या कारणानें, तो कर्मबंधांत सांपडला जात नाहीं. ह्मणून कल्पना नाहींशी झाल्यावांचून संन्यासयोग घडत नाहीं. आणि कल्पना नाहींशी होते, ह्मणून संन्यासयोग आणि ब्रह्मार्पण अथवा नैष्कर्म्ययोग हे दोन्हीं सारखेच आहेत. आणखी असें पहा कीं, सांख्यी (आत्मानात्म विचारी) जे प्राप्त करून घेतात, तीच प्राप्ती या दोन [illegible]रच्या (ब्रह्मार्पण आणि संन्यास) योग्यांस होते

जो युक्तिपंथें पार्था । चढे मोक्ष पर्वता । तो महासुखाचा निमथा । वहिला पावे ॥ ३२ ॥
येरा योगस्थिती जया सांडे । तो वांयाचि गा हव्यासीं पडे । परि प्राप्ती कहीं न घडे । संन्यासाची ॥ ३३ ॥
तैसें संकल्पोनि काढिलें । जयाचें मनचि चैतन्य जाहालें । तेणें एकदेशिये परि व्यापिलें । लोकत्रय ॥ ३६ ॥
आतां कर्ता कर्म करावें । हें खुंटलें तया स्वभावें । आणि करी जरी आघवें । तरी अकर्ता तो ॥ ३७ ॥
जे पार्था तया देहीं । मी ऐसा आठवूं नाहीं । तरी कर्तृत्व कैंचे काई । उरे सांगे ॥ ३८ ॥
ऐसें तनुत्यागेवीण । अमूर्ताचे गुण । दिसती संपूर्ण । योगयुक्तां ॥ ३९ ॥
येन्हवीं आणिकांचिये परी । तोहि एक शरिरी ॥ अशेषाहि व्यापारीं । वर्तत दिसे ॥ ४० ॥
तोहि नेत्रीं पाहे । श्रवणीं ऐकत आहे । परि तेथींचा सर्वथा नोहें । नवल देखें ॥ ४१ ॥
स्पर्शासी तरी जाणे । परिमळ सेवी घ्राणें । अवसरोचित बोलणें । तयाहि आथी ॥ ४२ ॥
आहाराते स्वीकारी । त्यजावें तें परिहरी । निद्रेंचिया अवसरीं । निदिजे सुखें ॥ ४३ ॥
आपुलेनि इच्छावशें । तोहि गा चालत दिसे । पैं सकळ कर्म ऐसें । राहाटे कीर ॥ ४४ ॥
हें सांगों काइ एकैक । देखे श्वासोश्वासादिक । आणि निमिषोन्मिष । आदिकरूनि ॥ ४९ ॥
पार्था तयाचे ठायीं । हें आघवेंचि आथी पाहीं । परि तो कर्ता नव्हे कांहीं । प्रतितिबळें ॥ ४६ ॥
जैं भ्रांति सेजे सुतला । तैं स्वप्नसुखें भुतला । मग तो ज्ञानोदयीं चेइला । म्हणोनियां ॥४७ ॥

म्हणून या दोन्हीहि मार्गांचें ऐक्य (साम्य) आहे. अर्जुना, युक्तीमार्गानें जो मोक्ष पर्वतावर चढतो, तो सुखाच्या शिखरावर (आत्मसुख प्राप्तीप्रत) लवकर पोचतो. वर सांगितलेली स्थिती सोडून जे व्यर्थ हव्यास करीत सुटतात, त्यांना संन्यासयोगाची प्राप्ती कधींहि होणार नाहीं, असो. संकल्पांतून ज्याचें मन निघालें त्याचें मनच चैतन्य (ब्रह्म) बनतें, आणि मन असें चैतन्य बनल्यावर तें एकदेशीय (परिमित) जरी असतें, तथापि तें त्रैलोक्यास व्यापून टाकतें– आणि अशा प्रकारचें त्रैलोक्यव्यापी मन झाल्यावर कर्तेपणा अथवा कर्म करण्याची इच्छा ही सहजच त्याची बंद पडते. म्हणून अशा संन्याशानें जरी सर्व कर्मे केलीं, तथापि तो त्या संबंधानें अकर्ता (करणारा नाहीं) असा असतो. कारण मी देही आहें असा आठवच जर त्यास राहत नाहीं, तर कर्तृत्व त्याजवर कसें येणार तें सांग ? म्हणून तनुत्यागेवीण अमूर्ताचें गुण या संपूर्ण योगयुक्तांत दिसतात. आणि पाहूं गेलें असतां तो तरी इतरांसारखा देही असून सर्व व्यापार करीत असतो. म्हणजे नेत्रानें पाहतो–श्रवणांनीं ऐकतो–स्पर्श जाणतो–परिमळाचे घ्राणानें (नाकानें) सेवन करतो–वेळेनुसार समयोचित बोलतो–आहाराचा स्वीकार करतो–ज्याचा त्याग करावा त्याचा त्याग करतो–वेळीं सुखानें झोंप घेतो–आपल्या इच्छेनें तोहि चालतो–आणखीं एकेक किती म्हणून सांगूं ? श्वासोश्वास आणि डोळ्यांचीं पातीं हालणें हे देखील सर्व व्यापार त्याच्या ठिकाणीं होत असतात. तथापि तो त्या व्यापारांत नसतो, ही नवलाची गोष्ट आहे.–परंतु नवल तरी कशाचें–तो प्रतीतिबळानें–अर्थात आत्मज्ञानाच्या प्रभावानें तो त्या कर्मांचा कर्ताच नसतो.–कारण कोणीहि काय,–जोंपर्यंत भ्रांतिरूप बिछान्यावर निजलेला असतो, तोंपर्यंत तो स्वप्नसुखास (प्रपंचसुखास) भुलळेला असतो. परंतु तोच ज्ञानोदय होण्याबरोबर जागा होऊन सर्व कर्मांचा अकर्ता होतो, कारण अधिष्ठानाच्या (ब्रह्मसत्तेच्या) योगानें सर्व इंद्रियें आपापल्या स्वभावाप्रमाणें आपापल्या विषयांत वावरत असतात, परंतु इतर लोकांचे गृहांतील सर्व व्यापार दीपप्रकाशानें जसें चालतात, त्याप्रमाणें योगयुक्ताचे सर्व व्यापार तेजानें चालत असतात, म्हणून तो सगळीं कर्मे

आतां अधिष्ठान संगतीं । अशेषाहि इंद्रिय
वृत्ती । आपुलालिया अर्थीं । वर्तत
आहाती ॥ ४८ ॥
दीपाचेनि प्रकाशें । गृहीचे व्यापार जैसे ।
देहीं कर्मजात तैसे । योगयुक्ता ॥ ४९ ॥
तो कर्में करी सकळें । परि कर्मबंधा नाकळे ।
जैसें न सिंपे जळीं जळें । पद्मपत्र ॥ ५० ॥

देखें बुद्धिची भाष नेणिजे । मनाचा अंकूर
नुदैजे । ऐसा व्यापार तो बोलिजे ।
शारीरगा ॥ ५१ ॥
इंद्रियांच्या गांवीं नेणिजे । ऐसा व्यापार
जो निपजे । तो केवळ गा ह्मणिजे ।
मानसाचा ॥ ५५ ॥
हें असो काजेवीण । जें जें कांहीं करणें ।
तें केवळ कर्म जाण । इंद्रियांचें ॥ ५९ ॥
मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें ।
वोळख अर्जुनातें । ह्मणे श्रीहरि ॥६०॥
अगा करितेनवीण कर्म । तेंचि तें निष्कर्म ।
हें जाणती सुवर्म । गुरुगम्य जें ॥ ६३ ॥
येथ इंद्रियांचा पांग । जया फिटला आहे
चांग । तयासीचि आथी लाग ।
परिसावया ॥ ६९ ॥
तरी आत्मयोगें आथिला । जो कर्म-
फळासीं विटला । तो घर रिघोनि वरिला ।
शांती जगीं ॥ ७१ ॥
जैसा फळाचिया हावें । तैसें कर्म करी
आघवें । मग न कीजेचि येणें भावें ।
उपेक्षी जो ॥ ७३ ॥
तो जयाकडे वास पाहे । तेउती सुखा-
ची सृष्टी होये । तो ह्मणे तेथ राहे ।
महाबोध ॥ ७४ ॥
नवद्वार देहीं । तो असताचि परि नाहीं ।
करीतचि न करी कांहीं । फळत्यागी ॥ ७५ ॥
जैसा का सर्वेश्वर । पाहिजे तत्र निर्व्यापार ।
परि तोचि रची विस्तार । त्रिभुवनाचा ॥७

करीत असला तरी पाण्यांत असणारें कमलपत्र जसें पाण्यानें भिजत नाहीं, त्याप्रमाणें हा कर्मबंधानें आकळला (बांधला) जात नाहीं.

—या पुढें कोणते व्यापार कोणत्या इंद्रियांचे हें सांगितलें आहे.—

ज्यांत बुद्धीची भाष (गोष्ट) नसून मनाच्या इच्छेचा अंकूरहि नसतो, असा जो व्यापार घडतो, त्याला शारीरव्यापार असें ह्मणतात— त्याचप्रमाणें इंद्रियांना न कळत जो व्यापार घडतो, त्याला मनाचा व्यापार असें ह्मणतात. कारणावांचून जें जें कांहीं करणें तें केवळ इंद्रियांचे व्यापार होत. आणि जेवढें कांहीं जाणतेपणाचें कर्म दिसतें, तो सर्व व्यापार बुद्धीचा आहे.— हे जे इंद्रियव्यापार सांगितले, त्याजवरून—नैष्कर्म्य ह्मणजे कर्तेपणाविण कर्म करण्याची हातवटी आहे, ती सुवर्म (उत्तम मर्म जाणणारे) जे आहेत, त्यांनाच गुरुगम्य आहे.— अर्थात गुरूपासून प्राप्त होणारी आहे.— हें गुरुगम्य ऐकण्याला योग्य कोण आहेत ह्मणशील, तर ज्यांच्या इंद्रियांचा पांग (दारिद्र्यपणा अथवा पराधीनपणा) नाहींसा झाला आहे, तेच योग्य होत. ह्मणून आत्मयोगानें जो संपन्न होतो, त्यालाच कर्मफळाचा वीट येतो, ह्मणून त्याच्या घरांत शिरून जगाची शांति त्यास वरते.—आत्मयोगानें जो संपन्न असतो, तो जीं कर्में करतो—तीं सर्व, फलेच्छा इच्छिणारा ज्याप्रमाणें करीत असतो, त्याप्रमाणेंच करतो, परंतु तो फलेच्छेविषयीं मात्र अगदीं उदास असतो— ह्मणजे कर्म न करतां ज्या प्रकारची त्याची स्थिती असावी त्याप्रमाणें तो असतो, ह्मणून तो ज्या ज्या स्थळाकडे पहातो, तें तें स्थळ त्याला सुखाचीच सृष्टी होतें, व ज्याठिकाणीं तो महाबोधास (ब्रह्मज्ञानास) रहा असें ह्मणतो, त्याठिकाणीं महाबोध रहातो. असा जो फलत्यागी अर्थात संन्याशी असतो, तो नवद्वार देहानें सर्व प्रकार करीत असतांहि, न केल्यासारखा, त्रिभुवन उत्पन्न करणाऱ्या सर्वेश्वराप्रमाणें असतो. त्रिभुवन उत्पन्न करणाऱ्या

आणि कर्ता ऐसें ह्मणिपे । तरी कवणें
कर्मीं न शिंपे । जे हातपावो न लिंपे ।
उदास वृत्तीच्या ॥ ७७ ॥

योगनिद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा
सळु न घडे । परि महाभूतांचे दळवाडे ।
उभारी भले ॥ ७८ ॥

जगाध्या जिवीं आहे । परि कवणाचा
कहीं नोहे । जगचि हें होय जाये । तो
शुद्धीही नेणे ॥ ७९ ॥

पाप पुण्यें अशेषें । पासींचि असतु न
देखे । आणि साक्षीही होऊं न ठाके । येरी
गोष्टी कायसी ॥ ८० ॥

पैं मूर्तींचेनि मेळें । तो मूर्तचि होऊनि
खेळे । परि अमूर्तपण न मैळे । दादुल-
याचें ॥ ८१ ॥

तो सृजी पाळी संहारी । ऐसें बोलती जे
चराचरीं । तें अज्ञान गा अवधारीं । पंडु-
कुमरा ॥ ८२ ॥

सर्वेश्वराविषयीं विचार करतां, तो जसा त्रिभुवनाची रचना करूनहि निर्व्यापार दिसतो, त्याप्रमाणें फल-त्याग्याचें नवद्वार देहीं सर्व कर्तृत्व असतें. सर्वेश्व-राला कर्ता ह्मणावें, तर कोणत्याच कर्माचा त्याला स्पर्श होत नसल्यानें, त्याचे हातपाय कशांतहि गुंतत नाहींत असा तो उदासवृत्ती असतो, ह्मणून त्याची योगनिद्रा (समाधि) मोडत नाहीं, अथवा त्याच्या अकर्तेपणासहि बाध येत नाहीं, परंतु तोच महाभूतांचे (प्राण्यांचे) समुदाय उत्पन्न करतो-- आणखीं-- तो जगाच्या जिवांत असूनहि त्याचा कोणासी संबंध नसतो, त्या योगानें हें जग उत्पन्न होतें आणि नाश पावतें याची त्याला शुद्धीहि नसते. सर्व पापपुण्यें त्याच्या जवळ असतांहि त्याजकडे तो पहात नाहीं इतकेंच नाहीं, परंतु त्याचा तो साक्षीहि होत नाहीं. मग दुसऱ्या गोष्टींचें नांव कशाला ? असें असतांहि तो सर्वेश्वर मूर्त होऊन (देह धारण करून) देहधा-ऱ्यांत खेळतो. तथापि त्याच्या अमूर्तपणास (निरा-कारत्वास) बाध येत नाहीं.--आणि या कारणांनींच-- सर्वेश्वर सृष्टी उत्पन्न करतो, तिचा प्रतिपाळ करतो व अखेर संहार करतो असें जगांतील प्राणिमात्र बोल-तात, तें मात्र अर्जुना, अगदीं अज्ञान आहे, असो.

एथ ईश्वर एक अकर्ता । ऐसें मानलें जरी
चित्ता । आणि तोचि मी हे स्वभावता ।
आदीची आहे ॥ ८४ ॥

ऐसेनि विवेकें उदो चित्तीं । तयासीं भेद
कैंचा त्रिजगतीं । देखे आपुलिया प्रतीती ।
जगचि मुक्त ॥ ८५ ॥

बुद्धि निश्चयें आत्मज्ञान । ब्रह्मरूप भावी
आपणा आपण । ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण ।
तत्परायण अहर्निशीं ॥ ८७ ॥

ह्मणोनि सर्वत्र सदा सम । तें आपणचि
अद्वय ब्रह्म । हें सपूर्ण जाणें वर्म ।
समदृष्टीचें ॥ ९६ ॥

जिहीं विषयसंग न सांडितां । इंद्रियांते
न दंडिता । परी भोगिली निःसंगता ।
कामनेवीण ॥ ९७ ॥

या जगांत ईश्वर एक अकर्ता आहे असें चित्ताला वाटलें, आणि स्वभावेंकरून (खरोखरच) तोच मी आदीचा (सिद्ध स्थितींतील) आहे असा चित्तांत विचाराचा उदय झाला, तर या त्रिजगांत त्याला भेद दिसेनासा होऊन-- अर्थात द्वैतभावना जाऊन तो आपल्या प्रतीतीनें (आत्मानुभवानें) जगच मुक्त आहे असें पहातो.-- जग आत्मवत् पहाण्याला बुद्धी निश्चयात्मक व्हावी लागते, ह्मणजे-- बुद्धिनिश्चयानें आत्मज्ञान प्राप्त होतें, आणि आत्मज्ञान प्राप्त झाल्या-वर आपल्यासह सर्व जग ब्रह्मरूप आहे अशी भावना झाल्यावर, तीच ब्रह्मनिष्ठा तो निरंतर राखतो. ह्मणून सर्वत्र-सदा-सम असें जें अद्वयब्रह्माचें समदृष्टीचें वर्म (तत्व) तें तो पूर्णपणें जाणतो, आणि त्या कारणानें आपणच तें अद्वयब्रह्म आहों असें तो मानतो. ह्मणून तो विषयसंग न सोडतां, व इंद्रियांना बंध (नियमन) न करतां, एक कामनेचा (इच्छेचा) भाग सोडून तो निःसंग संगभोग भोगतो.--असा जो निःसंग

तरी मृगजळाचेनि पूरें । जैसें न लोटिजे
कां गिरिवरें । तैसा शुभाशुभीं न विकरे ।
पातलिया जो ॥ १०३ ॥
तोचि तो निरुता । समदृष्टी तत्त्वता ।
हरी म्हणे पंडुसुता । तोचि ब्रह्म ॥ १०४ ॥

संगभोगी आहे-- त्याला सुखदुःखें प्राप्त झालीं असतां, मृगजळाच्या पुरानें मेरूपर्वत जसा वाहून जात नाहीं, त्याप्रमाणें त्याला या संगभोगापासून विकार होत नाहीं.-अर्थात तो मनाचा इतका स्थीर झालेला असतो.-असा जो विकार न पावणारा, तत्त्वता समदृष्टी, तोच ब्रह्म असें समज.

हे विरक्तांचिये दृष्टी । जैं न्याहाळिजे किरिटी ।
तें पांडुरोगाचिये पुष्टी । सारिखे
दिसे ॥ ११९ ॥
म्हणोनि विषय भोगीं जें सुख । तें साद्यंताचि
जाण दुःख । परि काय करिती मूर्ख ।
न सेवितां न सरे ॥ १२० ॥
तें अंतर नेणती बापुडे । म्हणोनि अगत्य सेवणें
घडे । सांगे पूयपंकीचे किडे । काय चिळशी
घेती ॥ १२१ ॥
तयां दुःखिया दुःखचि जिव्हार । ते विषय
कर्दमींचे दर्दुर । ते भोगजळींचे जळचर ।
सांडिती कैंवी ॥ १२२ ॥
आणि दुःखयोनी जिया आहती । तिया
निरर्थका तरी नव्हती । जरी विषयांवरी विरक्ती । धरिती जीव ॥ १२३ ॥
ना तरी गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे
कष्ट । हे विसावेवीण वाट । वाहवी
कवणें ॥ १२४ ॥
जरी विषयीं विषयो सांडिजेल । तरी महादोषीं
कें वसिजेल । आणि संसार हा शब्द नव्हेल ।
कठिका जगीं ॥ १२५ ॥
म्हणोनि अविद्यांजात नाथिलें । ते तिहींचि
साच दाविलें । जिहीं सुखबुद्धि घेतले ।
विषय दुःख ॥ १२६ ॥

विषयभोगांकडे पाहिलें असतां ते पंडुरोगाच्या पुष्टी (सुजे) प्रमाणें दिसतात; म्हणून विषयभोगांत ज्याला सुख म्हणून म्हणतात, तें अव्वल अखेर दुःखच असतांहि मूर्ख लोक त्या विषयांचा उपभोग घेत असतात. कारण त्यांना त्यांतील अंतर (परिणाम) कळतच नाहीं, म्हणून पुवांतील किड्यांस जसा पुवाचा किळस येत नाहीं, त्याप्रमाणें हा विषयभोग परिणाम अजाणत्या लोकांस सुटत नाहीं. त्या दुःखी प्राण्यास दुःख हीच जिव्हारिची (आवडती) वस्तु असते, म्हणून विषयरूप चिखलांतील बेडुक अथ भोगरूप पाण्यांतील ते जल, चरच बनलेले असतात. त्यायोगानें त्यांच्यानें विषय सोडवत नाहींत. कदाचित् सर्वच प्राणी जर विषयविरक्त होतील, तर दुःखयोनी ज्या आहेत त्या निरर्थक होऊन गर्भवासादि संकटें आणि जन्मापासून मरणकाळपर्यंत संसाररूप यात्रेंतील कष्ट विश्रांति घांचून भोगण्यास कोण राहील ? आणि विषयी लोकांनीं विषयच सोडले, तर महादोषांना रहाण्याला कोठेंहि जागा न राहून संसार हा शब्द जगांत लटका ठरणार नाहीं का ? म्हणून अविद्याजातां (मायें) ला ज्यांनीं खोटी ठरविली आहे, तिचें खोटेपण विषयदुःखांत ज्यांच्या बुद्धीनें सुख मानलें आहे, त्यांनींच या अविद्याजाताला (मायेला) सत्यत्व आणून दाखविलें आहे.

आईकें सकळ संमतें जगीं । अर्जुना पाहें तोचि योगी । जो कर्म करूनि रागी।
नोहेचि फळी ॥ ४३ ॥
आइके योगी आणि संन्यासी जनीं । हें एकां

अर्जुना, कर्में करून जो कर्मफळाची इच्छा धरीत नाहीं, त्यालाच जगांत सर्वानुमतें योगी असें म्हणतात. आणि योगी व संन्यासी यांना जगांत निरनिराळे जरी मानतात, तरी विचार करून पहातां ते दोन्हीहि

सिनाने झणी मानी । येऱ्हवीं विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ॥ ३९ ॥ सांडिजे दुजया नामाचा आभास । तरी योग तोचि संन्यास । पाहतां ब्रह्मीं नाहीं अवकाश । दोहींमाजी ॥ ४० ॥

एकच आहेत. दुसऱ्या नांवाचा आभास नाहींसा झाला, झणजे योग तोच संन्यास आहे असें वाटेल, आणि पाहू जातां ब्रह्माच्या ठिकाणीं या दोहोंमध्यें कांहीं अवकाश (भेद) नाहीं.

ऐके संन्यासी तोचि योगी । ऐसी एक वाक्यतेचि जगीं । गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरीं ॥ ९२ ॥ जेथ संन्यासिला संकल्प तुटे । तेथेंचि योगाचें सार भेटे । ऐसें हें अनुभवाचें घटें । साचें जया ॥ ९३ ॥ तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा । जो आत्मबोधाचा बोवरां । पहुडला असे ॥ ९२ ॥ जयाचें सुखदुःखाचेनि आंगें । झगडलें मानस चेवो नेघे । विषयपासींहि आलियां से न रिघे । हें काय झणऊनि ॥ ९३ ॥ इंद्रियें कर्मांच्या ठायीं । वाढीनलीं परि कहीं । फळहेतूचि चाड नाहीं । अंतःकरणीं ॥ ९२ ॥ असतेनि देहें एतुला । जो चेतूचि दिसे निदेला । तोची योगारूढ भला । बोळखे तू ॥ ९५ ॥ तया स्वांतःकरणजिता । सकळ कामोपशांता । परमात्मा परौता । दूर नाहीं ॥ ८१ ॥ जैसा किडाळाचा दोष जाये । तरी पंधरे तेचि होये । तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्प लोपीं ॥ ८२ ॥

शिवाय अनेक शास्त्रसंमतांनीं संन्यासी तोच योगी अशा एकवाक्यतेच्या अनेकांनीं गुढ्या झणजे ध्वज उभारले आहेत. सोडलेला संकल्प तुटतांच–अर्थात निःशेष नाहींसा होण्याबरोबर योगाचें सार (तत्व) प्राप्त होतें अशाबद्दल त्यांचे दृढतर असे खरे अनुभव आहेत. आतां योगारूढ कसा ओळखावा त्याचीं लक्षणें ऐक.–आत्मबोधाच्या खोलीमध्यें निजलेला असून, ज्याच्या इंद्रियरूपी घरांत विषयांच्या येरझारा (हेलपाटे) होत नाहींत; आणि शारीरिक सुखदुःखाच्या योगानें मनाला धक्का जरी बसला, तथापि ज्याचें मन जागें होत नाहीं–अर्थात सुखदुःखाच्या योगानें विकार पावत नाहीं, आणि विषय जवळ आले असतांहि ते काय आहेत हें पहाण्या संबंधानें ज्याच्या अंतःकरणांत आठवणीचा रिघाव होत नाहीं; आणि कर्में करण्याविषयीं इंद्रियें प्रवृत्त झालीं असतां, त्याच्या अंतःकरणांत फळहेतूची चाड उत्पन्न होत नाहीं;–अशा प्रकारानें जो देहधारी जागेपणींच निजलेला–अर्थात संसार पराङ्मुख दिसतो, तोच भला (उत्तम) योगारूढ आहे असें समज. अशा प्रकारें आपल्या सर्व इच्छा शांत करून जो स्वांतःकरणविजयी होतो त्याला निराळा परमात्मा दूर नाहीं–अर्थात तोच परमात्मरूपी बनतो–याला दृष्टांत–सोन्यावरचें हिणकट जळून गेल्यावर जसें पंधाच्या दराचें (हलीचा दर जवळ जवळ दुप्पटीचा आहे) चोख सोनें बनतें, तद्वत संकल्परूपी हिणकट नाहींसें होण्याबरोबर जीवालाच ब्रह्मत्व येतें.

विपायें अहंभाव ययाचा जाईल । मी तेचि जरी हा होईल । तरी मग काय कीजेल । एकलेया ॥ ११६ ॥ दीठीची पहातां निविजे । कां तोंड भरोनि बोलिजे । नातरी दाटूनी खेंव दीजे । ऐसें कोण आहे ॥ ११७ ॥

अशा प्रकारें अहंभाव जाऊन ब्रह्मत्व प्राप्त झाल्यास–अर्जुन हाच जर मी होईल, तर मग आपण (श्रीकृष्णानें) एकट्यानें काय करावें ? कोणाकडे डोळेभरून पहातांच समाधान मानावें ? कीं तोंड भरून कोणाजवळ बोलावें ? अथवा आनंदानें कोणाला खेंव द्यावी ? असा दुसरा मग आपल्याला कोण

आपुलिया मना बरवी । असमायी गोठी
जीवीं । ते कवणेसीं चावळावी । जरी
ऐक्य जाहलें ॥ ११८ ॥
या परी बापपुण्यपवित्र । जगीं भक्तीबिजा-
सी सुक्षेत्र । तो श्रीकृष्णकृपे पात्र ।
याचि लागीं ॥ १२६ ॥
मग ऐका जें पांडवें । ह्मणितलें म्यां ब्रह्म हो
आवें । तें अशेषहि देवें । अवधारिलें ॥ १४७॥
तेथ ऐसेंचि एक विचारिलें । जे या ब्रह्मत्वाचे
डोहळे जाहले । परि उदरा वैराग्य आहे आलें ।
बुद्धीचिया ॥ १४८ ॥
येन्हवी दिवस तरी या अपुरे । परि वैराग्य
वसंताचेनि भरें । जे सोहंभाव महुरें ।
मोडोनि आला ॥ १४९ ॥
ह्मणोनि प्राप्तिफळीं फळतां । ययासी वेळ
न लगेल आतां । होय विरक्त ऐसा अनंता ।
भरंवसा जाहला ॥ १५० ॥
ह्मणे जें जें हा अधिष्ठील । तें आरंभीच
यया फळेल । ह्मणोनि सांगितला न वचेल ।
अभ्यास वायां ॥ १५१ ॥
ऐसें विवरोनियां श्रीहरी । ह्मणितलें
तिये अवसरीं । अर्जुना हा अवधारीं ।
पंथराज ॥ १५२ ॥
तेथ प्रवृत्ति तरुच्या बुडीं । दिसती निवृत्ति-
फळाचिया कोडी । जिये मार्गींचा कापडी ।
महेश अझुनि ॥ १५३ ॥
पैं योगिवृंदें वहिलीं । आडवी आकाशीं
निघालीं । कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं ।
धोरण पडिला ॥ १५४ ॥
तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें । धांव घेतली
एकसरें । कीं येर सकळ मार्ग निदसुरें ।
सांडूनियां ॥ १५५ ॥
पाठीं महर्षी येणें आले । साधकांचे सिद्ध जाह-
ले । आत्मविद थोरावले । येणेंचि पंथें ॥१५६
हा मार्ग जैं देखिजे । तैं ताहानभूक विसरिजे ।
रात्रीं दिवस नेणिजे । वाटें इये ॥ १५७ ॥

आहे ? अथवा यांचें माझें ऐक्य होईल, तर जीवापली-कडची व आपल्या मनांत न मावणारी जिव्हाळ्याची गोष्ट तरी कोणाजवळ बोलावी ? असा श्रीकृष्णास विचार पडून अन्योपदेशाच्या निमित्तानें त्यांनीं अर्जुनास साधुलक्षणें सांगण्यास आरंभ केला.—याजवरून केवळ ब्रह्मस्थितींत रहाण्यापेक्षां देव आणि भक्त अशा स्वरूपानें रहाण्यांतच कांहीं विशेष आहे असा देवाचा अंतर्भाव दिसतो, असो. अर्जुनावर श्रीकृष्णाची इतकी अलौकिक कृपा होती, त्याचें कारण असें दिसतें, कीं--अर्जुन हा श्रेष्ठ, पवित्र, पुण्यवान असून, त्याचें अंतःकरणरूपी सुक्षेत्र भक्तीबीज पेरण्यास फारच उत्तम होतें ह्मणून मी ब्रह्म व्हावें असें अर्जुनानें उद्गार काढले. ते देवांनीं ऐकून असा विचार केला, कीं ज्या अर्थीं अर्जुनाला ब्रह्म होण्याचे डोहळे लागले आहेत, त्या अर्थीं याच्या बुद्धींत वैराग्याचा गर्भसंभव झाला असून गर्भाला दिवस जरी अपुरे आहेत, तथापि वैराग्यरूपी वसंताच्या भरानें सोहंभावरूपी (ब्रह्म मी अशा) मोहरानें तो अगदीं वांकून गेला आहे. ह्मणून फळ (मोक्ष) प्राप्ती होण्यास, जितका हा विरक्त व्हायला पाहिजे, तितकी विरक्तता याच्या आंगीं बाणली आहे; त्या अर्थीं हा जें कांहीं करण्यास आरंभ करील, त्याची प्राप्ती त्याला अगोदरच होईल, इतक्या योग्यतेस तो आला असल्यानें त्याला अभ्यास (योग) सांगितला असतां वायां जाणार नाहीं, असा श्रीकृष्णास भरंवसा आला.-आणि-वर सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून श्रीकृष्ण ह्मणाले--अर्जुना, आतां तुला पंथराज (श्रेष्ठयोगमार्ग) सांगतों, ऐक. अर्जुना, ज्या प्रवृत्तिवृक्षाच्या (संसाररूपी वृक्षाच्या) बुडाशीं पहातां निवृत्तिफळाच्या (मोक्षाच्या) कोडी (कोटी संख्येच्या गणनेनें) दिसतात,--असा जो प्रवृत्तिवृक्षाच्या बुडाशीं जाणारा मोक्षमार्ग आहे,--त्या मार्गाचे महेश (श्रीशंकर) अजून यात्रेकरूच आहेत. या मोक्षमार्गाकडे योग्यांचे समुदायच्या समुदाय आकाशपंथानें वांकड्या तिकड्या मार्गानें निघाले असून त्यांच्या अनुभव पावलानें हा सरळ मार्ग झाला आहे, ह्मणून अज्ञानाकडे वळणारे दुसरे सर्व मार्ग सोडून आत्मबोधेच्छूंनीं या सरळ मार्गाकडे धांव घेतली. मार्गे जे महर्षी झाले, त्यांनीं याच मार्गाचें अवलंबन करून (कांहीं) सावकांचें सिद्ध झाले, आणि कांहीं

चालतां पाऊल जेथ पडे । तेथ अपवर्गाचीं खाणी उघडे । आव्हांटलिया तरी जोडे । स्वर्गसूख ॥ १९८ ॥

आत्मविद (आत्मज्ञाते) होऊन ब्रह्मज्ञानानें थोरपणा पावले. अर्जुना, हा मार्ग एकदां का दृष्टीस पडला--अर्थात त्या पंथाचा अनुभव आला--ह्मणजे तहान--भुकेचा विसर पडून या मार्गक्रमणांत दिवसरात्रीचेंहि भान रहात नाहीं.--या मार्गाची थोरवी किती ह्मणून सांगावी?--हा मार्ग चालतांना जेथें जेथें पाऊल पडेल, तेथें तेथें प्रत्यक्ष मोक्षाची खाणच उघडली आहे असें दिसेल. कदाचित् या मार्गाला जात असतां आडमार्गावर पाऊल पडलें, तरी त्या योगानें स्वर्गसुख प्राप्त होतेंच.

आइके देह होय सोनियाचे । पारि लाघव घे वायूचें । जे आप आणि पृथ्वीचे । अंश नाहीं ॥ १९९ ॥ मग समुद्रा पैलिकडील देखे । स्वर्गींचा आलोच आइके । मनोगत बोळखे । मुंगियेचे ॥ २६९ ॥ पवनाचा वारिकां वळघे । चाले तरी उदकीं पाऊल न लागे । येणें येणें प्रसंगें । येती बहुता सिद्धी ॥ २७० ॥

--शक्ती-रूप-दृष्टी, त्याच प्रमाणें बळ यांहींकरून योग्याचें शरीर सुसंपन्न होतें व त्याचा देह सोन्यासारखा होत असून, त्यांतील आप (उदक) आणि पृथ्वी यांचें अंश नाहींसे होतात, आणि वायूचें लाघव (लघुत्व अथवा हलकेपण) अर्थात चापल्य प्राप्त होतें.--अशी योग्याची देहस्थिती झाल्यावर--त्याला समुद्रापलीकडील दिसतें, स्वर्गांतले बोल ऐकूं येतात, आणि मुंगीच्या मनांतील देखील अभिप्राय समजतात.त्याला वायुरूप घोड्यावर बसतां येतें, आणि पाण्यावरून तो चालूं लागला तरी त्याच्या पायाला पाणी लागत नाहीं. अशा अशा प्रकारच्या प्रसंगानुरूप त्याला अनेक सिद्धी प्राप्त होतात.

आइके कमलगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें । जेथ चैतन्य आधातुरें । होऊनि असिजे ॥ २८० ॥ देखे साधक निघोनि जाये । मागां पाउलांची वोळ राहे । तेथ ठायीं ठायीं होये । अणिमादिक ॥ २९७ ॥ गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होये । तो होऊनि ठाके ॥ ३१० ॥ जे आकाराचा प्रांत । जो मोक्षाचा एकांत । जेथ आदि आणि अंत । विरोनि गेले ॥ ३२२ ॥ जें महाभूतांचें बीज । जें महातेजाचें तेज । एवं पार्था जें निज । स्वरूप माझें ॥ ३२३ ॥ तें हें चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रुपा-

हृदयामध्यें महदाकाश ह्मणून जें दुसरें आहे, त्या आकाशांत चैतन्य अधांतरी असतें.--तें अधांतरी असणारें चैतन्य आपणच बनून जाण्याकरतां जे साधक असतात--ते साधक ज्या वाटेनें चालून जातात, त्या वाटेवरील त्यांच्या प्रत्येक पावला पावलाच्या ठिकाणीं अणिमादिक अष्टसिद्धी उत्पन्न होतात.-अर्जुना, हें जें मी स्वरूप धारण केलें आहे, तें कसें आहे ह्मणशील तर--गगनांत गगनाचा लय व्हावा, असें जें कांहीं आहे, त्याचा जे अनुभव घेऊन ब्रह्मच होऊन जातात--त्या गगनांत मिसळण्याचा हा जो--आकाराचा प्रांत (शेवट)--ह्मणजेच--मोक्षाचा एकांत, ह्मणजे ज्या ठिकाणीं आदि (प्रारंभ) आणि अंत (शेवट) यांचा लय होतो, व जे महाभूतांचें (पंचमहाभूतांचें) बीज, आणि महातेजाचें तेज असें जें माझें निज-[illegible]प, तें नास्तिक लोकांनीं भक्तवृंदांचा (समुदा-

सीं आली । देखोनि नास्तिकीं नोकिलीं ।
भक्तवृंदें ॥ ३२४ ॥

हां होजी अवधारिलें । जें हें साधन तुह्मी नि-
रूपिलें । तें आवडतयाहि अभ्यासिलें ।
फावो शकें ॥ ३३७ ॥
कीं योग्यतेवीण नाही । ऐसें हन आहे
कांहीं । तेथ श्रीकृष्ण ह्मणती काई । ध-
नुर्धरा ॥ ३३८ ॥
हें काज कीर निर्वाण । परि आणिकहि जें कांहीं
साधारण । तेंही अधिकाराचे वोडवेवीण । का-
य सिद्धी जाय ॥३३९॥
पैं योग्यता जे ह्मणिजे । ते प्राप्तीचे आधीं न
जाणिजे । कां जें योग्य होऊनि कीजे । तें
आरंभिलें फळे ॥ ३४० ॥
तरी तैसी येथ कांहीं ॥ साविया ची केणी
नाहीं । आणि योग्यतेचि काई । खाणी
असे ॥ ३४१ ॥
नावेक विरक्त । जाहला देहधर्मीं नियत । तरी
तोचि नव्हे व्यवस्थित । अधिकारिया ॥३४२ ॥
जो रसनेंद्रियाचा अंकिला । कां निद्रेसीं
जिवें विकला । तो नाहीं येथ ह्मणितला ।
अधिकारिया ॥ ३४३ ॥
अथवा आग्रहाचिये बांदोडी । क्षुधातृषा कों-
डी । आहारातें तोडी । मारूनियां ॥ ३४४ ॥
निद्रेचिया वाटा न वचे । ऐसा दृढिवेचेनि अ-
वतरणें नाचे । तें शरीरचि नव्हे तयाचें । मग
योग कवणाचा ॥ ३४७ ॥
ह्मणोनि अतिशयें विषय सेवावा । ऐसा बोध
नोहावा । का सर्वथा निरोधावा ।
हेंही नको ॥ ३४८ ॥
आहार तरी सेविजे । परि युक्तीचेनि मापें म-
विजे । क्रियाजात आचरिजे । तयाचि
स्थिती ॥ ३४९

यांचा) छल केल्याकारणानें, कोमल अशा चतुर्भुज रूपानें प्रकट होऊन शोभारूपास आलें आहे.

श्रीकृष्णांनीं अर्जुनास योग सांगितल्यावर अर्जुन श्रीकृष्णास ह्मणतो—महाराज, आपण जो योग सांगितलात, तो मी चांगला ऐकला. परंतु असें विचारतों, कीं हा योग हवा त्याला होण्यासारखा आहे, किंवा योग्यतेवांचून होण्यासारखा नाहीं असें आहे कीं काय? तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले.- अरे, हा योग तर खरोखर मोक्षप्राप्तीचा आहे, पण साधारण एकादें कार्य असलें तर तें देखील अधिकाराची योग्यता असल्या वांचून सिद्धीस जात नाहीं; ह्मणून खरोखर जिला योग्यता ह्मणून ह्मणायची, ती प्राप्तीच्या आधीं समजली जात नाहीं. कारण योग्य होऊन कोणत्याहि कर्माचा आरंभ केल्या वांचून तें फलत नाहीं. ह्मणून बाबा,योग्यता ही बाजारांत मिळणारी वस्तु नाहीं, अथवा योग्यतेची खाणहि कोठें नाहीं. क्षणैक विरक्त होऊन देहधर्मांला कोणी बांध घालील येवढ्यानें योगाला कोणी अधिकारी होणार नाहीं. रसनेंद्रियाचा अंकित (खादाडखोबरा) अथवा निद्रेचा गुलाम, असा जो कोणी, तो योगाचा अधिकरी होत नाहीं, अथवा क्षुधा-तृष्णा आग्रहानें कोंडणारा, अथवा झोंपच न घेणारा, अशा प्रकारानें नाचणारा-अर्थात चार चार करणारा जो आहे, त्याचे आधीं शरीरच नव्हे मग योग तो कोणाचा व कोणी करावा ह्मणून अत्यंत विषय सेवन अथवा विषयांचा सर्वथा निरोध या दोन्हीहि गोष्टी (योगास) नकोत. आहाराचें सेवन तर करावें, पण युक्तीच्या नियमितपणानें; आणि त्याच प्रमाणें सर्व क्रिया कराव्या, परंतु त्याहि नियमितपणानेंच आचराव्या; बोल बोलावे, ते जसें कांहीं तोलूनच; चालावें, परंतु ते देखील परिमित पावलानें; आणि वेळेवर झोंपही घ्यावी; जागावें, परंतु तें जाग्रण मित असावें; ह्मणजे येवढ्यानें धातुसाम्य राहून सुख होईल. अशा युक्तीच्या हातानें (मार्गानें) इंद्रियांना त्यांचे त्यांचे विषय दिले असतां त्या योगानें मन संतोषाला वाढिवतें. बाहेर जसजशी युक्तीची मुद्रा दिसूं लागेल, तसतसें आंत सुख वाढत जाऊन अभ्यास न करतां सहजच योग घडेल.—कसा ह्मणशील, तर—भाग्याच्या आधिक्यानें उद्योगाचें निमित्त

मापितला बोल बोलिजे । मितलिया पाउलीं चालिजे । निद्रेही मान दीजे । अवसरें एकें ३९० जागणें जरी जाहालें । तरी व्हावें तें मितलें । येतुलेनि धातुसाम्य संचलें । असेल सुख ॥३९१॥ एस युक्तीचेनि हातें । जैं इंद्रियां वोपिजे भातें । त संतोषासी वाढतें । मनचि करी ॥ ३९२ ॥ बाहेर युक्तीची मुद्रा पडे । तंव आंत आंत सुख वाढे । तेथें सहजचि योग घडे । नाभ्यासितां ॥ ३९३ ॥

जैसें भाग्याचिंये भडसें । उद्यमाचेनि मिषें । मग समृद्धि जात आपैसें । घर रिघे ॥ ३९४ ॥ तैसा युक्तिमंत कौतुकें । अभ्यासाचिया मोहरा ठाके । आणि आत्मसिद्धीचि पिके । अनुभव तयाचा ॥ ३९५ ॥

ह्मणोनि युक्ति हे पांडवा । घडे जया सदैवा । तो अपवर्गाचिये राणीवा । अळंकरिजे ३९६ युक्ति योगाचें आंग पावे । ऐसे प्रयाग जेथ होय बरवें । तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावें । मानस जयाचें ॥ ३९७ ॥

तयातें योगयुक्त तूं ह्मण । हेंही प्रसंगें जाण । तें दीपाचें उपलक्षण । निर्वातीचिया ॥३९८॥ ऐसें हितासी जें जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुखें । येन्हवीं सोपें योगासारिखें । कांहीं आहे ॥ ३९९ ॥

ह्मणोनि आसनाचिया गाढिका । जो आह्मी अभ्यास सांगितला निका । तेणें होईल तरी होकां । निरोध ययां ॥ ३९४ ॥ येन्हवीं तरी येणें योगें । जैं इंद्रियां विंदाण लागे । तैं चित्त भेटों रिगे । आपणपेया ॥ ३९५ ॥ परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियातें आपण देखे । देखत खेवो वोळखे । ह्मणे तत्त्व हें मी ॥ ३९६ ॥ तिये वोळखीचि सरिसें । सुखाचिया साम्राज्यीं बैसे । मग आपण पां समरसें । विरोनि जाय ॥ ३९७ ॥

करून सर्व संपत्ती घरांत शिरते, तसा हा युक्तीचा प्रकार सहज योगाला घेऊन येतो. ह्मणून युक्तिवान् जो आहे, तो अभ्यासाच्या मार्गावर उभा रहातो, त्या कारणानें त्याला अनुभवाच्या योगानें आत्मसिद्धीचें पीक लाभतें. यास्तव जो दैववान आहे त्यालाच ही युक्ति साधते आणि तोच मोक्षरूप राज्याचा अलंकार होतो. त्या युक्तीला योगाचें आंग (साह्य) मिळालें ह्मणजे क्षेत्रसंन्याशाला मानस स्थीर करण्याला दुसरा याहून चांगला प्रयागसंगमच नाहीं.–अशा युक्तीयोगरूप संगमावर मानस स्थीर करणाऱ्यालाच अर्जुना, तू योगयुक्त ह्मण, आणि प्रसंगानुरूप निर्वातीच्या दिव्याचें उपलक्षण हेंच आहे असें समज. खरोखर पहातां युक्तियोगा इतकें दुसरें (कोणतेंच साधन) सोपें नाहीं, आणि तोच मार्ग इंद्रियांना खरोखर कल्याणकारक असतां, त्यापासून इंद्रियांना दुःख होतें. ह्मणून आह्मी जो आसनयोग सांगितला, त्याच्या दृढपणानेंच या इंद्रियांना अटक झाली तर होईल.आणि अशा प्रकारानें इंद्रियनिग्रह होईल तेव्हांच चित्त आपणपेयाला (आपले आपल्याला अथवा ब्रह्माला) भेटायला जाईल.–आणि अशा वेळीं परतोन पाठमोरे होऊन चित्त आपणच आपल्याला पाहूं लागेल, तेव्हां दृष्टीभेटीबरोबर ओळख पटून तत्त्वच (ब्रह्म) मी आहें असें चित्त ह्मणतें.– अशी चित्ताला ब्रह्माची– ओळख पटल्या बरोबर चित्त सुखाच्या साम्राज्यावर बसतें, त्यावेळीं चित्ताचा समरस (ब्रह्मानंदांत) लय होतो. इंद्रियें ज्या ब्रह्मा-

जया परते आणिक नाहीं । जयाते इंद्रियें नेणती कहीं । तें आपणचि आपुलयाठायीं । होउनि ठाके ॥ ३६८ ॥
मग मेरूपासूनि थोरें । देहदुःखाचेनि डोंगरें । दाटिजो पां परी भारें । चित्त न दाटे ॥३६९॥
का शस्त्रेवरी तोडिलिया । देह अग्नीमाजी पडलिया । चित्त महासुखीं पहुडलिया । चैवो नये ॥ ३७० ॥
ऐसें आपणपां रिगोनि ठायें । मग देहाचि वास न पाहे । आणिकचि सुख होऊनि जाये । ह्मणुनि विसरे ॥ ३७१ ॥
जया सुखाचिया गोडी । मन आर्तीची सेचि सोडी । संसाराचिया तोंडीं । गुंतले जे॥३७२॥
जे योगाची बरव । संतोषाची राणीव । ज्ञानाची जाणीव । जयालागीं ॥ ३७३ ॥
तें अभ्यासिलेनि योगें । सावयव देखावें लागे । देखिलें तरी आंगें । होइजेल गा ॥ ३७४ ॥
तरी तोचि योग बापा । एकेपरी आहे सोपा । जरी पुत्रशोक संकल्पा । दाखवीजे ॥ ३७५ ॥
हा विषयांतें निमालिया आइकें । इंद्रिये नेमाचिया धारणीं देखे । तरी हिये घालूनि मुकें । जीवित्वासीं ॥ ३७६ ॥
ऐसें वैराग्य हें करीं । तरी संकल्पाची सरे वारी । सुखें धृतीचिया धवळारीं । बुद्धि नांदे ॥ ३७७ ॥
बुद्धिधैर्या होय वसौटा । तरी मनातें अनुभवाचिया वाटा । हळू हळू आणूनि करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ॥ ३७८ ॥
आतां नियमचि हा एकला । जीवें करावा आपुला । जैसा कृतनिश्चयाचिया बोला । बाहेरा नोहे ॥ ३८० ॥
जरी येतुलेनि चित्त स्थिरावें । तरी काजा आलें स्वभावें । नाहीं तरी घालावें । मोकळूनी ॥ ३८१ ॥
मग मोकळिलें जेथ जाईल । तेथूनि नियमूं

नंदाला जाणत नाहींत, व ज्या ब्रह्मानंदाच्या पलीकडे दुसरे कांहीं नाहीं, तोच ब्रह्मानंद चित्त आपलें आपणच होऊन बसतें.—अशा प्रकारें ब्रह्मानंदीं ज्याच्या चित्ताचा लय झाला,—त्याच्या देहावर मेरुपर्वतापेक्षांही मोठाले दुःखांचे डोंगर कोसळून, त्या भारानें त्याचा देह दडपला गेला, तथापि त्यापासून त्याचें चित्त दडपलें जात नाहीं. आणि अशा प्रकारें ज्याचें चित्त महासुखांत पहुडलें (निजलें—निमग्न) असेल, त्याचा देह शस्त्रानें तोडला, अथवा त्याचा देह अग्नींत पडला, तथापि त्याचें चित्त जागेंच होत नाहीं—अर्थात त्याला देहाचा विसर होतो. अशा प्रकारानें चित्त मूळ ठाया (जागे) वर जाऊन पोंचलें असतां, चित्त देहाचा पुसतपासहि करीत नाहीं. कारण चित्त अतिशय सुखांत जाऊन पडत असल्यानें त्याला देहाचा विसरच होतो. आणि चित्ताला ब्रह्मसुखाची गोडी लागल्यानें संसारांत गुंतलेल्या मनाच्या इच्छेची आठवणच सुटते. ह्मणून योगाची शोभा (वैभव), संतोषाचें राज्य, आणि ज्ञानाची जाणीव (ब्रह्म),—हीं ज्याला पाहिजे असतील, त्यानें साद्यंत योगाभ्यास करून (ब्रह्म) पहावें, आणि तें दिसल्या बरोबर आपणच ब्रह्म होऊन जावें. अर्जुना, हा योग एकेपरी फार सोपा आहे; परंतु या योगांत संकल्परूपी पुत्रशोक आहे. हा संकल्परूपीपुत्र विषय नष्ट झालेला ऐकेल आणि इंद्रियें नेमाच्या धोरणास लागलेलीं पाहील, त्याबरोबर तो उरीं फूटून प्राणास मुकेल.—अशा प्रकारानें संकल्पास मारून जो वैराग्य प्राप्त करील (वैराग्यशील होईल)त्याच्याच संकल्पाच्या वाऱ्या (येरझारा) संपून धैर्यरूप मंदिरांत त्याची बुद्धी सुखानें नांदेल. धैर्य हेंच जर बुद्धीचें आश्रय स्थान होईल, तर मनाला वाटेनें हळूहळू आणून आत्मभुवनांत त्याची प्रतिष्ठा (स्थापना) करील. मात्र कृतनिश्चयाच्या बोलाबाहेर जाणार नाहीं असा एक जिवाभावापासून आपला नियमच केला पाहिजे. येवढ्यानें चित्त स्थिर झालें, तर कामच झालें, नाहींतर चित्त जिकडे ह्मणून जाईल, तिकडे त्याला बेलाशक मोकळें सोडून द्यावें. अशा प्रकारें चित्ताला मोकळें सोडून दिल्यावर, तें जेथें जाईल त्या ठिकाणाहून आपणच नियम करून घेऊन परत येईल, आणि मग सहजच चित्ताला

घेऊनि येईल । ऐसेनि स्थैर्यचि होईल ।
सावियाचि कीं ॥ ३८२ ॥
पाठीं केतुलेनि एके वेळे । तया स्थैर्याचेनि
मेळें । आत्मस्वरूपा जवळें । येईल सहजें ३८३
तयातें देखोनि आंगा घडेल । तेथ अद्वैतीं द्वैत
बुडेल । आणि ऐक्यतेजें उघडेल ।
त्रैलोक्य हें ॥ ३८४ ॥
आकाशीं दिसे दुसरें । तें अभ्र जैं उरे । तैं
गगनचि कां भरे । विश्व जैसें ॥ ३८५ ॥
तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्याचि
आघवें होये । ऐसी प्राप्ति सुखोपायें ।
आहे येणें ॥ ३८६ ॥
तरी मी तंव सकळ देहीं । असे येथ विचार
नाहीं । आणि तैसेंच माझ्याठायीं ।
सकळ असे ॥ ३९१ ॥
हें ऐसेंचि संचलें । परस्परें मिसळलें । बुद्धि
घेणे येतुलें । होआवें गा ॥ ३९२ ॥
येऱ्हवीं तरी अर्जुना । जो एकवटलिया भाव-
ना । सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ ३९३ ॥
भूताचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें।
केवळ एकतत्त्वचि माझें जाणें।सर्वत्रजो ॥३९४॥
मग तो एक हा मिया । बोलतां दिसतसे
वायां । येऱ्हवीं न बोलिजे तरी धनंजया ।
तो मीचि आहें ॥ ३९५ ॥
दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाड
जैसा । तो माझ्याठायीं तैसा । मी
तयामाजी ॥ ३९६ ॥
ह्मणोनि आपणपां विश्व देखिजे । आणि आपण
विश्व होइजे । ऐसें साम्यचि एक उपासीजे ।
पांडवा गा ॥ ४०९ ॥
परि वैराग्याचेनि आधारें । जरी लाविलें
अभ्यासाचिये मोहरें । तरी केतुलेनि एके
अवसरें । स्थिरावेल ॥ ४१९ ॥
कां जें यया मनाचें एक निकें । जें देखिलें गो-
डीचिया ठाया सोके । ह्मणोनि अनुभव सुखांचीं
कवतिकें । दावीत जाइजे ॥ ४२० ॥

स्थैर्य येईल. अशा प्रकारें आलेल्या स्थैर्यानें कांहीं वेळानें चित्त सहजच आत्मस्वरूपाजवळ जाईल. आत्मस्वरूपाला पाहतांच अद्वैतांत द्वैत बुडून जाऊन, चित्ताचें ऐक्य होण्यावरोवर हें त्रैलोक्य ऐक्यतेजानें भरून जाईल–अर्थात सर्वच ब्रह्मस्वरूप भासेल. याला दृष्टांत–आकाशांत दुसरें दिसणारें अभ्र नाहींसें होण्या-बरोबर जसें विश्वांत सर्वत्र आकाशच भरलेलें दिसतें, त्याप्रमाणें चित्ताचा लय होण्यावरोबर सर्वच चैतन्य बनून जातें–अशी सुखोपायानें या योगापासून प्राप्ती आहे.–अशी प्राप्ती झाल्यावर–मी सर्व देहांत आहें या गोष्टीचा मग विचार रहात नाहीं. कारण माझ्या देहांतहि सर्व आहेत–अशी भावना झाली असते.–ह्मणून परस्पर हे एकमेकांत–ह्मणजे आपण सगळ्यांत व सगळे आपल्यांत–मिसळलेले आहेत, असें बुद्धी घेईल येवढें आपण झाले पाहिजे.–अर्जुना, अशा प्रकारची बुद्धीची भावना करून–सर्वभूतीं अभिन्नपणानें मी आहें असें समजून जो माझें भजन करील, आणि भूतांच्या अनेकपणामुळें अंतःकरणांत जो अनेकत्व आणीत नसून मीच सर्वांतर्यामीं आहें, असें जो जाणतो; अर्जुना, तो एक आणि हा मी (निराळा) असें बोलणेंच अगदीं वायां (व्यर्थ) आहे, आणि–कांहींच न बोललें तरी तो तोच मी आहें असें समज. कसा ह्मणून ह्मणशील, तर दीप आणि प्रकाश यांची जशी एकाकारता असते, ह्मणजे दिव्यांत प्रकाश आणि प्रकाशांत दिवा–त्याप्रमाणें तो माझ्यांत आणि मी त्याच्यांत असतों. ह्मणून अर्जुना, आपणच विश्व व्हावें, आणि आपल्याच ठिकाणीं विश्व पहावें, अशी समदृष्टी होण्याकरतां उपासना करावी.–अशी समदृष्टी होण्यास–वैराग्याच्या आधारें (साह्यानें) अभ्यासाच्या मार्गावर मनाला लावलें, तर कांहीं वेळानें मन स्थिरावेल,–आणि समदृष्टीवर येईल.–कारण, या मनाचा एक गुण असा फार चांगला आहे, कीं त्याला जें दाखवावें, त्याचीच त्याला गोडी लागते, ह्मणून मनाला नेहमीं अनुभवाचीं कौतुकें दाखवीत जावीं.

तरी योगसाधन जितुकें । तें अवघेचि काय लटिकें । परि आपणयां अभ्यासें नटके । हेंचि ह्मणे ॥ ४२५ ॥
आंगीं योगाचें होय बळ । तरी मन केतुलें चपळ । काय महदादि हें सकळ । आपु नोहे ॥ ४२६ ॥

अर्जुना, मनाचा निग्रह होत नाहीं ह्मणून-सारें योगसाधन लटकें ह्मणण्यापेक्षां आपल्याला अभ्यास होत नाहीं असेंच ह्मण. कारण, आंगांत योगाचें बळ असल्यावर महदादि-मूळमायेलाहि ताब्यांत आणतां येते, तर योगबळापुढें मनाच्या चपळतेची गोष्ट कशाला बोलायला पाहिजे ?

मग ज्ञानाचिये वेळे । झांकती जाणिवेचे डोळे । जैसी तिरीं नाव न ढळे । टेंकली सांती ॥ ४ ॥
तैसी जाणीव जेथ न रिगे । विचार मागुता पाऊलीं निघे । तर्क आयणी नेघे । आंगीं जयाच्या ॥ ५ ॥
अर्जुना तया नांव ज्ञान । येर प्रपंच हें विज्ञान । तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान । हेंही जाण ॥ ६ ॥
तरी अवधारीं गा धनंजया । हे महदादिक माझी माया । जैसी प्रतिबिंबे छाया । निजांगाची ॥ १५ ॥
आणि इयेतें प्रकृती ह्मणिजे । जे अष्टधा भिन्न जाणिजे । लोकत्रय निफजे । इयेस्तव ॥ १६ ॥
हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं । तरी तेंचि गा आतां परियेसी । विवंचना ॥ १७॥
आप-तेज-गगन । मही-मारुत-मन । बुद्धि अहंकार हे भिन्न । आठै भाग ॥ १८ ॥
या आठांची जे साम्यावस्था । ते माझी परम प्रकृती पार्था । तिये नाम व्यवस्था । जीव ऐसी ॥ १९ ॥
जे जडातें जिववी । चेतनेतें चेतवी । मना करवीं मानवी । शोक मोहो ॥ २० ॥
पैं बुद्धीच्या आंगीं जाणणें । तें जिये जवळीकेचें करणें । जिया अहंकाराचे विंदाणें । जगचि धरिजे ॥ २१ ॥

ज्ञानासह विज्ञान सांगण्यास श्रीकृष्णांनीं सुरवात केली, तेव्हां विज्ञान समजून घेण्याची जरूर नाहीं, अशी अर्जुनाच्या मनांत शंका येईल या अर्थानें श्रीकृष्ण ह्मणतात.- अर्जुना, विज्ञान हें आधीं समजून घेतलें पाहिजे. कारण, ज्ञानप्राप्तीच्या वेळेस जाणणेपणाचे जे डोळे आहेत, ते तिरावर जाऊन नाव थडकली असतां, ती जशी हालत नाहीं, त्याप्रमाणें झांकून जातात.- अर्थात् जाणीवपणाचा जेथें रिघाव होत नाहीं. विचाराची चाल पुढें होत नसून मागच्या पावलानेंच परतते, आणि ज्याच्याविषयीं तर्कहि धांव घेत नाहीं, असें जें कांहीं आहे, त्याचें नांव ज्ञान. प्रपंचसंबंधीं-ह्मणजे जाणीवेच्या, विचाराच्या, आणि तर्काच्या आंतलें ज्ञान-तें विज्ञान; आणि याच प्रपंचज्ञानाविषयीं जी सत्यबुद्धी, तिचें नांव अज्ञान.-याच अज्ञानाला माया अथवा प्रकृती असें ह्मणतात; तिचें लक्षण सांगतों.-आपल्या आंगाचें जसें प्रतिबिंब असतें त्याप्रमाणें महदादि-महत्तत्त्वादि आदिकरून ही माझी माया (पडसावली) आहे. याच मायेला प्रकृति असें ह्मणतात. ही प्रकृती अष्टधाभिन्न-आठ प्रकारांनीं झाली आहे, आणि हिच्या पासूनच त्रैलोक्य उत्पन्न झालें आहे. प्रकृती अष्टधाभिन्न कशी आहे ह्मणून विचारशील तर सांगतों. आप (पाणी), तेज (अग्नी), गगन (आकाश), मही (पृथ्वी), आणि मारुत (वायु), आणि मन, बुद्धी व अहंकार. असे या प्रकृतीचे आठ भिन्न भाग आहेत. या आठांची (तत्वांची) जी साम्यावस्था (ऐक्य) ती माझी परम प्रकृती, आणि त्याच प्रकृतीला जीव असें ह्मणतात. ही प्रकृती जडाला जीव आणते, चेतनेला चेतविते, आणि मनाला शोक-मोह उत्पन्न करते. बुद्धीच्या आंगीं जाणणेपणाचा जो गुण आहे, तो प्रकृतीच्या सांनिध्यानें असून, ज्या अहंकाराच्या कौशल्यानें हें

तें सूक्ष्म प्रकृती कोडें । जैं स्थुळाचिया आंगा घडे । तैं भूतसृष्टीची पडे । टांकसाळ ॥ २२ ॥

जग धारण केलें आहे, तो अहंकार प्रकृतीपासूनच आहे. ही सूक्ष्मप्रकृती–अर्थात् न दिसणारी माया, आपल्या इच्छेनें स्थूलांत (अचेतनांत) मिळते, त्यावेळीं भूतसृष्टीची–अर्थात् प्राणिमात्राची टांकसाळच बनते.

चतुर्विध ठसा । उमटो लागे आपैसा । मोला तरी सरिसा । परि थरचि आनान ॥ २३ ॥

या टांकसाळेंत चार प्रकारची (जारज,अंडज,स्वेदज, व उद्भीज) अशीं नाणीं पडतात. तीं मोलाला एक सारखींच असतात, तथापि त्यांचे थर अर्थात् योनी मात्र निरनिराळ्या असतात. गणनेनें या थरांची संख्या ८४ लक्षांची आहे, तथापि या शिवाय दुसरे अमित थर असून या प्राणीरूप नाण्यानें आदिशून्याचा अर्थात् मायेचा गाभारा (भांडारखाना) भरलेला असतो.

होती चौऱ्यांशी लक्ष थरा । येरा मिती नेणिजे भांडारा । भरे आदि शून्याचा गाभारा । नाणेयासी ॥ २४ ॥

ऐसें एकतुकें पांचभौतिक । पडती बहुवस टांक । मग तिये समृद्धीचे लेख । प्रकृतीचि धरी ॥ २५ ॥

त्या गाभाऱ्यांत ह्या पंचभूतात्मक बहुवस (बहुत प्रकारच्या) नाण्यांची किती समृद्धी (विपुलता) असते तिचा लेख (गणना) फक्त मायाच करील.

जें आंखुनि नाणें विस्तारी । पाठी तयाची आटणी करी । माजी कर्माकर्माचिया व्यवहारीं । प्रवर्तु दावी ॥ २६ ॥

ही माया जी पंचभूतात्मक-अर्थात् प्राणीरूप नाणीं आंखून पाडते–ह्मणजे उत्पन्न करते आणि फिरून त्यांचा लय करते, त्यांच्या मध्यंतरीच्या स्थितींत ह्मणजे अस्तित्वकाळांत, त्यांच्या (प्राणीमात्रांच्या) व्यवहाराची वर्तणुक दाखिवते.

हें रूपक परी असो । सांगों उघड जैसें ये परियेसों । तरी नामरूपाचा अतिसो । प्रकृतीच कीजे ॥ २७ ॥

हा सांगितलेला रूपकाचा (अलंकाराचा) प्रकार झाला; परंतु उघड आतां असें समजून घे, कीं हा जो नामरूपाचा अतिशयपणा आहे, तो प्रकृतीच करते आणि ही प्रकृती माझ्या ठिकाणीं बिंबणारी असल्यानें–ह्मणजे माया हें माझें प्रतिबिंब असल्यानें, व जगाचा उत्पत्ति-लय माझ्या हातून होत असल्यानें जगाच्या आदि मध्य व अंतास–ह्मणजे उत्पत्ती-स्थिती व लयास मीच आहें.–कसा ह्मणशील तर–रोहिणीचें (मृगजळाचें) मूळ पाहूं गेलें असतां, तें जसें रश्मी (किरण) नसून केवळ सूर्यच आहे असें दिसतें, त्याप्रमाणें या मायेनें केलेल्या सृष्टीचा उपसंहार करून शेवट पहातां, त्यांत मीच आहें असें दिसतें.–ह्मणजे सूर्य आहे ह्मणून किरणें आहेत आणि त्यांपासून मृगजल–त्याचप्रमाणें मी आहें ह्मणून माया, आणि मायेपासून जगाचा उत्पत्ति-लय–अर्थात् मृगजलाचें मूळ जसा सूर्य, त्याप्रमाणें जगाच्या उत्पत्ति-लयाचें मूळ मी आहें.–आतां होय, दिसे आणि न दिसे ह्मणजे उत्पती-स्थिती आणि संहार हे जे प्रकार आहेत, ते माझे मा-

यां आहे ह्मणून होय, दिसे आणि न दिसे ह्मणजे उत्पती-स्थिती आणि संहार हे जे प्रकार आहेत, ते माझे मा-

यां आहे ह्मणून होय, दिसे आणि न दिसे ह्मणजे उत्पती-स्थिती आणि संहार हे जे प्रकार आहेत, ते माझे मा-

जैं उपसंहरूनि किजेल ठी । तैं मीचि आहें ॥ ३० ॥

ऐसें होय दिसे न दिसे । हें मजचि माजी असे । मिया विश्व धरिजे जैसें । सूत्रें मणी ॥ ३१ ॥

सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाच्या सूतीं वोंविले । तैसें म्यां जग धरिलें । सबाह्याभ्यंतरीं ॥ ३२ ॥

ह्मणोनि उदकीं रस । कां पवनीं जो स्पर्श ।
शशीसूर्यीं जो प्रकाश । तो मीचि
जाण ॥ ३३ ॥
तैसाचि नैसर्गिक शुद्ध । मी पृथ्वीच्या
ठायीं गंध । गगनीं मी शब्द । वेदीं
प्रणव ॥ ३४ ॥
नराच्या ठायीं नरत्व । जें अहंभाविये सत्त्व ।
तें पौरुष मी हें तत्व । बोलिजत असे ॥ ३५ ॥
अग्नि ऐसें आहाच । तेजीं नामाचें आहे
कवच । तें परतें केलिया साच । निज तेज
तें मी ॥३६ ॥
आणि नानाविध योनीं । जन्मोनि भूतें
त्रिभुवनीं । वर्तत आहाती जीवनीं ।
आपुलाल्या ॥ ३७ ॥
एकें पवनेचि पिती । एकें तृणास्तव जिती ।
एकें अन्नाधारें रहाती । जळें एकें ॥ ३८ ॥
ऐसें भूतप्रति आनान । जें प्रकृतीवशें दिसे
जीवन । तें आघवा ठायीं अभिन्न । मीचि
एक ॥ ३९ ॥
पैं आदिचेनि अवसरें । विरूढे गगनाचेनि
अंकुरें । जें अंतीं गिळी अक्षरें । प्रणव
पीठींची ॥ ४० ॥
जंव हा विश्वाकार असे । तंव जें विश्वाचि
सारिखे दिसे । मग महाप्रळय दशें । कैसेनि
नव्हे ॥ ४१ ॥
ऐसें अनादि जें सहज । तें मी गा विश्वबीज ।
हें हातातळीं तुज । देइजत असे ॥ ४२ ॥
मग उघड करूनि पांडवा । जैं हें आणिसी
सांख्याचिया गांवा । तैं ययाचा उपेग बरवा ।
देखसील ॥ ४३ ॥
परि हे अप्रासंगिक आलाप । आतां असतु
बोलो संक्षेप । जाण तपियांच्या ठायीं तप ।
तें रूप माझें ॥ ४४ ॥
बळियामाजी बळ । तें मी जाण अढळ ।
बुद्धिमंतीं केवळ । बुद्धि ते मी ॥ ४५ ॥
भूतांच्या ठायीं काम । तो मी ह्मणे आत्मा-

इयांतच आहेत, तथापि या विश्वाला मी कसें धरलें आहे ह्मणशील, तर दोरा जसा मण्यांना धरतो, त्याप्रमाणें जगाला मी धरतों. सुवर्णाचे मणी केले, आणि ते सुवर्णाच्याच तारेंत ओंवले–ह्मणजे धरलेले आणि धरणारे ही जशी दोन्ही सुवर्णें–त्याप्रमाणें हें जग आंतून बाहेरून मीच धरलें आहें. आणखीं उदकांतील रस, पवनाचा स्पर्श, आणि सूर्यचंद्राच्या ठिकाणीं प्रकाश–हीं मी आहें. तसाच पृथ्वीचा स्वाभाविक गंध, आकाशांतील शब्द, आणि वेदांतील ॐकार हेहि मीच आहें. त्याप्रमाणें नराच्याठायीं अहंभावविशिष्ट जें सत्त्व ह्मणजे नरत्वरूप पौरुष–अर्थात् पराक्रम तोहि मीच हें तत्व तुला सांगतों. अग्री हें तेजाच्या नांवाचें उगीच कवच आहे–कारण, तें तेजकवच एकीकडे सारून पाहिलें असतां अग्रीचें निजतेज तेंच मी आहें. या त्रैलोक्यांत नानाविध योनींत भूतांनीं जन्म घेऊन तीं आपापल्या उदरनिर्वाहाकरितां उद्योग करीत आहेत. कित्येक प्राणी वायूच भक्षण करतात, कित्येक गवतावर जीव धरून राहतात, कित्येक अन्नावर आणि कित्येक जळावर राहतात. अशा प्रकारच्या प्रकृतिभेदानें निरनिराळ्या प्राण्यांस जें जीवन–अर्थात् जगण्याचें साधन आहे,–त्या सर्व साधनांत अभिन्नपणानें असा मीच एक आहें. ह्मणून उत्पत्तिकाळाच्या वेळेस आकाशाच्या अंकुरानें वाढतो. अंतकाळीं प्रणवपीठीची ओंकाराचीं–अक्षरें गिळतो, आणि मध्यंतरी विश्वाकार असेपर्यंत विश्वांत दिसणाराहि मीच असल्याचें महाप्रळय झाला ह्मणून मी कशानें नाहींसा होणार आहें ? असें अनादिसिद्ध विश्वबीज जें मी, तें मीं आतां तुझ्या तळहातावर दिलें आहे. या बीजाचा विचार करून, तें बीज सांख्याच्या गांवांत ह्मणजे आत्मानात्म विचारांत आणशील, तेव्हांच त्याचा तुला उपयोग होईल. अर्जुना, या अप्रासंगिक गोष्टी सोडून माझें रूप कोणत्या ठिकाणीं दृष्टीस पडतें तें मी तुला आतां संक्षेपानें सांगतों. तपस्व्यांच्या ठिकाणीं जें तप असतें तें मी. बलवानांतील अढळ बल तें मी.बुद्धिवानाच्या ठिकाणची बुद्धि ती मी.द्रव्यसंग्रह नामक पुरुषार्थासाठीं जो थोर धर्म असतो, त्याला इंद्रियांच्या प्रसर होणाऱ्या विकारांनीं विरुद्ध जाऊं न देणारा असा भूतांच्याठायीं जो काम, जो स्वधर्मत्यागाची आडवाट सोडून विधिमार्गानें नियमाची

राम । जेणें अर्थास्तव धर्म । थोर
होय ॥ ४६ ॥
येऱ्हवीं विकाराचेनि पैसें । करी कीर
इंद्रियांचे याचि ऐसें । परि धर्मासि वेखासें ।
जावों नेदी ॥ ४७ ॥
जो अप्रवृत्तीचा आव्हांटा । सांडूनि विधिचिया
निघे वाटा । तेवींचि नियमाचा दिवटा ।
सवें चाले ॥ ४८ ॥
काम ऐसिया वोजा प्रवर्तें । ह्मणोनि धर्मासी
होय पुरतें । मोक्षतीर्थींचे मुक्तें । संसार भोगी ४९
जो श्रुतिगौरवाच्या मांडवीं । कामसृष्टीचा वेल
वाढवी । जंव कर्म फळेंसीं पालवी ।
अपवर्गीं ठेके ॥ ५० ॥
ऐसा नियत का कंदर्प । जो भूतां यां बीजरूप ।
तो मी ह्मणे बाप । योगियांचा ॥ ५१ ॥

दिवटी घेऊन बरोबर चालतो, ह्मणून धर्माचें रक्षण होऊन मोक्षतीर्थाच्या मुक्ततेनें संसारसुख भोगतो, आणि श्रुति गौरवांच्या अर्थात् वेदांच्या गौरवरूप मांडवांत कामसृष्टीचे वेल लावून कर्मफळाची मजल मोक्षाप्रत पोचेल, अशा रीतीनें जो वाढिवतो, असा नियत (नियमन केलेला) व भूतांच्या उत्पत्तीस कारण जो कंदर्प–अर्थात् काम–तो मी असें योग्यांचे बाप–अर्थात् योगीश्रेष्ठ श्रीकृष्ण ह्मणाले.

हें एकेक किती सांगावें । आतां वस्तुजातचि
आघवें । मजपासूनि जाणावें । विकारलें असे॥५२
जें सात्विक हनभाव । कां रजतमादि सर्व ।
तें ममरूप संभव । बोळखें तूं ॥ ५३ ॥
ते हे जाहले तरी माझ्या ठायीं । परि तयां-
माजी मी नाहीं । जैसी स्वप्नीच्या डोहीं ।
जागृती न बुडे ॥ ५४ ॥
जैसी रसाचीच सुघट । बीजकणिका घनवट ।
परि तियेस्तव होय काष्ठ । अंकूरद्वारें ॥ ५५ ॥
मग तया काष्ठाच्या ठायीं । सांग पां बीजपण
असे काई । तैसा मी विकारीं नाहीं ।
जरी विकारला दिसे ॥ ५६ ॥
पैं गगनीं उपजे आभाळ । परि तेथ गगन ना-
हीं केवळ । अथवा आभाळीं होय सलिल ।
तेथ अभ्र नाहीं ॥ ५७ ॥
मग त्या उदकाचेनि आवेशें । प्रकटलें तेज जें
लखलखीत दिसे । तिये विजूमाजी असे ।
सलिल कांई ॥ ५८ ॥
सांगे अग्नीस्तव धूम होये । तिये धूमीं काय

आतां अर्जुना, एकेक किती ह्मणून सांगावें–तात्पर्य येवढें लक्षांत ठेव, कीं वस्तुमात्र ह्मणून जी आहे, ती माझ्यापासूनच विकारली (उत्पन्न झाली) आहे. अर्जुना, सात्विकादि रजतमभाव हेहि माझ्या स्वरूपापासून उत्पन्न झाले आहेत; परंतु स्वप्नडोहामध्यें जागृती जशी बुडत नाहीं, त्याप्रमाणें सात्विकादि भाव जरी माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत–आणि त्या कारणानें ते माझ्यांत आहेत, तथापि मी त्यांच्यांत नाहीं.–माझ्यांत सर्व आहेत, परंतु मी कोणाहिमध्यें नाहीं, हें समजण्याकरतां दुसरीं आणखीं उदाहरणें सांगतों. रसानें भरलेल्या दाणेदार बीयाला अंकूर येऊन त्यापासून काष्ठ बनतें, तथापि त्या काष्ठांत जसें बीजपण रहात नाहीं, तसा मी जरी विकारलों आहें, तथापि त्या विकारांत मी नाहीं. आणखीं असें पहा, कीं गगनांत आभाळ उत्पन्न होतें, अथवा आभाळांत वीज उत्पन होतें, परंतु विजेंत आभाळ, अथवा आभाळांत आकाश जसें नसतें, अथवा उदकाच्या जोरानें आभाळांत उत्पन्न झालेली वीज लकलकते, परंतु त्या विजेंत जसें पाणी नसतें, अथवा अग्नीपासून धूर उत्पन्न होतो, परंतु त्या धुरांत जसा अग्नी नसतो, त्याप्रमाणें मी जरी (वर-

अग्नी आहे । तैसा विकार हा मी नोहे।
जरी विकारला असे ॥ ५९ ॥
तैसी हें माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउ-
ली । कीं मजचि आंत वोडवली । जवनिका
जैसी ॥ ६३ ॥
म्हणउनि भूतें माते नेणती । माझींच परि मी
नव्हती । जैशीं जळींचि जळीं न विरती ।
मुक्ताफळें ॥ ६४ ॥
पें पृथ्वीयेचा घट कीजे । सवेंचि पृथ्वीसि मिळे
जरी मेळविजे । येरव्हीं तोचि अग्नींसंगें सिजे ।
तरी वेगळा होय ॥ ६५॥
तैसे भूतजात सर्व । हे माझेचि कीर अवयव ।
परि मायायोगें जीव । दशे आले ॥ ६६ ॥

च्या न्यायानें) विकारलों आहें, तथापि विकार (उत्पन्न झालेला प्रकार) मी नाहीं. विकार मी नाहीं हें खरें, परंतु विकार पावलेल्या भूतांनीं तरी मला ओळखावें कीं नाहीं,?पण तीं मला ओळखीत नाहींत–याला कारण आहे; तें हें, कीं, माझ्यापासून उत्पन्न झालेली त्रिगुणात्मक सावली–अर्थात् माया–हीच भूतांच्या आणि माझ्यामध्यें पडद्यासारखी होऊन बसली आहे. तो पडदा भूतांना मला पाहूं देत नाहीं–म्हणून तीं माझी असतांहि तीं मी नाहींत असें समजतात!–तीं माझ्यापासून कशीं अलग होतात म्हणशील, तर मोत्यांप्रमाणें. मोती पाण्यांत उत्पन्न होतात, परंतु तीं मग पाण्यांत विरघळत नाहींत–अर्थात् पाण्यापासून निराळीं होतात. अथवा मातीचा घट केला, आणि लगेच मातींत भिसळला, तर तो घट भिसळला जातो. परंतु तोच अग्नी देऊन भाजून काढला, म्हणजे लगेच निराळा होतो. त्याप्रमाणें भूतें हीं माझ्यापासून निराळीं झालीं आहेत.–आणि पाहूं गेलें असतां भूतजात (प्राणिमात्र) म्हणून जितके आहेत, ते सर्व माझेच अवयव आहेत, परंतु मायेच्या संगानें ते जीवदशेला येऊन ते मीच असतां, ते मी नाहीं असें समजतात ! आणि अहंममताभ्रांतीनें–अर्थात् मी आणि माझें या भ्रमानें विषयांध होऊन ते माझे असून मला ओळखीतनासे झाले.

म्हणोनि माझेचि मी नव्हती । माझेचि मज
नोळखती । अहंममता भ्रांति।विषयांध जाले॥ ६७

आतां महदादि हे माझी माया । उतरोनियां धं-
नंजया । मी होइजे हे आया । कैसेनि ये॥ ६८ ॥
जिये ब्रह्माचळाचा आधाडा । पहिल्या संकल्प-
जळाचा उभाडा । सवेंचि महाभूतांचा बुडबु-
डा । साना आला ॥ ६९ ॥
जे सृष्टीविस्ताराचेनि वोघें । चढत काळकळ-
नेचेनि वेगें । प्रवृत्ति निवृत्तिची तुंगें ।
तटे सांडी ॥ ७० ॥
जे गुण घनाचेनिं वृष्टी भरें । भरली मोहाचेनि
महापूरें । वेऊनि जात नगरें । यमनि-
यमार्चीं ॥ ७१ ॥
जे द्वेषाच्या आवर्तीं दाटत । मत्सराचे वळसे प-
डत । माजी प्रमादादि तळपत । महामीन ॥७

अर्जुना, ही महदादि (महत्तत्त्व आदिकरून) जी माझी माया आहे, ती उतरून–अर्थात् मायेचा पडदा एकीकडे सारून–"मी होइजे"–म्हणजे भूतें हीं मी कसा होईन–अर्थात् भूतें ब्रह्मस्वरूपास कशी मिळतील, तो मार्ग आतां सांगतों.–या महदादि मायेला उतरून जाणें फार कठीण आहे. कसें म्हणशील, तर माया ही एक नदी कल्पिली असून तिच्या उगमापासूनचा प्रकार तुला सांगतों.–ब्रह्म हाच कोणी एक पर्वत; त्याच्या कड्यांत पहिल्यानें संकल्परूपी (अहं स्फूर्तिरूप) पाण्याचा झरा निघाला, आणि त्या झऱ्यांतून महाभूतांचे लहान लहान बुडबुडे निघाले. त्या बुडबुड्यांसह झऱ्याचा सृष्टीरूप मोठा प्रवाह होऊन कालगतीच्या वेगानें प्रपंच व मोक्ष नामक किनाऱ्यावरून चालला आहे. त्यांतच सत्त्व-रज-तम गुणरूपी मेघांची वृष्टी होऊन या माया-

जेथ प्रपंचाचीं वळणें । कर्माकर्माचीं बोभाणें । वरी तर्ताती वोसाणें । सुखदुःखाचीं ॥ ७३ ॥
रतिचिया बेटा । आदळती कामाचिया लाटा । जेथ जीव फेन संघटा । सैंघ दिसे ॥ ७४ ॥
अहंकाराचिया चळिया । वरी मदत्रयाचिया उकळिया । जेथ विषयोर्मीच्या आकाळिया । उल्लाळ घेती ॥ ७५ ॥
उदयास्ताचे लोंढे । पाडीत जन्म मरणाचे चोंढे । जेथें पांचभौतिक बुडबुडे । होतीजाती ७६
सम्मोह विभ्रम मासे । गिळितातीं धैर्याचीं आमिषें । तेथ देव्हडे भोंवत वळसे । अज्ञानाचे ॥७७॥
भ्रांतिचेनि खडुळे । रेवले आस्थेचे अवगाळे । रजोगुणाचेनि खळाळें । स्वर्ग गाजे ॥ ७८ ॥
तमाचे धारसे वाड । सत्वाचें स्थिरपण जाड । किंबहुना हे दुवाड । माया नदी ॥ ७९ ॥
पैं पुनरावृत्तिचेनि उभडे । झळंबती सत्यलोकीचे हुडे । घायें गडबडती धोंडे । ब्रह्मगोळकाचे ॥ ८० ॥
तया पाणियाचेनि वहिलेपणें । अझुनि न धरिती बोभाणें । ऐसा मायापुर हा कवणे । तरिजेल गा ॥ ८१ ॥
जेथ वैराग्याची नाव न रिगे । विवेकाचा तागा नलगे । वरी कांहीं तरोंये योगें । तरी विपाय तो ॥ ९१ ॥

नदीला मोहरूप महापूर येत असून त्या पुरांत यमनियमरूपी (इंद्रियनिग्रह आणि विधियुक्त कर्मे नामार्ची) नगरें वाहून जात आहेत. ही मायानदी द्वेषरूप भोंवऱ्यांनीं दाटली असून तिच्यांत प्रमादादि (असावधपणा आदि करून दोष) महामीन (मोठाले मत्स्य) चमकताहेत. या मायानदीला प्रपंचाचीं वळणें–अर्थात् ओघ फुटून त्यांतून कर्माकर्मांचे पूर येऊन त्यांजवर सुखदुःखरूपी कचरा तरंतगत असतो. या नदींतील रतिरूप–अर्थात् विषयप्रीतीरूप बेटावर कामरूपी लाटा आदळत असतात, त्यायोगानें त्यांत जीवरूप फेंसाचे समुदायच्या समुदाय दिसतात. त्यांत अहंकाराच्या चंचलतेनें आणि मदत्रयानें–अर्थात् विद्या-धन आणि सामर्थ्य यांच्या मदानें विषयतरंगांच्या लाटांवर लाटा उसळत असतात. या मायानदीला उदयास्ताचे मोठाले पूर येत असून त्या योगानें जन्ममरणरूपी मोठाले डोह पडतात, आणि त्यांत पांचभौतिक–अर्थात् जीवरूपी बुडबुडे उत्पन्न होऊन नाश पावतात. या नदींत संमोह (अत्यंत मोह) आणि विभ्रम (विशेष अथवा अत्यंत भ्रम) रूपी मासे असून ते धैर्यरूप आमिष (मांस) गिळतात, आणि त्यांच्या भोंवतीं अज्ञानरूपी वांकडे भोंवरे फिरत असतात. या माया नदींतील भ्रांतिरूप गढूळ पाण्यानें आस्थारूप दलदलीत चिखल सांठवला जात असून त्यांत रजोगुणरूपी खळाळीनें स्वर्ग गाजत असतो. अर्जुना, या मायानदींत तमोगुणाचा प्रवाह मोठा असून सत्वाचें स्थिरपण जाड–अर्थात् संथ असल्यानें या मायानदींतून तरून जाणें फार कठिण आहे. फार काय सांगू, बाबा, पुनर्जन्मरूप उमाळ्यानें सत्यलोकचे बुरूज डळमळूं लागून त्या घावानें ब्रह्मगोलकाचे धोंडे गडबडून जातात.–अशा प्रकारचे या मायानदीचे वेगानें जाणारे प्रवाह जर धरले जात नाहींत,तर तिच्यांतून कोणाला तरून जातां येणारं आहे? अर्जुना, या मायानदीच्या पैलतीरावर उतरून जाण्याकरितां विवेकाचा दोर आणि वैराग्याची नाव न घेतां अन्य उपायांनीं तरून जाण्याचा यत्न केला, तर तो उपाय न होतां विपायच होईल.

जे बहुतांएकां अवांतर । अहंकाराचा भूतसंचार । जाहला ह्मणोनि विसर । आत्मबोधाचा ॥१०३॥

आणि बहुतेक सगळे अहंकार-भूतसंचारानें व्याप्त झाले असल्यानें त्यांना आत्मबोधाचा (आत्मज्ञाना

ते वेळीं नियमाचें वस्त्र नाठवे । पुढील अधोगतीची लाज नेणवे । आणि करितात जें न करवे । वेद ह्मणे ॥ १०४ ॥
पाहें पां शरीराचिया गांवा । जयालागीं आले पांडवा । तो कार्यार्थ आघवा । सांडूनिया ॥१०५॥
इंद्रियग्रामीचे राजविदीं । अहंममतेचिया जल्पवादीं । विकारांतराची मांदी । मेळवूनियां ॥१०६॥
दुःख शोकाच्या घाई । मारिलियाचि सेचि नाहीं । हें सांगावया कारण काई । जे ग्रासिले माया ॥ १०७ ॥
ह्मणोनि ते मातें चुकले । एक चतुर्विध मज भजले । जिहीं आत्महित केलें । वाढते गा ॥१०८॥
तो पाहिला आर्त ह्मणिजे । दुसरा जिज्ञासु बोलिजे । तिजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानीया चौथा ॥ १०९ ॥

चा) विसर पडतो.- आणि आत्मबोधाचा विसर पडला, ह्मणजे अर्थात्च त्यांना अहंकाररूपी भूतसंचारानें नियमरूपी वस्त्राची आठवण नाहींशी होऊन पुढें प्राप्त होणाऱ्या अधोगतीची त्यांना लाज वाटत नाहीं; ह्मणून वेदांनीं ज्या गोष्टी कराव्या ह्मणून सांगितल्या आहेत, त्या ते करीत नाहींत. त्यायोगानें काय होतें, कीं ते ज्या आत्मबोधाकरतां शरीररूप गांवांत आले असतात, तो सर्व कार्यभाग विसरून जाऊन इंद्रियरूपी गांवाच्या राजमार्गावर अहंममतेच्या-ह्मणजे मी व माझे अशा विकारांतराच्या-अर्थात् अन्यथा गप्पांच्या गर्दीत दुःखशोकाच्या माराचे घाय बसत असतांहि, त्यांना त्या माराची आठवण होत नाहीं ! त्याचें कारण ते मायेनें ग्रासलेले असतात आणि ह्मणूनच मला ते चुकतात.-परंतु याच मायेच्या तडाक्यांत सांपडले असून-जे चतुर्विध (चारप्रकारच्या) भक्तीनें मला भजतात, ते मात्र आपलें आत्महित वाढवितात.-हे जे चार भक्त सांगितले, त्यांपैकीं एकाला आर्त, दुसऱ्याला जिज्ञासु, तिसऱ्याला अर्थार्थी,आणि चौथ्याला ज्ञानी असें ह्मणतात-- ह्या चारीहि भक्तांचे मला भजण्याचे चार निरनिराळ्या प्रकारचे हेतु असतात.

तेथ आर्त तो आर्तीचेनि व्याजें । जिज्ञासु तो जाणावयालागीं भजे । तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धी ॥ ११० ॥
मग चौथियाच्या ठायीं । कांहींचि करणें नाहीं । ह्मणोनि भक्त एक पाहीं । ज्ञानिया जो ॥१११॥
जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें । फिटले भेदाचे कडवसे । मग मीचि जाहला समरसें । आणि भक्तही तेविंची ॥ ११२ ॥
परि आणिकाचिये दिठी नावेक । जैसा स्फटिकचि भासे उदक । तैसा ज्ञानी नव्हे कौतुक । सांगता तो ॥ ११३ ॥

आर्त ह्मणजे रोगपीडित जो असतो, तो ती विपत्ती निवारणार्थ मला भजतो. जिज्ञासु ह्मणजे जाणणें. जाणण्याची अथवा माझें स्वरूप ओळखण्याची इच्छा करणारा जो असतो, तो माझें स्वरूपज्ञान होण्याच्या हेतूनें भजतो. अर्थार्थी जो असतो तो, अर्थप्राप्तीच्या-अर्थात् द्रव्यादिकांच्या अपेक्षेनें मला भजतो. आणि चौथा ज्ञानी जो भक्त असतो, त्याच्याठिकाणीं हेतु कांहीं नसल्यानें त्याला हेतुक कर्तव्य नसतें, ह्मणून खरा काय तो ज्ञानीच एक भक्त असतो.-या ज्ञान्याची स्थिती अशी असते, कीं त्याच्यांत प्रज्वलित झालेल्या ज्ञानाच्या प्रकाशानें भेदरूप कडवस्यांचा अथवा द्वैतरूप अंधकाराचा नाश होऊन समरसानें अर्थात् ब्रह्मैक्यभावानें मीच तो जसा बनून जातो, तसाच भक्तपणातहि रहातो-ह्मणजे तो माझ्यांत मिसळला, तथापि भक्तपण सोडीत नाहीं. आतां अज्ञानदृष्टीनें स्फटिकमण्यावर जसा क्षणैक पाण्याचा भास होतो,तसा ज्ञानीभक्ताविषयीं कौतुकाचा भासमान सांग-

जैसा वारा कां गगनीं विरे । मग वारेपण वेगळें नुरे । तेवीं भक्त हे पैज न सरे । जरी ऐक्या आला ॥ ११४ ॥

ण्याचा प्रकार नाहीं. अर्थात् स्फटिक आणि पाणी यांचें ऐक्य होत नाहीं, अथवा वारा गगनांत विरून गेल्यावर तो जसा निराळेपणांत रहात नाहीं, तसा ज्ञानी भक्त समरसांत मिसळून जातो, तथापि भक्तपणाची पैज अर्थात् प्रतिज्ञा त्याची नाहींशी होत नाहीं.

ह्मणोनि आपुलाल्या हिताचेनि लोभें । मज आवडे तोहि भक्त झोंबे । परी मीचि करी वालभे । ऐसा ज्ञानिया एक ॥ ११९ ॥

पाहे पां दुभतेयाचिया आशा । जग धेनुसीं करीतसे फांसा । परि दोरेवीण कैसा । वत्साचा बळी ॥ १२० ॥

का जे तनु-मन-प्राणें । तें आणिक कांहींचि नेणे। देखतसां तें ह्मणे । हे माय माझी ॥ १२१ ॥

तें येणेमानें अनन्य गती । ह्मणऊनि धेनु ही तैसीच प्रीती । तयालागीं लक्ष्मीपति । बोलिले साचे ॥ १२२ ॥

हे असो मग ह्मणितलें । जें कां तुज सांगितलें। तेही भक्त भलें । पढियंते आह्मा ॥ १२३ ॥

परि जाणोनिया माते । जे पाहों विसरले माघुते। जैसें सागरा येऊनि सरिते । मुरडावे ठेले। १२४।

तैसी अंतःकरण कुहरीं जन्मली । जयाची प्रतीती गंगा मज मिनली। तो मी हे काय बोली। फार करूं ॥ १२५ ॥

येऱ्हवीं ज्ञानिया जो ह्मणिजे । तो चैतन्यचि केवळ माझें । हें न ह्मणावें परि काय कीजे न बोलणें बोलों ॥ १२६ ॥

ह्मणून आपापल्या हिताच्या लोभानें मला हवे तितके जरी भक्त झोंबले, तथापि त्या सर्वांहून मला आवडता ह्मणशील, तर काय तो एक ज्ञानीभक्त. अथवा मीच ज्यानें आपल्या भक्तीची प्रीयवस्तु केली आहे असा काय तो एकभक्तज्ञानी. ह्मणून वत्सावर धेनूचें जितकें वात्सल्य प्रेम असतें, तितकें माझें प्रेम ज्ञानी भक्तावर असतें. दुभत्याच्या आशेनें दूध काढतेवेळीं धेनूला फांस लावावा लागतो, परंतु दोरावांचून वत्साला पाहतांच धेनु पान्हा सोडते.-कारण उघडच आहे कीं-शरीर मन आणि प्राण इहींकरून तें वत्स दुसरें कोणालाहि जाणत नसून धेनु पाहण्यावरोबर ही माझी आई असें ह्मणतें– अर्थात् हंबरडा फोडतें.–अशाप्रकारें तें अनन्यगति–अर्थात् अन्य आधाररहित असतें ह्मणून धेनुहि वत्सावर तसेंच प्रेम करते असें लक्ष्मीपती श्रीकृष्ण बोलले. आणखीं श्रीकृष्ण ह्मणाले, अर्जुना,–दुसरे जे तीनप्रकारचे भक्त तुला मीं सांगितले, तेहि मला चांगले आवडते आहेत; परंतु सागराला मिळाल्यावर नदीचे माघारे उलटणें रहातें, त्याप्रमाणें मला जाणून (ओळखून) जे माघारे पाहण्याचें विसरतात– अर्थात् ज्यांच्या अंतःकरणरूप गुहेंत प्रतीती गंगा जन्मली (उगम पावली) असून, जी मला मिळाली, ते (अंतःकरणधारी), मी आहेंत हें फार बोलून काय दाखवावें.–आणि खरोखर ह्मणशील, तर–ज्ञानी ह्मणून जो ह्मणतात, तो केवळ माझें चैतन्यच अर्थात् जीवच आहे. अर्जुना, हा बोलून दाखविण्यासारखा प्रकार नाहीं. परंतु बोलांत बोलून गेलों.

हे असो आणिक कांहीं । तया सर्वत्र मीवांचुनि नाहीं । जैसें सबाह्य जळ डोहीं । बुडालिया घटा ॥ १३३ ॥

तैसा तो मज भीतरीं । मी तया आंत बाहेरी । हें सांगिजेल बोलवरी । तैसें नव्हे ॥ १३४ ॥

ह्मणोनि असो हें इयापरी । तो देखे ज्ञानाचीं

आणि आणखीं देखील बोलल्यावांचून रहाववत नाहीं. कारण त्याचा माझा असा संबंध जुळलेला असतो कीं–पाण्यांत घट बुडविला असतां, त्या घटाच्या आंतबाहेर जसें पाणीच असतें त्याप्रमाणें ज्ञानीभक्ताला सर्वत्र माझ्यावांचून कांहींच दुसरें नसल्यानें, तो माझ्यांत, आणि त्याच्या आंतबाहेर मी

वाखारी । तेणें संसरलेनि करी । आप
विश्व ॥ १३५ ॥
हे समस्तही श्रीवासुदेव । ऐसा प्रतितीरसाचा
वोतला भाव । ह्मणोनि भक्तांमाजी राव ।
आणि ज्ञानिया तोचि ॥ १३६ ॥
जयाचिये प्रतीतीच्या वाखारां । पवाड होय
चराचरा । तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभ
आथी ॥ १३७ ॥
येर बहुत जोडती किरिटी । जयांचीं भजनें
भोगासाठीं । जे आशा तिमिरें दृष्टी ।
मंद जाहले ॥ १३८ ॥

असतों. हा देखील बोलून दाखविण्यासारखा प्रकार नाहीं.–सारांश ज्ञानीभक्त जो आहे–त्याला सर्वत्र ज्ञानाची वखार दिसत असून, तिच्यांतच तो संसार (व्यवहार) करीत असल्यानें तो आपल्यालाच विश्व करून घेतो, आणि त्यामुळें हें सर्व विश्व श्रीवासुदेवस्वरूपी आहे असा अनुभवरसाचा भाव त्याच्यांत पूर्ण भरलेला असतो, ह्मणून भक्तांत राजा असा तोच ज्ञानीभक्त असें समज. अर्जुना, अरे ज्याच्या प्रतीती (अनुभव) रूप वखारींत चराचरास–अर्थात् स्थावरजंगमास पवाड (महत्व) प्राप्त होतें ह्मणजे स्थावर जंगमास ब्रह्मत्वाची किंमत येते–असा महात्मा–अर्थात् ज्ञानीभक्त दुर्मिळच असतो. बाकी दुसरे पुष्कळ (खंडोगणती) भक्त मिळतात, परंतु अर्जुना, त्या सर्वांची आशारूप तिमिरानें (अंधकारानें) दृष्टी मंद झाली असून त्यांचीं भजनें अर्थात् भक्ती केवळ भोगासाठींच असते.

पैं जो जियें देवतांतरी । भजावयाची चाड करी ।
तयाची ते चाड पुरी । पुरविता मी ॥ १४३ ॥
देवोदेवी मीचि पाहीं । हाही निश्चय त्यांसी
नाहीं । भाव तें तें ठायीं । वेगळाला धरी ॥ १४४
ऐसें जेणें जें भाविजे । तें फळ तेणें पाविजे ।
परि तेही सकळ निपजे । मजचिस्तव ॥ १४६ ॥

ह्मणून जो ज्या देवतेच्या नांवानें भजन करण्याची आवड धरतो, त्या देवतेच्या रूपानें मीच त्याची इच्छा परिपूर्ण करणारा असतो. ह्मणून देव आणि देवी हीं दोन्ही माझीच स्वरूपें आहेत–असा त्याचा निश्चय होत नाहीं त्या योगानें तो निरनिराळ्या देवतेच्या ठायीं निरनिराळा भाव धरतो; ह्मणून जो ज्या फलाची भावना धरतो–अर्थात् इच्छा करतो, तें फल त्याला प्राप्त होतें; परंतु तें माझ्या पासूनच.

परि ते भक्त माते नेणती । जे कल्पनेबाहेरी
न निघती । ह्मणोनि कल्पित फळा पावती ।
अंतवंत ॥ १४७ ॥
येर तनुमन प्राणी । जे अनुसरले माझेयाचि
बाहणी । ते देहाच्या निर्वाणीं । मीचि
होती ॥ १९० ॥
येथें भुतें जिये आहाति जेतुलीं । तिये मीचि
होऊनि ठेलीं । आणि वर्तंत आहाते जेतुलीं ।
तींहि मीचि ॥ १९१ ॥
कां भविष्यमाणें जियें हीं । तींही मजवेगळीं
नाहीं । हा बोलचि येऱ्हवीं कांहीं । होय ना
जाय ॥ १९२ ॥

या करतां फलेच्छू जे भक्त आहेत, ते मला ओळखीत नसल्या कारणानें कल्पनेबाहेर त्यांच्यानें जाववत नाहीं, आणि ह्मणून अंतवंत–अर्थात् नाशवंत असेंच फळ पावतात. परंतु शरीर-मन-आणि प्राण इहींकरून जे भक्त माझ्या मार्गावर येऊन बसतात, ते देहाच्या निर्वाणीं मीच होऊन जातात.

अर्जुना, आजपर्यंत जीं जीं भूतें होऊन गेलीं, तीं मीच होतों, वर्तमानकाळीं जीं आहेत तीं मीच आहें, आणि भविष्यकाळीं जीं होणार तींहि मीच आसणार. मग "होय" आणि "जाय" अर्थात् उत्पन्न होणें आणि नाहींसें होणें असें जें बोलतात, त्यांत बोलावांचून कांहीं तथ्यांश नाहीं.

सांगा कवण तें ब्रह्म । कायसया नाम कर्म । अथवा अध्यात्म । काय ह्मणिपे ॥ २ ॥ अधिभूत तें कैसें । येथ अधिदैवत तें कवण असे । हें उघड मी परियेसें । ऐसें बोला ॥ ३ ॥ देवा अधियज्ञ तो काई । कवण पां इये देहीं । हें अनुमानासी कांहीं । दिठी न भरे ॥ ४ ॥ आणि नियता अंतःकरणीं । तू जाणिजसी देह प्रयाणीं । तें कैसेनि हें शार्ङ्गपाणी । परिसवा मातें ॥ ५ ॥

ब्रह्म ह्मणजे काय ? कर्म कशाला ह्मणावें? अध्यात्म तें काय ? अधिभूत कशाला ह्मणतात ? अधिदैवत कशाला ह्मणतात ? अधियज्ञ कोणता ? आणि नियता कोण ? असें सात प्रश्न अर्जुनानें श्रीकृष्णास विचारले. त्यांचीं क्रमाक्रमानें श्रीकृष्णानीं उत्तरें दिलीं आहेत.

मग ह्मणितले सर्वेश्वरें। जे आकारीं इये खोंकरें। कोंदले असत न खिरे । कवणे काळीं ॥ १५॥ येन्हवीं सपूरपण तयाचे पाहावें । तरी शून्यचि नव्हे स्वभावें । वरी गगनाचेनि पालवे । गाळूनि घेतले ॥ १६ ॥ जें ऐसेंहि परी विरूळे । इये विज्ञानाचिये खोळे हलवलेहि न गळे । तें परब्रह्म ॥ १७ ॥

ब्रह्म–अर्जुना,या नाशवंत आकारांत–अर्थात् जगांत खिचून भरले असून, कोणत्याहि काळीं ज्याचा नाश होत नाहीं, आणि ज्याच्या भरपूरपणाविषयीं पाहूं गेलें असतां स्वभावता जें शून्य–अर्थात् कांहीं नाहीं असें दिसत नाहीं,आणि अशा प्रकारचे असून आकाशाच्या पदरानें जें गाळून घेतां येतें, तथापि विज्ञानाच्या खोळींत–अर्थात् संसार ज्ञानरूप झोळींत घालून हालविलें असतांहि जें गळत नाहीं, त्याला परब्रह्म असें ह्मणतात.

आणि आकाराचेनि जालेपणें । जन्म धर्मातें नेणें। आकार लोपीं निमणें। नाहीं कहीं ॥१८॥ ऐसिया आपुलियाचि सहजस्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाम सुभद्रापती । अध्यात्म गा ॥ १९ ॥

अध्यात्म–अर्जुना, आकाराच्या–अर्थात् देह उत्पन्न झाल्याच्या योगानें जन्मधर्म (उपजणें) काय आहे हें जें जाणत नाहीं, आणि देहाच्या नाशाबरोबर ज्याचा नाश होत नाहीं–अशा आपल्या (ज्याच्या) सहजस्थितींत ब्रह्माचें नित्यत्व असतें, ती स्थिती जें, त्याला अध्यात्म ह्मणतात.

मग गगनीं जेवीं निर्मळें । नेणों कैंची एक वेळें । उठती घनपटळें । नाना वर्णें ॥ २० ॥ तैसे अमूर्तीं तिये विशुद्धें । महदादि भूतभेदें । ब्रह्मांडाचे बांधे । होचि लागती ॥ २१ ॥ पैं निर्विकल्पाचिये बरडी । फुटे आदिसंकल्पाची विरुडी । आणि ते सर्वेचि मोडोनि ये ढोंढी । ब्रह्मगोळकाच्या ॥ २२ ॥ तया एकैकाचे भीतरी पाहिजे । तंव बीजाचाचि भरला देखिजे । माजी होतियां जातियां नेणिजे । लेख जीवा ॥ २३ ॥

कर्म–अर्जुना, गगनांत एकाएकींच जशीं अनेक रंगांचीं मेघपटलें उत्पन्न होतात, त्याप्रमाणें विशेषेंकरून शुद्ध अशा अमूर्ताच्या–अर्थात् निराकाराच्या ठिकाणीं महदादि भूतभेदानें– ह्मणजे अनेक प्राणी समुच्चयानें ब्रह्मांडाचा बांधा– अर्थात् आकार होऊं लागून निर्विकल्परूप बरड (माळ) जमिनीवर आदिसंकल्पाची (अहंस्फूर्तीची) वाढ फुटतांच ब्रह्मगोलकांचे आकार भरून आले. त्या प्रत्येक गोलांत पाहिलें असतां, ब्रह्म हें बीजरूपानें भरलेलें असून, त्यांत कित्येक जीव होतात आणि जात–अर्थात् उत्पन्न होतात आणि नाश पावतात–

मग तया ब्रह्मगोळकांचे अंशांस । प्रसवती आदिसंकल्प असमास । हे असो ऐसी बहुवस । सृष्टी वाढे ॥ २४ ॥
परि दुजेनवीण एकला । परब्रह्माचि संचला । अनेकत्वाचा आला । पूर जैसा ॥ २५ ॥
तैसें समविषमत्व नेणों कैंचें । वायांचि चराचर रचे । पाहाता प्रसवतिया योनीचे । लक्ष दिसती ॥ २६ ॥
येरी जीवभावाचिये पालविये । कांहीं मर्यादा करूं नये । पाहिजे कवण हें आघवें विये । तंव मूळ तें शून्य ॥ २७ ॥
ह्मणूनि कर्ता मुद्दल न दिसे । आणि सेखीं कारणही कांहीं नसे । माजी कार्याचि आपैसें । वाढोंचि लागे ॥ २८ ॥
ऐसा करितेनवीण गोचर । अव्यक्ती हा आकार । निपजे जो व्यापार । तया नाम कर्म ॥ २९ ॥

आतां अधिभूत जे ह्मणिपे । तेहि सांगों संक्षेपें । तरी होय आणि हारपे । अभ्र जैसें ॥ ३० ॥
तैसें असते पण आहाच । नाहीं होईजे हें साच । जयातें रूपा आणिती पांच पांच । मिळोनियां ॥ ३१ ॥
भूतांतें अधिकरूनि असे । आणि भूतसंयोगें तरी दिसे । जें वियोग वेळें भ्रंशे । नाम रूपादिक ॥ ३२ ॥

तयातें अधिभूत ह्मणिजे । मग अधिदैवत पुरुष जाणिजे । जेणें प्रकृतीचे भोगिजे । उपार्जिलें ॥ ३३ ॥
जो चैतनेचा चक्षु । जो इंद्रिय दशींचा अध्यक्षु । जो देहास्तमानीं वृक्षु । संकल्प विहंगमाचा ॥ ३४ ॥
जो परमात्माचि परी दुसरा । जे अहंकार निद्रानिदसुरा । ह्मणोनि स्वप्नाचिया वोरवारा । संतोषे शिणे ॥ ३५ ॥
जीव येणें नावें । जयातें आळविजे स्वभावें । तें अधिदैवत जाणावें । पंचायतनीचें ॥ ३६ ॥

त्यांची त्या ब्रह्माला दादहि नसते—तथापिअशा प्रत्येक ब्रह्मगोलकाचे अंशांत असंख्यात आदिसंकल्प उत्पन्न होऊन त्यांपासून बहुवस (पुष्कळ) सृष्टी वाढली आहे, तथापि या अनेकत्वाच्या—अर्थात् चराचर सृष्टीच्या पुरांत एकच परब्रह्म संचला (भरला) आहे. परंतु या लक्षावधि उत्पन्न झालेल्या चराचर योनींत समविषम (लहान-थोर, चांगले-वाईट-कमी-अधिक इत्यादि) भाव कसे उत्पन्न झाले ते कळत नाहींत. आणि जीवभावाच्या (जीव) योनीशिवाय अचरसृष्टीची गणनाच करूं नये—कारण गणना करणेंच अशक्य आहे—तथापि या सर्वत्रांच्या उत्पत्तिस्थानाचा शोध केला असतां, त्या सर्वांचें मूळ शून्यच आहे असें दिसतें. तेव्हां अर्थातच या चराचरसृष्टीला कर्ताच मुदलांत कोणी दिसत नसून कारणहि कांहीं दिसत नाहीं, परंतु मध्येंच जें कार्य आपोआप वाढीस लागलेलें दिसतें—असा जो कर्त्यावांचून अव्यक्ताच्या (निराकाराच्या) ठिकाणीं व्यापार दृष्टीस पडतो, त्या व्यापाराला कर्म असें ह्मणतात.

अधिभूत—अर्जुना, अभ्र येतें आणि नाहींसें होतें,—या दोन्हीहि क्रिया आकाशाच्या नाहींत—त्याप्रमाणें असतेपण खोटें ठरून नाहींपणच खरें ठरतें अशाला प्रत्येक भूताचे पांच पांच अंश मिळून २५ सांनीं जो पंचभूतात्मक देह बनतो, त्या देहाला धरून नामरूपादिकानें जें दिसतें, व देहाचा वियोग होण्याबरोबर नामरूपादि ज्यांचें नाहींसें होतें, त्याला अधिभूत असें ह्मणतात.

अधिदैवत—अर्जुना मायेनें संपादन केलेले भोग जो भोगतो, आणि चेतनेचा चक्षु (द्रष्टा) इंद्रियरूप देशाचा अध्यक्ष—मुख्यअधिकारी, व देहास्तमानी—अर्थात् मरणकाळसमयीं संकल्प विहंगमाची (संकल्परूपी पक्ष्याची) बसण्याची वृक्षरूप जागा, जो खरोखर दुसरा परमात्माच, परंतु अहंकाररूपी निद्रेंत निद्राळू असल्यानें स्वप्नांतील सुखदुःखानें संतोष व शीण पावतो—असा जो स्वाभाविकपणें जीव नांवानें ओळखला जातो, त्याला पंचमहाभूतात्मक देहाचें अधिदैवत ह्मणतात.

आतां इयेची शरीरग्रामीं । जो शरीरभावातें
उपशमी । तो अधियज्ञ येथ गा मी ।
पंडुकुमरा ॥ ३७ ॥

येर अधिदैवाधिभूत । तेही मीचि कीर समस्त ।
परि पंधरे किडाळा मिळत । तें काय
सार्कें नोहे ॥ ३८ ॥

तरी ते पंधरेपण न मैळे । आणि किडाळा-
चिया अंशा न मिळे । परि जंव असे तयाचेनि
मेळे । तंव सांकेचि ह्मणिजे ॥ ३९ ॥

तैसें अधिभूतादि आघवें । हे अविद्येचेनि पालवें ।
झांकलें तव मानावें । वेगळें ऐसें ॥ ४० ॥

तेचि अविद्येचि जवनिक फिटे । आणि भेद-
भावाची अवधी तुटे । मग ह्मणों एक होऊनि
जरी आटे । तरी दोनी काय होती ॥ ४१ ॥

अधियज्ञ—अर्जुना, याच शरीररूप गांवांतील शरीर-भावांस—अर्थात् अहंकारादिकांस—उपशम (शांत) करतो, तो मी येथचा अर्थात्—शरीरांतला अधियज्ञ असें समज. अर्जुना, अध्यात्म—अधिभूत आणि अधिदैवत हीं निश्चयेंकरून मीच आहें, परंतु त्या माझी स्थिती १५ च्या दराच्या सोन्याला किडाळ अर्थात्—हिणकट लागल्यानें तें जसें उत्तम असून डाकलगांत येतें, त्या प्रमाणें अधिभूतादिकांत माझी स्थिती असते. सोनें डाकलग झालें ह्मणून सोन्याचें पंधरेपण कमी होत नाहीं, आणि ते किडाळाच्या अंशालाही पण मिळत नाहीं, तथापि हिणकटाचा जोंपर्यंत संबंध असतो, तोंपर्यंत त्या सोन्याला डाकलग ह्मणतात. त्याप्रमाणें अधिभूतादि करून जोंपर्यंत अविद्येच्या पदराखालीं झांकलीं असतात, तोंपर्यंत त्यांना निराळीच मानलीं पाहिजेत. तोंच अविद्येचा अर्थात् मायेचा पडदा दूर होऊन भेदभावाचें अंतर नाहींसे होण्याबरोबर एक आटणी झाली ह्मणजे अधिभूतादि आणि अधियज्ञ यांत दुजेपणा नाहीं.

तेवींचि अहंभाव जाये । तरी ऐक्य तें आधींचि
आहे । हेचि साचे जेथ होये । तो अधि-
यज्ञ मी ॥ ४५ ॥

पैंगा आही तुज । सकळ यज्ञ कर्मज ।
सांगितलें जें काज । मनीं धरूनि ॥ ४६ ॥

तो हा सकळ जीवांचा विसावा । नैष्कर्म्य
सुखाचा ठेवा । परि उघड करूनि पांडवा ।
दाविजत असे ॥ ४७ ॥

पहिलें वैराग्य इंधन परिपूर्तीं । इंद्रियानळीं
प्रदीप्तीं । विषयद्रव्याचिया आहुती ।
देऊनियां ॥ ४८ ॥

मग वज्रासन तेचि उर्वी । शोधूनि आ-
धार मुद्रा बरवी । वेदिका रचे मांडवी ।
शरीराख्या ॥ ४९ ॥

तेथ संयमाग्नीचीं कुंडें । इंद्रिय द्रव्याचेनि
पवाडें । यजिजती उदंडे । युक्तिघोषें ॥ ५० ॥

मग मन प्राण संयम । हाचि हवन संपदेचा
संभ्रम । येणें संतोषविजे निर्धूम । ज्ञानानळ ५१

अर्जुना, अहंभाव नाहींसा होण्याबरोबर ऐक्य तें आधींचेंच आहे असें खरोखर ज्याच्या अनुभवास येतें, तोच अधियज्ञ मी, ह्मणून हीच गोष्ट मनांत धरून, अर्जुना (४ थ्या अध्यायांत) सकल यज्ञ कर्मज आहेत—ह्मणजे कर्मांच्या योगानें सर्व यज्ञांची सिद्धी होते असें तुला सांगितलें आहे. तो अधियज्ञ सकळ जीवांचा विसावा (विश्रांतिस्थान)—अर्थात् नैष्कर्म्य-सुखाचा ठेवा हा तुला उघड करून सांगितला. तो प्राप्त करून घेण्याकरतां पहिल्यानें वैराग्यरूप इंधनांच्या (काष्ठांच्या) परिपूर्तीनें इंद्रियरूपी प्रदीप्त झालेल्या अग्नींत विषयरूपी द्रव्यांच्या—अर्थात् शब्दस्पर्शादिक विषयांच्या आहुती देऊन, मग वज्रासनरूपी भूमी शुद्ध करावी, आणि शरीररूप मांडवांत वेदिका (ओटा) रचावी. तिच्यावर संयमाग्नीचीं— अर्थात् इंद्रियनिग्रहरूप अग्निकुंडें तयार करून इंद्रियद्रव्याच्या विस्तारानें (विपुलतेनें) व युक्तिमंत्रघोषानें यजन करावें. मग मन-प्राण-आणि संयम (निग्रह) या हवनसंपत्तीच्या संभ्रमानें—अर्थात् समारंभानें निर्धूम (धूररहित) अशा ज्ञानाग्नीस संतोषित करावें. या प्रकारानें विषयरूपी द्रव्यें ज्ञानाग्नीस समर्पण

ऐसेंनि हें सकळ ज्ञानीं समर्पे । मग ज्ञान
तें ज्ञेयीं हारपे । पाठी ज्ञेयचि स्वरूपें ।
निखिल उरे ॥ ९२ ॥
तया नांव गा अधियज्ञ । ऐसें बोलिला
जंव सर्वज्ञ । तंव अर्जुन अतिप्राज्ञ ।
तया पातलें तें ॥ ९३ ॥

तेवीं जितेनि अवसरें । जें आवडोनि
जिवीं उरे । तेंचि मरणाचिये मेरे ।
फार हों लागे ॥ ७४ ॥
आणि मरणीं जया जें आठवे । तो तेचि
गतीतें पावे । ह्मणोनि सदां स्मरावें ।
मातेंचि तूवां ॥ ७५ ॥
डोळां जें देखावें । कां कानीं हन ऐकावें ।
मनीं जें भावावें । बोलावें वाचें ॥ ७६ ॥
तें आंत बाहेरी आघवें । मीचि करूनि घालावें ।
मग सर्वीकाळीं स्वभावें । मीचि आहें ॥ ७७ ॥
अर्जुना ऐसें जाहालिया । मग न मरिजे
देह गेलिया । मां संग्राम केलिया ।
भय काय तुज ॥ ७८ ॥
तूं मन बुद्धी साचेंसी । जरी माझिया
स्वरूपीं अर्पिसी । तरी मातेचि गा पा-
वसी । हे माझी भाक ॥ ७९ ॥
हेचि कायिसयावरी होये । ऐसा जरी
संदेह वर्तत आहे । तरी अभ्यासुनि आदीं
पाहें । मग नव्हे तरी कोपे ॥ ८० ॥

येणेंचि अभ्यासेसी योगू । चित्तासी करी
पां चांगू । अगा उपायबळें पंगू । पहाड
ठाकी ॥ ८१ ॥
तेवीं सदभ्यास निरंतर । चित्तासी परम-
पुरुषाची मोहर । लावी मग शरीर ।
राहो अथवा जावो ॥ ८२ ॥
जें नाना गतीतें पाववीतें । तें चित्त

केलीं असतां, ज्ञानानें जाणण्यास योग्य असें जें ज्ञेय, त्या ज्ञेयामध्यें ज्ञानाचा लय होऊन शेवटीं काय तें सगळें ज्ञेयस्वरूप उरतें. त्या ज्ञेयास बाबा अर्जुना अधियज्ञ ह्मणतात असें सर्वज्ञ-अर्थात् श्रीकृष्ण ह्मणाले- ती गोष्ट अर्जुन प्राज्ञ-अर्थात् बुद्धिवान् असल्यानें त्याच्या लक्षांत आली.

अर्जुना, वर सांगितल्याप्रमाणें मी ज्ञेयच असा जो होऊन जातों, तो देहावसानसमयीं अन्यत्र कोठेंहि जात नसून माझ्यांतच मिळतो,-परंतु ज्यांनीं मला ओळखलें नाहीं, त्यांना-त्यांच्या मरणसमयीं, जिवंतपणीं जी वस्तु त्यांना जिवाची आवडती असते, तीच मरणसमयीं वारंवार त्यांच्या मनांत येऊं लागून त्याच वस्तूचा त्याला मरणसमयीं आठव रहातो, ह्मणून त्या वस्तुप्रत तो पावतो. याजकरतां अर्जुना, तूं माझेंच निरंतर स्मरण कर. अर्जुना, तुला डोळ्यांनीं जें पहायचें तें, अथवा कानांनीं जें ऐकायचें तें, अथवा मनांत ज्याची भावना करायची तें, अथवा वाचेनें जें बोलायचें तें अंतर्बाह्य सर्वत्र मीच करून कर ह्मणजे सर्वकाळीं(अर्जुना, सहजच तू) मीच आहेस.अर्जुना,अशा प्रकारची तुझी एकदां कां स्थिती झाली, ह्मणजे देह गेला, तरी तू मरणार नाहींस, मग संग्राम करण्यांत तें तुला भय कशाचें आहे ? अर्जुना, तुझें मन आणि बुद्धी हीं दोन्ही खरोखर जर तू माझ्याठिकाणीं अर्पण करशील, तर तू माझ्याच स्वरूपाला पावशील हें मी तुला माझीच शपथ घेऊन सांगतों. हें असें कसें होईल, अशी शंका जर तुला येत असेल, तर (मी सांगितल्याप्रमाणें) आधीं करून पहा, आणि तसें न होईल, तर रागाव.

अर्जुना असाच अभ्यासयोग करून चित्ताला चांगलें कर, कारण अभ्यासानें पंगू देखील पहाड चढून जातात.-मग अभ्यासानें तुला कांहीं अशक्य आहे काय असा भाव.-ह्मणून निरंतर सदभ्यासानें चित्ताला परमपुरुषाचा-अर्थात् ईश्वराचा मार्ग लाव, मग तुझें शरीर राहो अथवा जावो त्याची तुला काळजी नको. नाना गतीस पोंचिवणाऱ्या चित्तानें अशा अभ्यासाच्या योगानें आत्म्यास वरल्यावर मग देह गेला कीं आहे

वरील आत्मयातें । मग कवण आठवी
देहातें । गेलें कीं आहे ॥ ८३ ॥
पैं सरितेचेनि ओघें । सिंधुजळा मीनले
घोगें । तें काय वर्तत आहे मागें ।
ह्मणोनि पाहों येती ॥ ८४ ॥
नाते समुद्रचि होऊनि ठेले । तेवीं चित्ता-
चें चैतन्य जाहालें । जेथ यातायात निमालें ।
घनानंद जे ॥ ८५ ॥
सकळां जाणणेयां जे लाणी । तिये जा-
णिवेचि जे खाणी । तयां ज्ञानियांचिये आ-
यणी । जयातें अक्षर ह्मणिपे ॥ १०० ॥

हें पहाण्याची आठवण तरी कोणाला रहाणार ? उघडच आहे,कीं घों घों शब्द करीत नद्यांचे प्रवाह सिंधुजळाला कां एकदां मिळाले, ह्मणजे मागें काय चाललें आहे हें पहाण्यास जसे ते परत येत नाहींत–अर्थात् ते जसे समुद्रच बनून जातात, त्याप्रमाणें चित्ताचें चैतन्य (ब्रह्म) झालें ह्मणजे सर्वत्र आनंदच आनंद होऊन सर्व यातायाती नाहींशा होतात.–अशी अविनाश वस्तु कोणती ती तुला सांगतों.–अर्जुना, सकळ जाणण्याचा जो शेवट–ह्मणजे जी जाणिवेची अर्थात् ज्ञानाची खाण तिला ज्ञान्यांच्या बुद्धीनें अक्षर–अर्थात् अविनाशी वस्तु असें ह्मणतात.

जें जाणणे या सुविद्येच्या गांवीं । गुरुत्वाची आ-
चार्यपदवी । जें सकळगुह्याचा गोसावी । प-
वित्रां रावो ॥ ४७ ॥
आणि धर्माचें निजधाम । तेवींचि उत्तमाचें उ-
त्तम । पैं जया येतां नाहीं काम । जन्मांतराचें ४८
मोठकें गुरुमुखें उदैजत दिसे । आणि हृदयीं
स्वयंभचि असे । प्रत्यक्ष फावों लागे तैसें ।
आपैसयाचि ॥ ४९ ॥
तेवींचि गा सुखाच्या पाउटीं । चढतां येईजे
जयाच्या भेटी । मग भेटल्या कीर मिठी ।
भोगणें याहि पडे ॥ ५० ॥
परि भोगाचिये ऐलीकडिलिये मेरे । चित्त उभें
ठेलें सुखाभरें । ऐसें सुलभ जाणि सोपारें । वरि
परब्रह्म ॥ ५१ ॥
पैंगा आणिकहि एक याचें । जें हाता आलिया
तरी न वचे । आणि अनुभवितां कांहीं न वेचे
वरि विटेंहि ना ॥ ५२ ॥
येथ जरी तू तार्किका । ऐसी हन घेशी शंका ।
ना येवढी वस्तु हे लोकां । उरली केवि पां ५३
जे एकात्तरेयाचिया वाढी । जळतिये आगींघालिती
उडी । ते अनायासें स्वगोडी । सांडीती केवीं ॥ ५४
तरी पवित्र आणि रम्य । तेवींचि सुखोपाय सु-

श्रीकृष्णांनीं या अध्यायांत अर्जुनाला ब्रह्मविद्येंतलें गुह्यांत गुह्य सांगितलें आहे.–अर्जुना,जाणणें या सुविद्येच्या–अर्थात् ब्रह्मविद्येच्या गांवांत गुरुत्वनात्यानें आचार्यपदवी ज्या वस्तूस असूनस कळगुह्यांचें गोसावीपण–अर्थात् अत्यंत गुह्य आणि पवित्रपणानें ज्याला राज्यत्व असून उत्तमांत उत्तम अशा धर्मांचें निजधाम जी वस्तु, ती हस्तगत केली असतां जन्मांतराचें काम–अर्थात् कारण रहात नाहीं,व जी वस्तु हृदयांत स्वयंभु असून गुरुमुखानें थोडा उपदेश होण्याबरोबर उदयास येते आणि आपोआप प्रकाशूं लागते, व ज्या योगानें सुखाच्या पायरीनें चढत चढत जाऊन भेट होतांच निश्चयानें जिची मिठी पडते–अर्थात् भोगाच्या अलिकडील सीमेवेर चित्त सुखानें उभें रहालें असतें, तें सुलभ आणि सोप्या रीतीनें परब्रह्मसुख पावते. परब्रह्मसुख हातीं आलें असतां, परब्रह्मसुखवस्तु जात नाहीं, जिचा अनुभव घेत असतां कांहीं खर्च होत नाहीं, व ज्या वस्तूचा अनुभव घेऊन घेऊन तिचा वीटही येत नाहीं, अशी ही अत्यंत सुखकारक वस्तु असतां, जगाच्या हातून कशी सुटली ? अशी अर्जुना, तू तार्किक–अर्थात् तर्कज्ञानी असल्या कारणानें शंका घेशील, आणि तुला असें वाटेल, कीं एक रुपया व्याजाच्या वाढीकरतां आपल्या पेटींतील शंभर रुपये जळत्या आगींत टाकतात–अर्थात् रक्कम देऊन व्याजाच्या आशेनें ती परत येईल कीं येईल या चिंतनेंत रहातात–ते लोक आपल्याजवळ

गम । आणि सुसुख परम धर्म्य । वरि आपण पां जोडे ॥ ९५ ॥

ऐसा अवघाचि हा सुखाड आहे । तरी जना हातीं केविं उरो लाहे । हा शंकेचा ठाव कीर होये । परि न धरावी तुवां ॥ ९६ ॥

अनायासानें असलेले व व्यय-अर्थात् उपभोग घेतला असतां कधींहि कमी न होणारें सुख कसें सोडतील? आणि जें सुख असें तसें नव्हे, परंतु-पवित्र आणि रम्य-रममाण करणारें-आणि सुखोपायाच्या सुगम मार्गानें प्राप्त होणारें असल्यानें सुसुख-अर्थात् उत्तमच सुखकारक असून परमधर्म्य-अर्थात् आपल्याचजवळउत्तम धर्माची प्राप्ति करून देणारें-असा हा सगळाच सुखाचा सुखाड (सुकाळ) असल्यानें तूं जी शंका घेतलीस (लोकांनीं हें सुख कसें सोडलें ही) ती शंका घेण्याला तुला खरोखर जागा आहे, परंतु ही घेऊं नकोस.-कां ह्मणून ह्मणशील, तर हा कसा प्रकार आहे, तो तुला दृष्टांतानेंच सांगतों.-दूध हें पवित्र (शुद्ध) आणि गोड असून एका त्वचेच्या पदराआड असतें, परंतु तें दूध सोडून गोचिड ज्याप्रमाणें अशुद्ध (रक्त) सेवन करते; अथवा कमलकंद आणि-दर्दुरी (बेडुक) हीं एकाच ठिकाणीं रहाणारीं असतात, तथापि कमलांतील पराग (मकरंद) भ्रमर सेवन करतात, आणि बेडूक ज्याप्रमाणें चिखल खातें; अथवा निदैवाच्या (हतभाग्याच्या) घरीं हजारों मोहोरा पुरल्या असून त्यावर बसून ज्याप्रमाणें तो निदैवी उपवास करीत असतो; त्याप्रमाणें अर्जुना, सर्व सुखांच्या विश्रांतीची जागा हृदयांत मी राम अर्थात् रमविणारा असतां, भ्रांतांना-अर्थात् इंद्रियानुरोधानें चालणाऱ्या लोकांचा काम (हेतु) विषयांवर असतो.-अर्थात् मला सोडून त्यांचा हेतु विषयांवर असतो, ह्मणून ते मला अंतरतात, असा दृष्टांत देऊन सांगण्याचा भाव.

पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड । परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेवी ॥ ९७ ॥

कां कमलकंदा आणि दर्दुरी । नांदणुक एकेचि घरीं । परि पराग सेविजे भ्रमरीं । येरां चिखलचि उरे ॥ ९८ ॥

नातरी निदैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरी । परि तेथ बसोनि उपवास करी । का दरिद्रें जिये ॥ ९९ ॥

तैसा हृदयामध्यें मी राम । असतां सर्व सुखाचा आराम । कीं भ्रांतासीं काम । विषयांवरी ॥ १०० ॥

बहु मृगजळ देखोनि डोळां थुंकिजे अमृताचा गिळितां गळाला । तोडिला परिस बांधिला गळां । शुक्तिकालाभें ॥ १०१ ॥

या लोकांची स्थिती कशी होते ह्मणशील, तर तोंडांत असलेला अमृताचा घोंट बहु मृगजल डोळ्यांनीं पहातांच थुंकून टाकावा, अथवा शुक्तिका (शिंपीच्या) लाभानें गळ्यांत बांधलेला परीस तोडून टाकावा.-ह्मणजे निवळ विषयावर इच्छा धरली असतां अमृताचा घोंट टाकून दिल्यानें अमृत नाहींसें होतेंच, आणि मृगजळ तर हातींच लागत नाहीं, अथवा परीस टाकून दिला असतां, सुवर्णप्राप्ति नाहींसी होतेच, आणि शिंपींत कांहींच हातीं लागत नाहीं, त्याप्रमाणें विषयछंदानें आत्मसुख नाहींसें होतेंच, परंतु विषयांत नित्यता

तैसी अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडीं । ह्मणोनि जन्ममरणाचिये दुथडीं । डहुळितें ठेली ॥ ६२ ॥
येन्हवीं मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा । केंही नसे न दिसे ऐसा । वाणीचा नोहें ॥६३॥

अर्थात् सारखेपण–नसल्यानें निरंतर दुःखच प्राप्त होतें, असा या दृष्टांताचा अभिप्राय. अर्जुना, मी कसा आहें ह्मणशील, तर, कोठें दिसतों न दिसतों असा वाणीचा (तोंच्याचा) नसून, पहावा तिकडे सूर्य जसा तोंडासमोर असतो, त्याप्रमाणें मी आहें; परंतु अहंममतेच्या (मी आणि माझेपणाच्या) लडबडींत बापुडीं–अर्थात् अज्ञान प्राणिमात्र गुतलीं असल्यानें, ते मजप्रत पावत नसून –मायानदीच्या–जन्ममरणरूपी दुथडीवर (दोन्ही किनाऱ्यांवर) गटांगळ्या खात असतात.

माझेया विस्तारलेपणाचेनि नांवें । हें जगचि नोहे आघवें । जैसें दूध मुरालें स्वभावें । तरी तेंचि दहीं ॥ ६४ ॥
कां बीजचि जाहलें तरू । अथवा भांगाराचि आळंकारू । तैसा मज एकाचा विस्तारू । तें हें जग ॥ ६५ ॥
हें अव्यक्तपणें थिजलें । तेंचि मग विश्वाकारें वोथिजलें । तैसें अमूर्ताचि मूर्तिमय विस्तारिलें । त्रैलोक्य जाणे ॥ ६६ ॥
महदादि देहांतें । इयें अशेषेंहि भूतें । पैं माझ्या ठायीं बिंबतें । जैसें जळीं फेण ॥ ६७ ॥
परि तया फेना आंत पहातां । जेवीं जळ न दिसे पंडुसुता । नातरी स्वप्नींची अनेकता । चेईलया नोहिजे ॥ ६८ ॥
तैसीं भूतें इये माझ्या ठायीं । बिंबती तयांमाजी मी नाहीं । इया उपपत्ती तुज पाहीं । सांगितलिया मागां ॥ ६९ ॥
ह्मणऊनि बोलिलिया बोलाचा अतिसो । न कीजे यालागीं हें असो । परि मज आंत पैसो । दिठी तुझी ॥ ७० ॥

अर्जुना,–माझ्या विस्तारलेपणाच्या नांवानेंच हें आघवें (सगळें) जग झालें नाहीं काय ?–झालें ह्मणण्याचा भावार्थ–मुरालें (विरजलें) ह्मणजे स्वभावता दूधच दही जसें होतें,–अर्थात् दही हा दुधाचा विस्तार असा भावार्थ–अथवा बीजाचा तरु, किंवा भांगाराचा (सोन्याचा) अलंकार, तसा जग हा माझा विस्तार आहे.–हा विस्तार कसा झाला ह्मणशील, तर मी–अव्यक्तपणांत–अर्थात् निराकारत्वांत थिजलों आहें, आणि तोच विश्वाकारांत वितुळलों आहें; ह्मणून अमूर्तच मूर्तीमय हा त्रैलोक्यरूपानें मी विस्तारलों आहें. माझा विस्तार कसा आहे ह्मणशील, तर या महदादि तत्त्वापासून तों अणुरेणु–देहापर्यंत झाडून सर्व भूतें (प्राणिमात्र) पाण्यावर जसा फेण दिसतो, त्याप्रमाणें तीं माझ्याठायीं भासतात. तथापि त्या फेणांत पाहूं गेलें असतां जसें जळ दिसत नाहीं, अथवा स्वप्नींची अनेकता–अर्थात् स्वप्नांतील नानाप्रकार जागें झाल्यावर जसें नाहींसे होतात, त्याप्रमाणें भूतें हीं माझ्याठायीं असतात, परंतु त्यांच्यांत मी (वरील दृष्टांताप्रमाणें) नाहीं हा माझा आणि भूतांच्या उपपत्तीचा प्रकार मागें (७ व्या अध्यायांत) सांगितल्याची आठवण कर; ह्मणून सांगितलेली गोष्ट फिरून न सांगतां इतकीच आतां ठेवतों. परंतु माझ्यांत तुझी दृष्टी प्रवेश करो–अर्थात् माझ्या स्वरूपाच्या ठिकाणीं तुझी दृष्टी ठेव असा सांगण्याचा भावार्थ.

आमुच्या प्रकृती पैलिकडील भावो । जरी कल्पनेवीण लागसी पाहों । तरी मजमाजी भूतें होंहि बावो । जें मी सर्व ह्मणऊनी ॥ ७१ ॥

अर्जुना–मायेच्या पलिकडील माझें स्वरूप कल्पनेवांचून जर पाहूं लागलास, तर मीच सर्व आहें, ह्मणून माझ्यामध्यें भूतें आहेत,–असें जें तुला सांगितलें,–तें

येऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे । नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे । ह्मणोनि अखंडितचि परि झांवळे । भूतभिन्न ऐसें देखे ॥७२॥
तेचि संकल्पाची सांज जैं लोपे । तैं अखंडितचि आहे स्वरुपें । जैसें शंका जात खेवो लोपे । सापपण माळेचे ॥ ७३ ॥

देखील खोटें दिसेल.-पण होतें काय, कीं संकल्पाच्या सांजवेळेस-अर्थात् द्वैतभावांत पूर्णपणें गढून गेलें असतां नावेक (कांहींवेळ) बुद्धीच्या डोळ्यांवर अंधकार येतो, ह्मणून, ब्रह्म अखंड असतांहि बुद्धीचे डोळे भ्रमांत पडून त्यांना भूतें भिन्न आहेत असें दिसतें. तीच संकल्पाची सांजवेळ नाहींशी होण्याबरोबर स्वरूपेंकरून मी अथवा ब्रह्म-अखंडित आहें असें दिसते. याला दृष्टांत शंका आहे तोंपर्यंत साप आणि तीच शंका नाहींशी होण्याबरोबर सापाची माळ दिसते.-असा प्रकार संकल्पाचा आहे. ह्मणजे संकल्पानें ब्रह्म खंडित दिसेंत, तेंच त्याच्या निवृत्तीबरोबर अखंड दिसूं लागते असें या दृष्टांतानें सुचविण्याचा आशय.

येऱ्हवीं तरी भूमीआंतूनि स्वयंभ । काय घडेया गाडगेयांचे निघती कोंभ । परि ते कुलालमतीचे गर्भ । उमटले कीं ॥ ७४ ॥
नातरी सागरीच्या पाणी । काय तरंगाचिया आहाति खाणी । ते अवांतर करणी । वार याची नव्हे ॥ ७५ ॥
पाहे पा कापसाच्या पोटीं । काय कापडाची होती पेटी । तो वेढितयाचिया दिठी । कापड जाहला ॥ ७६ ॥
जरी सोनें लेणें होऊनि घडे । तरी तयाचें सोनेपण न मोडे । येर अलंकार हे वरचिलीकडे । ले तयाचेनि भावें ॥ ७७ ॥
सांगे पडिसादाचीं प्रत्युत्तरें । कां आरिसा जें आविष्करे । तैं आपलें कीं साचोकारें । तेथेंचि होते ॥ ७८ ॥
तैसी इये निर्मळे माझ्या स्वरूपीं । जो भूत भावना आरोपी । तयासि तयाच्या संकल्पीं । भूताभास असे ॥ ७९ ॥
तेचि कल्पिती प्रकृती पुरे । तरी भूताभास आर्धीच सरे । मग स्वरूप उरे एकसरें । निखळ माझें ॥ ८० ॥
हें असो आंगीं भरलिया भवंडी । जैशा भोंवत

संकल्पावांचून कोणतीही गोष्ट होत नाहीं हा प्रकार नीटपणें लक्षांत येण्याकरतां हे पुढचे निरनिराळ्या प्रकारचे दृष्टांत आहेत.-भूमींतून घडलेल्या गाडग्याचे स्वयंभू कांहीं कोंभ निघत नाहींत, परंतु ते कुलालमतीचे गर्भ असतात-अर्थात् कुंभाराच्या बुद्धींतून गाडगें तयार करण्याची कल्पना निघालेली असते. सागराच्या पाण्यांत तरंगांच्या (लाटांच्या) खाणी कां असतात ? -नसतात असा भावार्थ-परंतु लाटांचा खेळ ही वेगळीच वाऱ्याची करणी आहे. कापसाच्या पोटांत कापडाची पेटी कां असते ? परंतु कापूस (वस्त्ररूपानें) आंगावर घेणाराच्या दृष्टीनें कापूस कापड बनला कीं नाहीं ? अलंकारानें सोनें घडलें जातें, तथापि अलंकारांत सोनेंपण नाहींसे होत नाहीं; परंतु अलंकार घालणाऱ्याच्या भावानें (दृष्टीनें) वरवर तें अलंकारस्वरूप दिसतें.- आणखीं असें पहा, कीं,-पडिसादाची प्रत्युतरें (प्रतिध्वनी) अथवा आरशांत जें प्रतीबिंब दिसतें, तें,-हे दोन्ही प्रकार-खऱ्या रीतीनें पाहूं गेलें असतां, ते आपलेच त्या ठिकाणीं प्रकट होतात कीं नाहीं ? -पण वर जे प्रकार सांगितले, त्यांत वास्तविक प्रकार असतो एक, आणि भास होतो दुसऱ्याचा, अशी संकल्पस्थिती असल्यानें-संकल्पाच्या योगानें माझ्या निर्मळ स्वरूपांत जो भूतभावनेचा आरोप करतो, त्यालाच त्याच्या संकल्पाच्या योगानें माझ्यांत भूताभास-अर्थात् भूतें मा-

दिसती अरडी दरडी । तैशी आपलिया
कल्पना अखंडीं । गमती भूतें ॥ ८१ ॥
तेचि कल्पना सांडूनि पाहीं । तरी मी
भूतीं भूतें माझियाठायीं ।हें स्वप्नींहि परि नाहीं ।
कल्पावया जोगें ॥ ८२ ॥
आतां मीच एक भूतांतें धर्ता । अथवा
भूतांमाजी मी असता । या संकल्प सन्निपाता ।
आतुलिया बोलिया ॥ ८३ ॥
ह्मणोनि परियेसीं गा प्रियोत्तमा । या परी मी
विश्वेसी विश्वात्मा । जो इया लटकिया
भूतग्रामा । भाव्य सदा ॥ ८४ ॥
रश्मीचेनि आधारें जैसें । नव्हे तेचि मृगजळ
आभासे । माझ्या ठायीं भूत जात तैसें ।
आणि मातेंहि भावी ॥ ८५ ॥
मी ये परीचा भूतभावनु । परि सर्व भूतांसी
अभिन्नु । जैसी प्रभा आणि भानु ।
एकचि ते ॥ ८६ ॥
हा आमुचा ऐश्वर्ययोग । तुवा देखिला कीं
चांग । आतां सांगे कांहीं एथ लाग ।
भूतभेदाचा असे ॥ ८७ ॥
यालागीं मजपासूनि भूतें । आनें नव्हती हें
निरुतें । आणि भूतां वेगळिया मातें ।
कांहींच न मनी हो ॥ ८८ ॥

इथ्यांत आहेत असा होतो. तीच कल्पना करणारी माझी प्रकृती नाहींसी व्हायची खोटी, कीं तिच्या आधींच भूताभास नाहींसा होऊन माझेंच एक अखंड निखळ (शुद्ध) स्वरूप उरतें.–आतां याजवरून निष्पन्न काय होतें, कीं भूतांना धारण करणारा मी, अथवा भूतांमध्यें मी असणारा, या ज्या कल्पना आहेत, त्या केवळ संकल्प (रूपी) सन्निपातांतल्या होत, याजकरितां हे प्रियोत्तमा–अत्यंत प्रिय अर्जुना–या लटक्या भूतग्रामाला–अर्थात् मायाग्रस्त प्राणिमात्राला–मी भूतांचा धर्ता, आणि भूतांमध्यें मी–अशा निरंतर भावना (कल्पना) करण्याला–या (मागें सांगितलेल्या) प्रकारचा मी विश्वाला विश्वात्मा आहें–असा भाव. अथवा–विश्वासह विश्वात्मा मी आहें. माझ्या संबंधानें कल्पना कशा करतात ह्मणशील, तर मुळांत पाणी नसतां सूर्यकिरणांच्या आधारानें जसा मृगजळाचा आभास होतो–अर्थात् पाण्याची कल्पना होते, त्याप्रमाणें–वस्तुतः दोन प्रकार नसतां–माझ्याठायीं सर्व भूतजात आणि भूतांमध्यें मी अशी भावना करतात. अर्जुना (वर सांगिल्या प्रकारानें) मी भूतभावनु–प्राणिमात्रांनीं कल्पना करण्यासारखा–होतों, परंतु प्रभा आणि भानु (प्रकाश आणि सूर्य)–हीं जशीं एकच असतात,–अर्थात् सूर्यापासून प्रकाश अथवा प्रकाशापासून सूर्य जसे भिन्न होऊ शकत नाहींत, त्याप्रमाणें सर्व भूतांत मी अभिन्न आहें, अथवा सर्व भूतें आणि मी अभिन्न आहोंत–अर्थात् एकच आहोंत. अर्जुना हा आमचा ऐश्वर्ययोग तुला आतां चांगला समजला आहे, तेव्हां तूंच सांग बरें या ठिकाणीं माझ्यांत भूतभेदाला कांहीं लाग (संबंध) आहे कां ? –नाहीं हा भाव.–ह्मणून खरोखर भूतें (प्राणिमात्र) मजहून निराळीं नाहींत हे पक्कें लक्षांत ठेव, आणि भूतांहून वेगळा मी आहें अशीहि गोष्ट मनांत आणू नकोस.

पैं गगन जेवढें जैसें । पवनहि गगनीं तेवढाचि
असे । सहजे हालविलिया वेगळा दिसे ।
येऱ्हवीं गगन तेंचि तो ॥ ८९ ॥
तैसें भूतजात माझ्या ठायीं । कल्पिजे तरी आ-
भासे कांहीं । निर्विकल्पीं तरी नाहीं ।
तेथ मीचि मी आघवें ॥ ९० ॥

–अर्जुना, माझ्या ठिकाणीं आणखी अशा प्रकारची कल्पना करतात, कीं–जेवढें गगन तेवढाच त्यांत पवन (वायु) असतो, परंतु हालिवल्याच्या योगानें पवन निराळा दिसतो, नाहींतर गगन तोच पवन आहे. त्याप्रमाणें कल्पना केली, तर भूतजातांचा माझ्या ठायीं आभास आहे, परंतु निर्विकल्पांत माझा मीच

ह्मणऊनि नाहीं आणि असे । हे कल्पनेचेनि सौरसें । जें कल्पना लोपे भ्रंशे । आणि
कल्पनेसवे होय ॥ ९१ ॥
तेंचि कल्पितें मुदल जाये । तैं असे नाहीं हें कें आहे । ह्मणऊनि पुढती तूं पाहें ।
हा ऐश्वर्य योग ॥ ९२ ॥
ऐसिया प्रतीतिबोधसागरीं । तू आपणेयातें कल्लोळ एक करीं । मग जंव पाहासी चरा
चरीं । तंव तूचि आहासी॥९३॥
या जाणणेयाचा चेवो । तुज आला ना ह्मणती देवो । तरी आतां द्वैत स्वप्न वावो ।
जालें कीं ना ॥ ९४ ॥
तरी पुढती जरी विपायें । बुद्धीसी कल्पनेची झोंप ये । तरी अभेद बोध जाये ।
जैं स्वप्नीं पडिजे ॥ ९५ ॥
ह्मणोनि ये निद्रेची वाट मोडे । निखिळ उद्बोधाचेचि आपणपें घडे । ऐसें वर्म जें आहे
फुडें । तें दावो आतां ॥ ९६ ॥
तरी धनुर्धरा धैर्या । निकें अवधान देईं या धनंजया । पैं सर्व भूतांतें माया ।
करी हरी गा ॥ ९७ ॥

सगळा आहें—अर्थात् भूतें आणि मी अभिन्न. ह्मणून नाहीं आणि असे हें (केवळ) कल्पनेचें सौरस्य (अभिप्राय) आहे. तेव्हां अर्थातच कल्पना लोपाबरोबर भ्रंशावें (नाहींसे व्हावें) आणि कल्पने बरोबर व्हावें—हें साहजिक आहे–परंतु कल्पना करणारे मुदल–अर्थात् मन जातांच (नाहींसे होतांच) असे आणि नाहीं–हे–कल्पित प्रकार कोठें रहाणार ? ह्मणून अर्जुना, तू तुझ्यापुढें हा (माझा) ऐश्वर्ययोग पहा, आणि त्याच्या प्रतीतीनें (अनुभवानें) ज्ञानरूप सागरामध्यें तूं आपल्याला कल्लोळ (तरंग) करून घेऊन मग या चराचरांत (स्थावर जंगमांत) पहाशील, तेव्हां ते सर्व तूं एकच आहेस–असें दिसेल.–तर अर्जुना, आतां तुझ्यांत या जाणणें याचा चेवो–अर्थात् सांगितलेल्या ज्ञानाचा उदय–झाला ना ?– झाला असा भाव–तर मग आतां तुझें द्वैत स्वप्न वावो (खोटें) झालें कीं नाहीं ?–झालें असा अर्जुनाच्या तोंडून बोलिवण्याचा भाव—परंतु पुढें कदाचित् तुझ्या बुद्धीस कल्पनेची झोंप आली, तर स्वप्नांत पडल्याप्रमाणें तुझा अभेदबोध–अर्थात् अद्वैतज्ञान जाईल (नाहींसें होईल), याकरितां बुद्धीला कल्पनेची झोंप येण्याची वाट मोडली जाऊन आपण शुद्ध उद्बोधाचे (जाणपणाचे अर्थात् ज्ञानरूपी) व्हावें असें जें कांहीं वर्म (तत्त्व) आहे, तें आतां तुला दाखवितों–अर्थात् सांगतों. परंतु अर्जुना, येवढी गोष्ट लक्षांत ठेव, कीं सर्व भूतांना उत्पन्न करणारी व त्यांचा लय करणारी मायाच आहे.

जिये नांव गा प्रकृती । जे द्विविध सांगितला तुजप्रती । एकी अष्टधा भेदव्यक्ती ।
दुजी जीवरूपा ॥ ९८ ॥
हा प्रकृती विखो आघवा । तुवां मागां परिसिलासे पांडवा । ह्मणोनि असो काइ सांगावा ।
पुढतपुढती ॥ ९९ ॥

या मायेचें नांव प्रकृती असें आहे; परंतु ही तुला दोन प्रकारांनीं (७ व्या अध्यायांत) सांगितली आहे. एक अष्टधाभेदव्यक्ती–ह्मणजे पंचमहाभूतें आणि मन-बुद्धी-अहंकार–आणि दुसरी जीवरूपा–हिला जीवभूता असेंहि ह्मणतात.–परंतु हा प्रकृतिविषय तूं मागें ऐकिला आहेस ह्मणून पुन्हां आतां सांगत नाहीं.

तरी ये माझिये प्रकृती । महाकल्पाच्या अंतीं । सर्व भूतें अव्यक्तीं । ऐक्यासी येती ॥ १०० ॥
ग्रीष्माच्या अतिरसीं । सबीजें तृणें जैसीं । मागुती भूमीसी । मुळीनें होती ॥ १०१ ॥

अजुना, महाप्रलय कालाच्या अंतीं हीं सर्वभूतें अव्यक्त प्रकृतींत (सूक्ष्ममहाकारणांत) ऐक्यास येतात–अर्थात् येऊन मिळतात.–कशी ह्मणून विचारशील, तर सांगतों हे दृष्टांत लक्षांत घे.–ग्रीष्माच्या अतिरसीं–ह्मणजे ऊष्णकालच्या तीव्र तापांत बीजासह

का वार्षिये ढेंढें फिटे । जेव्हां शारदीयेचा अनुघडु फुटे । तेव्हां घनजात आटे ।
गगनींचे गगनीं ॥ १०२ ॥
नातरी आकाशाचे खोपे । वायु निवांतचि लोपे । कां तरंगाकार हारपे ।
जळीं जेवीं ॥ १०३ ॥
अथवा जागिनलिये वेळे । स्वप्न मनींचे मनीं मावळे । तैसें प्राकृत प्रकृती मिळे ।
कल्पक्षयीं ॥ १०४ ॥
मग कल्पादी पुढती । मीचि सृजी ऐसी वदंती । तरी इये विषयीं निरुती ।
उपपत्ती आइक ॥ १०५ ॥

तृणें (गवत) जशी पुन्हां भूमींतच सुलीन (गुप्त) होऊन जातात, अथवा पर्जन्यकाळचे अवडंबर जाऊन गुप्तपणांत असलेला शरदृतु प्रकट होतो, तेव्हां घनजात (मेघ समुदाय) जसा गगनांतल्या गगनांत आटून जातो–अर्थात् नाहींसा होऊन जातो; अथवा आकाशाच्या पोटांत वायु जसा निवांत लोपतो (लीन होतो) अथवा तरंगाकार (लाटांचा आकार) जसा पाण्यांत हारपून जातो; अथवा जागृतीच्या वेळेस स्वप्न जसें मनांतल्या मनांतच मावळतें, त्याप्रमाणें प्राकृत ह्मणजे प्रकृतीनें केलेलें कल्पक्षयीं (महाप्रलय समयीं) प्रकृतींतच मिळतें. मग पुढच्या कल्पाच्या आदि (आरंभी) मीच पुन्हां सृष्टी उत्पन्न करतों ह्मणून ह्मणतात, त्यांतला खरा प्रकार काय आहे, तो तुला सांगतों ऐक.

तरी हेचि प्रकृती किरीटी । मी स्वकीया सहजें अधिष्ठीं । तेथ तंतू समवाय पटीं ।
जेवीं विणावणी दिसे ॥ १०६ ॥
मग तिये विणावणीचेनि आधारें । लाहाना चौकडिया पटत्व भरे । तैसी पंचात्मकें
आकारें । प्रकृतीचि होय ॥ १०७ ॥
जैसें विरजणियाचेनि संगें । दूधचि आटे जों लागे । तैसी प्रकृती आंगा रिगे ।
सृष्टीपणाचिया ॥ १०८ ॥
बीज जळाची जवळीक लाहे । आणि तेंचि शाखोपशाखीं होये । तैसें मज करणें आहे ।
भूतांचें हें ॥ १०९ ॥
अगा नगर हें रायें केलें । या ह्मणणया साचपण कीर आलें । परि निरुतें पहातां काय
सिणले । रायाचे हात ॥ ११० ॥
आणि मी प्रकृती अधिष्ठीं तें कैसें । जैसा स्वप्नीं जो असे । मग तोचि प्रवेशें ।
जागृतावस्थे ॥ १११ ॥
तरी स्वप्नौनि जागृती येतां । काय पाय दुखती पंडुसुता । कीं स्वप्नामाजी असतां ।
प्रवास होय ॥ ११२ ॥
या आघवियाचा अभिप्रावो काई । जें हें

अर्जुना, या प्रकृतीचा जेव्हां मी सहज आश्रय करतों, तेव्हां तंतुसमवायपटी–ह्मणजे वस्त्राच्या विणकरींत तंतुसमुदाय दिसतो, आणि त्याच विणकरीच्या आधारानें लहान लहान चौकड्या एकत्र होऊन वस्त्र होतें. तशीं हीं पंचमहाभूतें (एकत्र होऊन) प्रकृतीच आकारते–अर्थात् प्रगट होते. मग विरजणाच्या संबंधानें दुधाला जसा दह्याचा विकार होतो, त्याप्रमाणें प्रकृती ही सृष्टीपणाच्या आकारांत शिरू लागते–अर्थात् विकारते.–ह्मणजे हा कसा प्रकार होतो ह्मणशील, तर–बीजाला पाण्याचा जवळिकपणा सांपडण्याची खोडी, कीं तेंच बीज शाखापल्लवांनीं विस्तार पावतें. तशांतला प्रकार मी भूतें निर्माण करण्याचा आहे.–ह्मणजे प्रकृतीला माझा शेजार मिळण्याची खोडी, कीं तिला पंचमहाभूतांचा विस्तार झालाच. पण असें पहा–अमुक एक नगर अमक्या राजानें बांधलें असें ह्मणतात, आणि त्या ह्मणण्याला खरेपणहि असतें, परंतु तें बांधण्याच्या कामीं राजाच्या हाताला कांहीं शीण होतात का ? त्याप्रमाणें माझ्या मायेला आश्रय कसा असतो ह्मणशील, तर स्वप्नांत जो असतो, तो जागृतावस्थेंत येण्या सारखा– अर्थात् स्वप्नांतून जागृतावस्थेंत येणाऱ्याचे अथवा स्वप्नांत प्रवास करणाऱ्याचे पाय कधीं दुखतात का ? हे असे दृष्टांत सांगण्याचा अभिप्राय हाच, कीं या भूतसृष्टीचें एकहि करणें मला नाहीं असा आहे. दुसरें असें पहा, कीं

भूतसृष्टीचें कांहीं । मज एकाहि करणें
नाहीं । ऐसाचि अर्थ ॥ ११३ ॥
जैसी राये अधिष्ठिली प्रजा । व्यापारे आपुला-
लिया काजा । तैसा प्रकृतिसंग माझा । येर
करणें तें इयेचें ॥ ११४ ॥
पाहें पां पूर्णचंद्राचिये भेटी । समुद्रीं अपार
भरतें दाटी । तैथ चंद्रासी काय किरीटी ।
उपखा पडे ॥ ११५ ॥
जड परि जवळिका । लोह चळे तरी चळो
कां । तरी कवण शीण भ्रामका ।
सन्निधानाचा ॥ ११६ ॥
किंबहुना यापरी । मी निजप्रकृती अंगि-
कारीं । आणि भूतसृष्टी एकसरी ।
प्रसवोचि लागे ॥ ११७ ॥
जो हा भूतग्राम आघवा । असे प्रकृती आधीन
पांडवा । जैसी बिजाचिया वेलपालवा ।
समर्थ भूमी ॥ ११८ ॥
नातरी बाळादिकां वयसा । गोसावी दे-
हसंग जैसा । अथवा घनावळी आकाशा ।
वार्षिये जेवीं ॥ ११९ ॥
कां स्वप्नासी कारण निद्रा । तैसी प्रकृती
हे नरेंद्रा । या अशेषाहि भूत समुद्रा ।
गोसाविणी गा ॥ १२० ॥
स्थावरा आणि जंगमा । स्थूळा अथवा सूक्ष्मा ।
हे असो भूतग्रामा । प्रकृतीचि मूळ ॥ १२१ ॥
म्हणोनि भूतें हन सृजावीं । का सृजिलीं प्रति-
पाळावीं । इयें करणी न येती आघवीं ।
आमुचिया आंगा ॥ १२२ ॥
जळीं चंद्रिकेचिया पसरती वेली । ते
वाढी चंद्रे नाहीं केली । तेवीं माते पा-
वोनि ठेली । दूरी कर्में ॥ १२३ ॥

आणि सुटलिया सिंधुजळाचा लोट । न शके
धरू सैंधवाचा घाट । तेवीं सकळ कर्मा मीच
शेवट । तीं काय बांधती मातें ॥ १२४ ॥

राजानें प्रजेला आश्रय दिला म्हणजे ती प्रजा जशी आपापल्या व्यवहाराला लागते, त्याप्रमाणें प्रकृतीसंग मात्र माझा आहे, बाकी सगळें करणें हा प्रकृतीचा व्यापार आहे. पौर्णिमेचा पूर्णचंद्र पहातांच समुद्राला अपार भरती येऊन लाटावर लाटा उसळत असतात म्हणून चंद्राला कांहीं श्रम पडतात कां ? अथवा जड असून भ्रामक (लोहचुंबक) जवळ येण्या बरोबर लोखंड जवळ जवळ येऊ लागतें, म्हणून लोखंडाच्या हालण्या बद्दल सन्निधान संबंधानें लोकाचुंबकाला कांहीं श्रम पडतात कां ? फार काय सांगावें अर्जुना, (दृष्टांतानें) वर सांगितल्या प्रकारानें मीं मायेचा अंगीकार केलेला असतो, म्हणून एकसारखी भूतसृष्टी उत्पन्न होऊं लागते.—परंतु भूतसृष्टींत मला म्हणून कांहीं कर्तव्य नाहीं.—म्हणून बीजापासून उत्पन्न होणाऱ्या वेल पालवीस जसा भूमीचा आश्रम असतो, तसा या भूतसृष्टीला प्रकृतीचा आधार आहे.—किंबहुना वेल पल्लव जसे भूमीच्या आधीन, तशी ही भूतसृष्टी प्रकृतीच्या आधीन आहे.— अथवा बालतारुण्यादि वयसेला मुख्य आधार जसा देह, अथवा मेघरूपी आकाशाला मुख्य आश्रा जसा पर्जन्यकाळ; अथवा स्वप्नाला मुख्य आधार जशी निद्रा; तशी या झाडून सर्व भूतसृष्टीची गोसांवीण अर्थात् स्वामीण प्रकृती आहे. स्थावर असो अथवा जंगम असो, स्थूळ असो अथवा सूक्ष्म असो,—सारांश भूतग्राम म्हणून जें कांहीं आहे, त्याचें मूळ ही प्रकृती आहे. म्हणून भूतें उत्पन्न करावीं, अथवा उत्पन्न केलेल्या भूतांचा प्रतिपाळ करावा, यांपैकीं कोणतेंहि कृत्य करण्याचे आमच्याकडे येत नाहीं.—भूतांना उत्पन्न करणें आणि त्यांचा प्रतिपाळ करणें, हीं कर्में जरी माझ्यापासून झालीं आहेत, तरी पाण्यांत चांदण्याच्या ज्या वेली पसरतात, त्यांची वाढ जशी चंद्राला ठाऊक नसते, त्याप्रमाणें हीं कर्में मजपासून खरी, परंतु तीं दूर असतात.

आणि जवळ आलीं तरी—सैंधवाचें (मिठाचें) धरण जसें समुद्राच्या लोटाला धरू शकत नाहीं—अर्थात् सैंधव हा समुद्रपाण्याचाच परिणाम असल्यानें आड न येतां त्यांतच मिसळून जातो—त्याप्रमाणें कर्माचा शेवट मी असल्या कारणानें, कर्में मला बांधूं शकत नाहींत.

येऱ्हवीं इये प्रकृती विकारीं । एक मीचि
असे अवधारीं । परि उदासीनाचिया परी ।
करीं ना करवीं ॥ १२७ ॥
जैसा दीप ठेविला परिवरीं । कवणातें नियमी
ना निवारी । आणि कवण कवणिये व्यापारीं ।
राहाटे तेहि नेणें ॥ १२८ ॥
तो जैसा कां साक्षीभूतु । गृहव्यापार
प्रवृत्ति हेतु । तैसा भूतकर्मीं अनासक्तु ।
मीं भूतीं असे ॥ १२९ ॥

अर्जुना, पाहूं गेलें तर या प्रकृतीच्या विकारांत एक मीच आहें, परंतु उदासीनासारखा आहें–ह्मणजे मी कांहीं करीत नाहीं, अथवा करवीतहि नाहीं, परंतु गृहदीपाप्रमाणें असतों. दिवा घरांत कोणाला अमुक कर अथवा करूं नको ह्मणून सांगत नाहीं, आणि कोण कोणता व्यापार करतो हेंहि तो जाणत नाहीं. तथापि गृहव्यापार हेतूला तो जसा साक्षीभूत अथवा कारण आहे, तसा भूतांत मी असून भूतकर्मांविषयीं मी उदासीन असतों.

जें लोकचेष्टा समस्तां । जैसा निमित्तमात्र
कां सविता । तैसा जगत्प्रभवीं पंडुसुता ।
हेतु मी जाणे ॥ १३१ ॥
कां जे मियां अधिष्ठिलीया प्रकृती । होती
चराचराचिया संभूती । ह्मणोनि मी हेतु
हे उपपत्ती । घडे यया ॥ १३२ ॥
आतां येणें उजियेडें निरुतें । न्याहाळी पां
ऐश्वर्ययोगातें । जे माझ्याठायीं भूतें । परी
भूतीं मी नसे ॥ १३३ ॥
अथवा भूतें माझ्याठायीं । आणि भूतां-
माजी मी नाहीं । या खुणा तूं कहीं ।
चुकों नको ॥ १३४ ॥
हें सर्वस्व आमुचें गूढ । परि दाविलें तुज
उघड । आतां इंद्रियां देऊनियां कवाड ।
हृदयीं भोगी ॥ ११९ ॥
हा दंश जंव न ये हाता । तंव माझें सा-
चोकारपण पार्था । न संपडे गा सर्वथा ।
जेवीं तुषीं कण ॥ १३६ ॥

तथापि लोकचेष्टेला–अर्थात् व्यवहाराला निमित्य जसा सविता (सूर्य) आहे, तसा सृष्टीउत्पत्तीला हेतु (कारण) मी आहें असें समज.–मी कारण कां आहे ह्मणशील, तर–मी प्रकृतीचा आश्रय केला, ह्मणून तिच्या पासून या चराचराची उत्पत्ती झाली. याजकरतां जगाला हेतु मी अशी उपपत्ती ठरते. आतां या न्यानानें–अर्थात् खऱ्या ज्ञानानें तू माझ्या ऐश्वर्ययोगाकडे न्याहळून पहाशील, तर भूतें माझ्या ठायीं आहेत; परंतु भूतांमध्यें मी नाहीं असें तुला दिसून येईल. अथवा भूतें माझ्याठायीं नाहींत–आणि भूतामध्यें मी–नाहीं असें दिसेल, ह्मणून या ज्या माझ्या ऐश्वर्ययोगाच्या खुणा आहेत, त्या अर्जुना, तू चुकूं नकोस. कारण हेंच काय तें आमचें गुह्यांत गुह्य गूढ तत्त्व आहे.तें आतां तुला उघड करून दाखिवलें आहे, ह्मणून इंद्रियांना कवाड देऊन–अर्थात् इंद्रियांना विषयांवरून ओढून हृदयमंदिरांत या सुखाचा उपभोग घे. अर्जुना हा दंश–अर्थात् हें मर्म जोंपर्यंत हातीं आलें नाहीं, तोंपर्यंत माझें खरें स्वरूप कोणालाहि सांपडणार नाहीं. दाण्याच्या इच्छेनें खुशाल कोंडा कांडित बसावें असा तो प्रकार आहे.

येऱ्हवीं अनुमानाचेनि पैसें । आवडे कीर कळ-
लें ऐसें । परि मृगजळाचेनि बोलांशें । काय
भूमी तिमे ॥ १३७ ॥

अर्जुना, माझें स्वरूप ओळखण्याचा वर सांगितलेला दंश– अनुमानाच्या विस्तारानें निश्चित कळला असें वाटतें, परंतु अनुमानाचें कळणें ह्मणजे मृगजलानें जमीन भिजवून तिला ओलावा आणण्यासारखें आहे, अर्थात् मृगजलानें जमीन भिजत नाहीं, तसें अनुमानानें कळल्यानें माझें स्वरूपज्ञान होत नाहीं; परंतु

तैसे बोलवरी वाचाबळें । वायांचि झकविजती
प्रतीतीचे डोळे । मग साचोकारें बोधावेळे ।
आथि ना होइजे ॥ १३९ ॥

केव्हां केव्हां वाचेचे जे बळकट आहेत–अर्थात् जे चतुर बोलके आहेत, त्यांच्या बोलांवर प्रतीतीचे डोळे–अर्थात् ज्ञानीहि झकवले (फसले) जातात. परंतु खऱ्या रीतीनें आत्मबोधाचा प्रकार त्यांच्यांत पाहूं जाते वेळीं कांहीं नाहीं असें दिसतें.–तात्पर्य अनुभवावांचून वाचाबळ व्यर्थ.

पैं स्थूळदृष्टी देखती मातें । तेंचि न देखणें
जाण निरुतें । जैसें स्वप्नींचेनि अमृतें । अमर
नोहिजे ॥ १४४ ॥
तेंवि मी ह्मणोनि प्रपंचीं । जिहीं बुडी दिधली
कृतनिश्चयाची । तिहीं चंद्रासाठीं जेंवि जळींची । प्रभा धरिली ॥ १९० ॥
ह्मणोनि मोहिलेनि मनोधर्में । हेंचि भी मानूनि
संभ्रमें । मग येथीचीं जियें जन्मकर्में । तियें
मजचि ह्मणती ॥ १९९ ॥
येतुलेनि अनाम[1] नाम । मज अक्रियासि कर्म ।
विदेहासी देहधर्म । आरोपिती ॥ १९६ ॥
मज आकारशून्या आकार । निरुपाधिका उपचार । मज विधिवर्जिता व्यवहार । आचारादिक ॥ १९७ ॥
मज वर्णहीना वर्ण । गुणातीतासि गुण । मज
अचरणा चरण । अपाणिया पाणी ॥ १९८ ॥
मज अमेया मान । सर्वगतासी स्थान । जैसें
सेजेमाजी वन । निदेला देखे ॥ १९९ ॥
तैसें अश्रवणा श्रोत्र । मज अचक्षूसी नेत्र । अगोत्रा गोत्र । अरूपा रूप ॥ १६० ॥
मज अव्यक्तासि व्यक्ती । अनार्तासि आर्ती ।
स्वयंतृप्ता तृप्ती । भाविती गा ॥ १६१ ॥
मज अनावरणा प्रावरण । भूषणातीतासि भूषण । मज सकळकारणा कारण । देखती तें६२
मज सहजातें करिती । स्वयंभातें प्रतिष्ठिती ।
निरंतरातें आव्हानिती । विसर्जिती गा॥१६३॥
मी सर्वदा स्वतःसिद्ध । तो कीं बाळ-तरुण वृद्ध ।
मज एकरूपा संबंध । जाणती ऐसे ॥ १६४ ॥

अर्जुना, स्थूलदृष्टीनें जे कोणी मला पाहतील, तें त्यांचें खरें पहाणेंच नाहीं. कारण स्वप्नांत अमृत प्यायल्यानें कोणी अमर होत नाहीं. भावार्थ– अमर व्हायचें असेल, तर जागृतींत अमृतपान पाहिजे. त्याचप्रमाणें मला पहायचें असेल, तर शुद्ध ज्ञानदृष्टी पाहिजे.–याजकरतां–मी ह्मणोनि–ह्मणजे माझ्या प्राप्ती करतां ज्यांनीं प्रपंचांत कृतनिश्चयाची बुडी दिली आहे, त्यांचा प्रकार चंद्र धरण्याकरतां त्याची जलांतील प्रभा धरण्यासारखा आहे.– भावार्थ– पाण्यांतील प्रभेंत जसा चंद्र सांपडत नाहीं, त्याप्रमाणें प्रपंचांत मी सांपडणारा नाहीं.–तथापि मनोधर्मानें मोहले जाऊन (श्रीकृष्ण या स्थूलशरिरासच) मी परब्रह्म या भ्रांतीनें मानून या मृत्युलोकची जन्मकर्में तीं माझींच असें ह्मणतात, आणि येवढ्यावरूनच मी अनामा असतां मजवर नांवाचा आरोप करतात, अक्रिय असतां माझ्यावर कर्म करण्याचा आरोप करतात, त्याचप्रमाणें मी विदेही असतां देहधर्मांचा मजवर आरोप करतात, आणखी काय करतात ह्मणशील, तर मी आकारशून्य असतां मला आकार देतात, मी निरुपाधि असतां मला उपाधींत आणून ठेवतात, आणि मी विधिवर्जित असतां मला व्यवहार व आचार लावतात. मज वर्णहीनाला वर्ण, गुणातीतास गुण, अचरणास चरण, अपाणि (हात नाहींत) यास पाणी (हात), मज अमेयास मान (अपारास प्रमाण) सर्वगतास (सर्व व्यापकास) स्थान,–हे प्रकार माझ्या. ठिकाणीं झोंपी गेलेला मनुष्य बिछान्यावर वन (अरण्य) पहाण्यासारखे आहेत.–आणखी हे लोक मला कसें पहातात ह्मणशील, तर, अश्रवणाला श्रोत्र (कान), अचक्षूला नेत्र (डोळे) अगोत्राला गोत्र, अरूपाला रूप, अव्यक्ताला व्यक्त (निराकारास आकार) अनार्तास आर्त (दुःखयुक्तास दुःख), स्वयंतृप्तास तृप्ती, अनावर

मज अद्वैतासि दुजें । मज अकर्तयासि काजें । मी अभोक्ता कीं भुंजे । ऐसें ह्मणती ॥ १६९ ॥
मज अकुळाचें कुळ वानिती । मज नित्याचे निधनें शिणती । मज सर्वांतराते कल्पिती । अरि मित्र गा ॥ १६६ ॥
मी स्वानंदाभिराम । तया मज अनेक सुखाचा काम । आघवाचि मी असें सम । कीं ह्मणतीं एकदेशी ॥ १६७ ॥
मी आत्मा एक चराचरीं । ह्मणती एकाचा कैंपक्ष करीं । आणि कोपोनि एकाते मारी । हेंचि रूढविती ॥ १६८ ॥
किंबहुना ऐसे समस्त । जे हे मानुषधर्म प्राकृत । तयाचि नांव मी ऐसे विपरीत । ज्ञान तयाचें ॥ १६९ ॥
जंव आकार एक पुढां देखती । तंव हा देव येणें भावें भजती । मग तोचि विघडलिया टांकिती । नाहीं ह्मणोनि ॥ १७० ॥
माते येणें येणें प्रकारें । जाणती मनुष्य ऐसेनि आकारें । ह्मणऊनि ज्ञानचि तें आंधारें । ज्ञानासि करी ॥ १७१ ॥
तरी जयाचे चोखटे मानसीं । मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी । जया निजेल्याते उपासी । वैराग्य गा ॥ १८८ ॥
जयाचिया आस्थेचिया सद्भावा । आंत धर्म करी राणिवा । जयाचें मन ओलावा । विवेकासी । १८९
जे ज्ञानगंगे नाहाले । पूर्णता जेऊनि धाले । जे ज्ञांतीसि झाले । पल्लव नवे ॥ १९० ॥
जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ । जे आनंदसमुद्रीं कुंभ । चुबुकुळोनि भरिले ॥ २९१ ॥
जयां भक्तीची येतुली प्राप्ती । जे कैवल्याते परते सर ह्मणती । जयाचिये लीळेमाजी नीती । जियाली दिसे ॥ १९२ ॥
जे आघवांची करणीं । लेइले शांतीचीं लेणीं । जयांचें चित्त गवसणी । व्यापकामज ॥ १९३ ॥

णाला प्रावरण (पांघरूण) भूषणातीताला भूषण, सकळ कारणांस कारण, सहजाला विकारी, स्वयंभाला प्रतिष्ठा, निरंतराला आव्हाहन आणि विसर्जन, मी सर्वद, स्वतःसिद्ध असतां बाळ-तरुण-वृद्ध असा माझ्यांत संबंध मी अद्वैत असतां द्वैती, मी अकर्ता असून कर्ता, अभोक्ता असून भोगी, कूळरहिताला कूळ, नित्याला मरण (पाहून दुःख करतात.) सर्वांतराला (सर्वत्रांच्या अंतःकरणांत असणाऱ्याला) शत्रु-मित्र , आणखी मी स्वानंदाभिराम—अर्थात् स्वतः सुखाचें स्थान असतां त्या मला अनेक सुखांचा काम ह्मणजे इच्छिणारा, आणि सर्वत्र ठिकाणीं असतां एकदेशी ह्मणतात. मी स्थावरजंगमांत एकच आत्मा असतां, एकाचा पक्ष धरून कोपानें दुसऱ्यास मारतों असेंच बोलतात. अर्जुना, हे असे प्रकार किती ह्मणून सांगावे. तात्पर्य—हे जे प्रकृतीचे धर्म, ते सगळे माझ्या ठिकाणीं आहेत,— अशी जी त्यांची समज—तेंच त्यांच्या ठिकाणीं विपरीत ज्ञान आहे, आणि त्यामुळें आकार (स्वरूप) जोंपर्यंत त्यांच्या पुढें आहे, तोंपर्यंत देव या भावनेनें ते त्या आकाराला भजतात. परंतु तोच आकार बिघडल्या (भंगल्या) बरोबर तो देव नाहीं ह्मणून टाकून देतात. या या प्रकारांनीं मला आकारी समजतात, ह्मणून त्या मनुष्याचें ज्ञानच त्यांच्या ज्ञानाला आंधळें करतें. परंतु जे चोखट—अर्थात् शुद्ध मनानें मी होऊन क्षेत्रसंन्यासी— अर्थात् विषय पराङ्मुख होऊन निजले,— ह्मणजे संसाराकडे दुर्लक्ष करून, अथवा मी आणि माझे हा अहंकार सोडून स्वस्थ रहाले, व ज्यांची उपासना वैराग्य करतें; अथवा ज्यांच्या आस्थेच्या सद्भावांत धर्म राज्य करीत असून ज्यांच्या मनाचा विचारास ओलावा असतो; अथवा जे ज्ञानगंगेंत नाहल्या कारणानें पूर्ण होऊन—अर्थात ब्रह्मज्ञानानें तृप्त होऊन, जे शांतीला जसे कांहीं नव पल्लवच झाले; अथवा जे परिणामाला अर्थात् मोक्षाला कोंभ निघाले असून जे धैर्यमंडपाचे स्तंभ आणि आनंदसमुद्रांत बुडून भरून निघालेले कुंभ—अर्थात कलश बनले, अथवा ज्यांच्या भक्तीची इतकी प्राप्ती झाली असते, कीं ते कैवल्याला (मोक्षाला) परते सरमागें अथवा दूर जा—असें ह्मणत असून ज्यांच्या चित्तानें मज सर्वव्यापकाला गवसणी घातली असते;—

ऐसे जे महानुभाव । दैविये प्रकृतीचें दैव । जे जाणोनियां सर्व । स्वरूप माझें ॥ १९४ ॥
मग वाढतेनि प्रेमें । माते भजती जे महात्मे । परि दुजेपण मनोधर्में । शिवतले नाहीं ॥ १९५ ॥
ऐसें मीच होऊनि पांडवा । करिती माझी सेवा । परि नवलाव तो सांगावा । असे आइक ॥ १९६ ॥

असे जे महानुभाव–ते केवळ दैवीप्रकृतीचें दैवच असून माझें पूर्ण स्वरूप जाणतात. आणि हे महात्मे वाढत्या प्रेमानें माझें भजन करतात, तथापि त्यांच्या मनोधर्मास दुजेपण शिवत नाहीं. अर्थात त्यांच्या मनाला द्वैताचा विटाळ होत नाहीं. अर्जुना, असे महात्मे मीच होऊन माझी सेवा करतात, यांत जें कांहीं नवल आहे, तें तुला सांगतों–ऐक.

तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ १९७ ॥
यम दमा अवकळा आणिली । तीर्थें ठाया-वरूनि उठविलीं । यमलोकींची खुंटिली । राहाटी आघवी ॥ १९८ ॥
यम ह्मणे काय यमावें । दम ह्मणे कवणातें दमावें । तीर्थें ह्मणती काय खावें । दोष औषधासी नाहीं ॥ १९९ ॥
ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥
ते पहाटेवीण पाहावित । अमृतेवीण जीववित । योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ॥ २०१ ॥
परि राया रंका पाड धरूं । नेणतीं सानेया थोरां कडसणी करूं । एकसरें आनंदाचे आवारू । होत जगा ॥ २०२ ॥
कहीं एकाधेनि वैकुंठा जावें । ते तिहीं वैकुंठचि केलें आघवें । ऐसें नामघोष गौरवें । धवळलें विश्व ॥ २०३ ॥
तेजें सूर्य तैसे सोज्वळ । परि तोहि अस्तवे हें किडाळ । चंद्र संपूर्ण एखादे वेळ । हे सदा पुरते ॥ २०४ ॥
मेघ उदार परि वोसरे । ह्मणऊनि उपमेसी न पुरे । हे निःशंकपणें सपाखरे । पंचानन २०५ जयाचे वाचेपुढां भीजें । अखंड नाम नाचत असे माझें । जे जन्मसहस्रीं वोळगीजे । एक वेळ यावया ॥ २०६ ॥

अर्जुना, कीर्तनाच्या उल्हासानें प्रायश्चित्ताचे व्यवसाय नाहींसे होऊन पापाचा बीमोड होतो, आणि त्या योगानें यम-दमांना अवकळा येऊन तीर्थांचीं ठाणीं उठिवलीं जातात, आणि यमलोकची रहाटी–अर्थात् व्यापर बंद पडतो. तेव्हां यम ह्मणतो मी निग्रह कशाचा करावा, दम ह्मणतो, कीं मी दमन कोणाचें करावें, आणि तीर्थें ह्मणतात, कीं औषधांना दोष नसल्या-कारणानें आह्मी काय खावें ? अशा प्रकारें अर्जुना माझ्या नामघोषानें विश्वाचीं दुःखें नाहींशी होऊन सर्वजग महासुखानें–अर्थात् कीर्तनसुखानें दुमदुमून जातें.–तें कीर्तनसुख-पहांटेवांचून–अर्थात् सूर्योदयावांचून उदय करतें, अमृताशिवाय अमर करतें, आणि योगावांचून कैवल्य (मोक्ष) दाखिवतें. अर्जुना, कीर्तनांत राजा आणि रंक, अथवा लहान आणि थोर यांजबद्दल विचार नसून, ते सर्वच जगाला एक कोटच (आश्रा) होतात. नामघोषगौरवानें विश्व प्रकाशित करून कधीं कोणि वैकुंठाला जातो, परंतु त्यानें सर्वत्र वैकुंठ केलेलें असतें.–ह्या कीर्तन महात्म्यांची योग्यता कशी असते ह्मणशील, तर–ते तेजानें सूर्यासारखे सोज्वळ, परंतु सूर्याला देखील अस्ताचें किडाळ (हीनपण) आहे, तसें त्यांच्यांत नाहीं. चंद्र एखादे वेळेस संपूर्ण असतो, परंतु हे महात्मे सदां पूर्ण असतात. मेघ–पर्जन्यवृष्टीविषयीं–उदार खरे, परंतु तेहि ओसरतात–अर्थात् जलरहित होतात, ह्मणून अशा पंचानन-अर्थात् साक्षात् शिवाच्या (कीर्तन महात्म्यांच्या) दयाळूपणाच्या उपमेस पात्र होत नाहींत. अर्जुना, माझें नाम एकवेळ तरी तोंडीं यावें ह्मणून जन्म सहस्रांचा आश्रय करावा लागतो, तें माझें नाम ज्यांच्या वाचेंत निरंतर नाचत असतें, त्या नामाचा मी एकवेळ वैकुंठांत नसलों, भानुबिंबांतहि दिसलों नाहीं, अथवा योग्यांचें मानस–अर्थात् अंतःकरणहि उल्लंघून गेलों

तो मी वैकुंठीं नसे । वेळ एक भानुबिंबींहि न दिसे । वरी योगियांचींहि मानसें । उमरडोनि जाय ॥ २०७ ॥

परि तयांपासीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ॥ जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥ २०८ ॥ कैसे माझ्या गुणीं धाले । देशकाळाते विसरले । कीर्तनसुखें सुखावले । आपणपांचि ॥२०९॥ कृष्ण विष्णु हरी गोविंद । या नामाचे निखिळ प्रबंध । माजी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ २१० ॥

तरी दोन्ही पालवेवरी । जैसा एक तंतु अंबरीं । तैसा भीवांचुनि चराचरीं । जाणतीना॥२२०॥ आदि ब्रह्माकरुनी । शेवटीं मशक धरूनी । माजी समस्त हें जाणोनी । स्वरूप माझें ॥२२१ मग वाड धाकुटें न ह्मणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलिये वस्तु उजू लुंठिती । मीचि ह्मणोनि ॥ २२२ ॥

आपुलें उत्तमत्व नाठवे । पुढिल योग्यायोग्य नेणवे । एकसरे व्यक्तिमात्राचेनि नावें । नमूचि आवडे ॥ २२३ ॥

अखंड अगर्वता होऊनि असती । तयांचि विनय हेचि संपत्ती । जे जयजयमंत्रें अर्पिती । माझ्याठायीं ॥ २२६ ॥

नमितां मानापमान गळाले । ह्मणोनि अवचितां मीचि जाहाले । ऐसें निरंतर मिसळले । उपासिती ॥ २२७ ॥

अर्जुना हे गुरूची भक्ती । सांगितली तुजप्रती । आतां ज्ञानयज्ञें यजिती । ते भक्त आइके २२८

तरी ज्ञानयज्ञ तो येवंरूप । जेथ आदि संकल्प हा यूप । महाभूतें मंडप । भेद तो पशू॥२३९॥ मग पांचांचे जे विशेष गुण । अथवा इंद्रियें आणि प्राण । हेंचि यज्ञोपचार भरण । अज्ञान घृत ॥ २४० ॥

तरी जेथें ह्मणून नामघोष सुरू आहे, त्या ठिकाणीं मी हारपला सांपडायचाच. अर्जुना, कीर्तनांत माझ्या गुणांनीं जे तृप्त झाले, ते देशकाळाला विसरून कीर्तनसुखानें आपले आपल्यांतच सुखावून जातात. अर्जुना, कीर्तनांत कृष्ण-विष्णु-हरी गोविंद या नामांनीं भरलेल्या आत्मचर्चेच्या प्रबंधानें माझे निर्मळ व उदंड (पुष्कळ) गुण गात असतात. अर्जुना, असे जे भक्त आहेत,–ते आकाशरूप वस्त्राला एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जसा एकच तंतु असतो, तसा चराचरांत मजवांचून दुसरा कोणी जाणत नाहींत, अर्थात् मी एक तंतूनें त्या सर्व चराचरांत आहें असें ते समजतात. त्यामुळें अर्जुना ब्रह्मदेवापासून तों शेवट मशकापर्यंत सर्वांत माझें स्वरूप आहे असें ते जाणतात; ह्मणून कोणाला लहान–थोर असें ते ह्मणत नाहींत, आणि सजीव निर्जीव हाहि पण भेद ते जाणत नाहींत. परंतु सर्व वस्तु मीच आहेत–अर्थात् मत्स्वरूपी आहेत असें समजून दृष्टी पडेल त्या वस्तूस सरळ नमस्कार करतात. त्यांना आपल्या उत्तमपणाची आठवण होत नाहीं, व पुढें आलेलें योग्य कीं अयोग्य हेंहि ते जाणत नसून सरसकट नांवरूपास आलेल्या व्यक्तिमात्रास नमस्कार करण्याचें त्यांला आवडतें. अर्जुना, हे भक्त अखंड (निरंतर) गर्वरहित होऊन असल्यामुळें विनय हीच त्यांची संपत्ती झाली असते, आणि ती ते जयजय मंत्रेंकरून मला अर्पण करतात. अशा प्रकारें निरंतर ते नम्र असल्या कारणानें मानापमान हे त्यांचे गळून जातात. ह्मणून सहजच ते मी होऊन (मद्रूपी बनून) निरंतर ऐक्यानें ते माझी उपासना करतात. अर्जुना, हा वेळपर्यंत सांगितलेला प्रकार गुरुभक्तीचा झाला. आतां तुला ज्ञानयज्ञ करणारे जे भक्त आहेत त्यांजविषयीं सांगतों.

अर्जुना, ज्ञानयज्ञाचें स्वरूप असें असतें, कीं ज्या यज्ञांत आदिसंकल्प (माया-अहंस्फूर्ती) हा यज्ञस्तंभ असून, महाभूतें हा मंडप आणि भेद (जीव व ईश्वर यांची भिन्नता अथवा द्वैत) हा पशू. यज्ञसाहित्य–ह्मटलें तर–पंचभूतांचे विशेष गुण–शब्द-स्पर्शादिकरून–अथवा इंद्रियें आणि प्राण, आणि अज्ञान हें घृत

तेथ मनबुद्धिचिया कुडी । आंत ज्ञानाग्नि धडफुडा । साम्य तेचि सुहाडा । वेदिका
जाणे ॥ २४१ ॥
सविवेक मतिपाटव । तेचि मंत्रविद्या गौरव । शांति स्रुक्स्रुव । जीव यज्वा ॥ २४२ ॥
तो प्रतीतीचेनि पात्रें । विवेक महामंत्रें । ज्ञानाग्निहोत्रें । भेद नाशी ॥ २४३ ॥
तेथ अज्ञान सरोनि जाये । आणि यजिता यजन हें ठाये । आत्मसमरसीं न्हाये । अवभृतीं
जेव्हां ॥ २४४ ॥
तेव्हां भूतें विषय करणें । हें वेगळालें कांहीं न ह्मणे । आघवें एकचि ऐसें जाणे । आत्मबुद्धी ॥ २४५ ॥
जैसा चेइला तो अर्जुना । ह्मणे स्वप्नींची हे विचित्र सेना । मीचि जाहलों होतों ना । निद्रा
वशें ॥ २४६ ॥
नातरी जेधवां जिये ठायीं । देखती कां जें जें कांहीं । तें मीवांचूनि नाहीं । ऐसाचि
बोध ॥ २५४ ॥
तैसें भलतेथ भलतेणें भावें । भलतेहि हो अथवा नोहावें । परि तें मी ऐसें आघवें । होऊनि
ठेले ॥ २५७ ॥
अगा हे जेवढी माझी व्याप्ती । तेवढीचि तयांची प्रतीती । तैसें बहुधाकारीं वर्तती । मीचि होऊनि ॥ २५८ ॥

(तूप) या यज्ञांत-मन व बुद्धी हीं कुंडें, प्रज्वलित असा अग्नि ज्ञान, आणि वेदिक (ओटा) समदृष्टी, मंत्रविद्यागौरव ह्मणजे सविवेक मतिपाटव-अर्थात् विचारयुक्त बुद्धीची कुशलता, शांती हीच स्रुक स्रुवारूपी हवनपात्रें, आणि जीव हा यज्ञकरणारा. अशा सामुग्रीनें यज्ञकर्ता जीव विवेकमहामंत्रानें प्रतीती (अनुभवरूपी) पात्र हातांत घेऊन ज्ञानाग्निहोत्रें (ज्ञानाग्निकुंडांत) भेदाचा (द्वैताचा) नाश करतो. तेव्हां अर्थातच त्या यज्ञांत अज्ञान नाहींसें होऊन यजिता (यज्ञ करणारा) आणि यजन (यज्ञकृत्य) या अज्ञानक्रिया थांबताच-जीवाला-अर्थात् ज्ञानयज्ञ कर्त्यास आत्मसमरसांत (आत्मानंद रसांत) अवभृथी (यज्ञाच्या शेवटचें) स्नान होतें. त्यावेळीं भूतें (पंचमहाभूतें अथवा प्राणिमात्र) विषय (शब्दस्पर्शादि पंचक) आणि करणें (इंद्रियें) हीं वेगळालीं नसून सगळीं एकच आहेत असें आत्मबुद्धीनें तो जीव अर्थात् यज्ञकर्ता जाणतो. भावार्थ- मजवांचून दुसरें कांहीं नाहीं.-याचा दृष्टांतानें विशेष खुलासा पुढें आहे. स्वप्नांत विचित्र सेना पाहून जागें झाल्यावर काय वाटतें, कीं निद्रेच्या भरांत स्वप्नांतील विचित्र सेना मीच झालों होतों ! ह्मणजे सेना विचित्र दिसली, परंतु तिच्यांत माझ्यावांचून दुसरा कोणी नव्हता, ह्मणून स्वप्नांत जो मी अनेक होतों, तोच जागृतींत पहातां एकटाच आहें.-भावार्थ- अज्ञानांत (झोंपेंत) द्वैत, आणि अज्ञानाचा अथवा द्वैताचा नाश होण्याबरोबर ऐक्य अथवा अद्वैत. असो. ज्ञानयज्ञांतील अवभृथ स्नान झाल्यावर जिवाला जें जें ज्याच्या ठिकाणीं दृष्टीस पडेल, तें मी वांचून अथवा माझ्या स्वरूपाहून अन्य कांहीं नाहीं असाच बोध होतो; ह्मणून भलत्याच ठिकाणीं भलत्याच भावानें भलतेंहि हो अथवा नहो, परंतु तें हो नहो हीं दोन्हींहि आपणच आहोंत असा त्या जीवाचा सिद्धांत ठरला असतो. तथापि अर्जुना, ही माझी जेवढी व्याप्ती आहे, तेवढीच त्यांची प्रतीती असल्याकारणानें बहुधाकारानें-अर्थात् अनेक रूपांनीं-जीव-मीच होऊन-जगांत-वावरतात.

पैं जयाचेनि अंगसंगें । इये प्रकृतीस्तव अष्टांगें । जन्म पाविजत असे जगें । तो पिता मी
गा ॥ २६९ ॥

अर्जुना, या अष्टांग प्रकृतीसी ज्याचा अंगसंग झाल्या कारणानें जग उत्पन्न झालें, त्या जगाचा बाप मी आहें; आणि अर्धनारीनटेश्वर ह्मणजे जो पुरुष

अर्धनारी नटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । तेवीं मी चराचरीं । माताही होय ॥ २७० ॥ आणि जाहालें जग जेथ राहे । जेणें जीवित वाढत आहे । तें मीवांचूनि नोहे । आन निरुतें ॥ २७१ ॥

इये प्रकृतिपुरुषे दोन्ही । उपजलीं जयाचिया अमनमनीं । तो पितामह त्रिभुवनीं । विश्वांचा मी ॥ २७२ ॥

आणि आघवेया जाणणे याचिया वाटा । जया गांवा येती गा सुभटा । वेदाचिया चोहटा । वेद्य जें ह्मणिजे ॥ २७३ ॥

जेथ नानामतां बुझावणी आली । एकमेकां शास्त्रांचा अनोळखी फिटली । चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं । जें पवित्र ह्मणिजे ॥ २७४ ॥

पैं ब्रह्मबीजा जाहाला अंकुर । घोषध्वनि नादाकार । तयाचें गा भवन जो ओंकार । तोहि मी गा ॥ २७५ ॥

जया ओंकाराचिये कुशी । अक्षरें होती अउमकोरसीं । जिये उपजत वेदेसीं । उठलीं तिन्हीं ॥ २७६ ॥

ह्मणोनि ऋग्यजुःसाम । हे तिन्हीं ह्मणे मी आत्माराम । एवं मीचि कुलक्रम । शब्द ब्रह्माचा ॥ २७७ ॥

तोच स्त्री असें माझें स्वरूप असल्या कारणानें या चराचराची माताहि पण मीच आहें; ह्मणून उत्पन्न झालेलें जग ज्या ठिकाणीं रहातें, तें, आणि ज्याच्या योगानें त्याचें जीवित वाढतें, तें, निश्चयेंकरून माझ्यावांचून अन्य नाहीं. आणि ही प्रकृती-पुरुष ज्याच्या अमन मनांत–अर्थात् ज्याला मन नाहीं अशाच्या मन संकल्पांत उत्पन्न झाली, तो मी या त्रिभुवनांतील विश्वाचा पितामह–अर्थात् आजा आहें. आणि अर्जुना ज्या ब्रह्मरूपी गांवाला सर्व जाणण्याच्या वाटा येतात, तो गांव–अर्थात् तें ब्रह्म मी, आणि वेदांच्या चोहटा–अर्थात् चारीवेद एकत्र मिळण्याचा चवाठा अथवा चौक ह्मणजे वेद्य–अर्थात् जाणण्यास योग्य असें जें ह्मणतात, तें ब्रह्म मीच. आणि अर्जुना जेथें नानामतांची–अर्थात् भिन्नभिन्न मतांची समजूत होऊन एकमेका–अर्थात् परस्पर शास्त्रांची अनोळखी फिटली आणि चुकलीं ज्ञानें–अर्थात् भ्रम पावलेलीं ज्ञानें ज्या जाग्यावर मिळायला आलीं, व ज्याला पवित्रज्ञान ह्मणतात तें मी, आणि ज्या (अक्षर) ब्रह्मबीजाला परा (चार वांचेपैकीं पहिला) अंकूर फुटून नादाकार घोषध्वनि–अर्थात् पश्यंती–मध्यमा–आणि वैखरी–अशा वाचा उत्पन्न झाल्या, त्यांचे मंदिर जो ओंकार तोहि अर्जुना मीच. या ओंकाराच्या कुशींत अ-उ-म- अशीं अक्षरें होतीं. तीं उपजतांच वेदांना घेऊन उठलीं ह्मणून ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे तिन्हीहि वेद मीच आहें ह्मणून या शब्दब्रह्माचा कूलक्रम मीच आहें,असो.

हे चराचर आघवें । जिये प्रकृती आंत सांठवे । ते शिणली जेथ विसंवे । ते परमगती मी २७८

आणि जयाचेनि प्रकृती जिये । जेणें अधिष्ठिली विश्व विये । जो येऊनि प्रकृती इये । गुणाते भोगी ॥ २७९ ॥

तो विश्वश्रियेचा भर्ता । मीचि गा येथ पंडुसुता । मी गोसांवी समस्तां । त्रैलोक्याचा ॥ २८० ॥

आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी उगे नसावें । पावकें दाहावे । वर्षावें जळे ॥ २८१ ॥

पर्वतीं बैसका न संडावी । समुद्रीं रेखा

अर्जुना हें चराचर ज्या प्रकृतीमध्यें सांठवतें ती शिणून–अर्थात् श्रम पावून ज्या ठिकाणीं विसावा घेण्याकरतां येते, ती परमगती मी, आणि ज्याच्या योगानें प्रकृती (माया) जगते, आणि ज्यानें तिचा आश्रय केला असतां, तिच्यापासून विश्व उत्पन्न होतें, आणि जो या प्रकृतीसी संग करून गुणांचा उपभोग घेतो, तो या विश्वश्रियेचा–अर्थात् विश्वलक्ष्मीचा भर्ता अर्जुना मी, आणि ह्मणूनच या सर्व त्रैलोक्याचा गोसांवी–अर्थात् धनी मीच आहें. ह्मणून अर्जुना, आकाशानें सर्वभर असावें, वायूनें क्षणभरहि उगीच बसूं नये, अग्नीनें दहन करावें, पाण्यानें वृष्टी करावी–अर्थात् इंद्रानें मेघरूपानें पाण्याचा वर्षाव करावा, पर्वतांनीं आ-

नोलांडावी । पृथ्वीया भूतें वाहावी ।
हे आज्ञा माझी ॥ २८२ ॥
म्यां बोलविल्या वेद बोले । म्यां चालविल्या सूर्य चाले । म्यां हालविल्या प्राण हाले । जो जगाते चाळिता ॥ २८३ ॥
मियांचि नियमिला सांता । काल ग्रासितसे भूतां । इये ह्मणियाग ते पांडुसुता । सकळे जयाची ॥ २८४ ॥
जो ऐसा समर्थ । तो मीं जगाचा नाथ । आणि गगना ऐसा साक्षिभूत । तोहि मीचि ॥२८५॥

पली बैठक सोडूंनये, समुद्रानें आपली मर्यादा उल्लघन करूं नये, आणि पृथ्वीनें प्राणीमात्रास धारण करावें, या आज्ञा माझ्या आहेत. मी बोलिवल्यास वेद बोलतो, चालिवल्यास सूर्य चालतो, व जगास चलन देणाऱ्या प्राणास (प्राणवायूस) हालिवल्यास तो हालतो. आणि मीच हुकूम दिला, तर काळ प्राण्यास ग्रासतो–असे हे चाकर ज्या समर्थाचे आहेत, तो मी या जगाचा नाथ–अर्थात् मालक असून गगनासारखा साक्षीभूत तोहि अर्जुना मीच आहें.

इहीं नामरूपीं आववा । जो भरला असे पांडवा । आणि नामरूपांचाहि बोल्हावा । आपणचि जो ॥ २८६ ॥
जैसें जळाचे कल्लोळ । आणि कल्लोळीं आथी जळ । ऐसेनि वसवीतसे सकळ । तो निवास मी ॥ २८७ ॥
जो मज होय अनन्यशरण । त्याचे निवारीं मी जन्ममरण । यालागीं शरणागता शरण । मीचि एक ॥ २८८ ॥
मीचि एक अनेकपणें । वेगळालेनि प्रकृतिगुणें । जीत जगाचेनि प्राणें । वर्तत असे २८९
जैसा समुद्र थिल्लर न ह्मणतां । भलतेथ बिंबे सविता । तैसा ब्रह्मादि सर्वांभूतां । सुहृद तो मी ॥ २९० ॥
मीचि गा पांडवा । या त्रिभुवनासी बोल्हावा । सृष्टीक्षयप्रभवा । मूळ तें मी ॥ २९१ ॥
बीज शाखांते प्रसवे । मग तें रूखपण बीजीं समावे । तैसें संकल्पें होय आघवें । पाठी संकल्पीं मिळे ॥ २९२ ॥
ऐसें जगाचें बीज संकल्प । अव्यक्त वासना रूप । तया कल्पांतीं जेथ निक्षेप । होय तें मी ॥ २९३ ॥
इये नामरूपें लोटती । वर्ण व्यक्ती आटती । जातीचे भेद फिटती । जैं आकार नाहीं ॥ २९४॥

अर्जुना, या नामरूपांत मी भरलेला असून, त्यां नामरूपाचा ओलावाहि मीच आहें.–हा ओलावा कसा आहे ह्मणशील, तर–जळाचे कल्लोळ (तरंग) आणि कल्लोळांत ओलावा वसविण्याचें–अर्थात् ठेवण्याचें जें स्थान आहे, तेंहि मीच. ह्मणून जो मला अनन्यभावानें (एकनिष्ठेनें) शरण येतो, त्याच्या जन्ममरणाचें मी निवारण करतों; ह्मणून शरणागत झालेल्यास शरण्य–ह्मणजे शरण येण्यास योग्य असा मीच आहें; अथवा शरण आलेल्याचें रक्षण करणारा असा एक मीच आहें. अर्जुना, मीच एक अनेकपणानें व वेगळाल्या प्रकृतिगुणांत जगाच्या प्राणानें वर्तन करतों–अर्थात् जीवरूपानें वागतों. त्यावेळीं समुद्र (मोठा) आणि थिल्लर (डबकें) लहान हा कांहींएक भाव मनांत न आणतां हवा त्या ठिकाणीं सविता (सूर्य) जसा प्रकाशतो, त्याप्रमाणें ब्रह्मादि सर्व भूतांना लहान मोठ्याचा विचार न करतां सर्वांस सारखा आप्त असतो. अर्जुना, मीच या त्रिभुवनास ओलावा (आश्रय) असून उत्पत्ती-क्षय आणि प्रभवा (स्थिती) या तिहींस मूळ (कारण) मीच आहें. अर्जुना, बीजापासून वृक्षशाखा पसरतात, आणि तो वृक्ष जसा पुन्हां बीजांत सामावतो, त्याप्रमाणें संकल्पाबरोबर सर्व कांहीं उत्पन्न होतें, व उत्पन्न झालेलें सर्व पुन्हां संकल्पांतच मिळून जातें. अशा या न्यायानें अव्यक्तवासनारूप बीज संकल्पास (अहंस्फूर्तीस) कल्पांतीं (प्रळयकाळच्या शेवटीं) रहाण्याचें जें स्थान आहे, तें मी. आणि नामरूप जाऊन वर्णव्यक्ती आटल्याच्या (नाहींशा झाल्याच्या) योगानें जातीभेद मो-

तें संकल्प वासनासंस्कार । माघौते रचावया आकार । जेथ राहोनि असती अमर । तें निधान मी ॥ २९५ ॥

डून जेव्हां आकारही नाहींसा होतो, त्यावेळीं पुन्हां आकार– अर्थात् सृष्टी रचण्याकरतां संकल्पवासना संस्कार–अर्थात् संस्काररूप वासनाशक्ती अमर होऊन रहाते. तें निधान (ठिकाण) हि अर्जुना मीच आहें.

मी सूर्याचेनि वेषें । तपे तें हे शोषे । पाठी इंद्र होऊनि वर्षें । तें पुढती भरे ॥ २९६ ॥ अग्नि काष्ठे खाये । तें काष्ठचि अग्नि होये । तैसें मरतें मारितें पाहे । स्वरूप माझें ॥ २९७ ॥ यालागीं मृत्यूच्याभागीं जें जें । तें तेंही पैं रूप माझें । आणि न मरते तंव सहजें । मीचि आहे ॥ २९८ ॥ आतां बहु बोलोनि सांगावें । तें एके हेळा घे पां आघवें । तरी सतासतही जाणावें । मीचि पैं गा ॥ २९९ ॥ ह्मणोनि अर्जुना मी नसे । ऐसा कवण ठाव असे । परि प्राणियाचें दैव कैसें । जें न देखती माते ॥ ३०० ॥

अर्जुना, सूर्याच्या वेषानें जेव्हां मी तापतों, तेव्हां पाण्याचें शोषण होतें, आणि मग इंद्र होऊन जेव्हां वर्षाव करतों, तेव्हां पुन्हां सर्वत्र पाणीच पाणी होऊन जातें.–आणखी माझें स्वरूप कसें आहे ह्मणशील, तर–अग्नी काष्ठ खातो, परंतु तेंच काष्ट जसें अग्नी होतें, त्याप्रमाणें मरतें आणि मारतें स्वरूप माझेंच आहे. ह्मणून मृत्यूच्या भागांत जें जें गेलें, तेंहि रूप माझें असून न मरणारें रूपहि स्वाभाविकपणें माझेंच आहे. आतां पुष्कळ बोलून सांगितलें तरी तेंच, ह्मणून आतां अखेरचें एकच सांगतों, कीं सतासत् ह्मणजे नित्य व अनित्य, अथवा स्थूळ व सूक्ष्म, अथवा खरें आणि खोटें–सारांश जें कांहीं आहे व नाहीं, तें सर्व मीच आहें हें लक्षांत ठेव. ह्मणून मी नाहीं असें एकहि ठिकाण नसतां प्राणिमात्रांचें दैव कसें आहे तें पहा, कीं ते मला पहातच नाहींत.

स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥ ३१६ ॥

पापपुण्य फळें सांगितलीं आहेत.–अर्जुना, स्वर्ग पुण्यात्मक पापानें प्राप्त होतो, पापात्मक पापानें नरक अथवा अधोगती प्राप्त होते, आणि शुद्ध पुण्यानें मात्र मत्प्राप्ती (कैवल्यप्राप्ती) आहे.

जेथ अमरत्व हें सिंहासन । ऐरावता सारिखें वाहन । राजधानी भुवन । अमरावती ॥ ३२० ॥ जेथ महासिद्धीचीं भांडारें । अमृताचीं कोठारें । जिये गांवीं खिल्लारें । कामधेनूचीं ॥ ३२१ ॥ जेथ वोळगे देव पाइका । सैंघ चिंतामणीचिया भूमिका । विनोदवन वाटिका । सुरतरूंचिया ॥ ३२२ ॥ गंधर्व गात गाणीं । जेथ रंभे ऐसिया नाचणी । उर्वशी मुख्य विलासिनी । अंतौरिया ॥ ३२३ ॥ मदन वोळगे सेजारें । जेथ चंद्र शिंपे सांबरें । पवना ऐसे ह्मणियारे । धांवणें जेथ ॥ ३२४ ॥

स्वर्गांत काय प्राप्ती असते, त्याचें वर्णन पुढें केलें आहे.–अर्जुना, अमरत्व हें सिंहासन, ऐरावतासारखें (हत्तीसारखें) वाहन, आणि अमरावतीसारखें नगर असून, त्यांत महासिद्धींचीं (आणिमादि अष्ट सिद्धींची) भांडारें–(जामदारखाने), अमृताचीं कोठारें (खजिने), आणि कामधेनूंचीं–अर्थात् इच्छिला पदार्थ देणाऱ्या गाईंचीं) खिल्लारें (कळप) असतात. आणखी या नगरींत सेवक देव असून सर्व जमीन चिंतामणींनीं (चिंतिलें देणाऱ्या मण्यांनीं) गजगजलेली असते, आणि विनोदवनवाटिका–अर्थात् क्रीडा करण्याचे बाग सुरतरूंनीं (कल्पवृक्षांनीं) भरलेले असतात. अमरावतींत गंधर्व गाणारे असून रंभे-

पैं बृहस्पति मुख्य आपण । ऐसे स्वस्ती-
श्रियेचे ब्राह्मण । भाटिवेचे सुरगण ।
बहुवस जेथें ॥ ३२५ ॥
लोकपाळ रांगेचे । राऊत जिये पदवीचे ।
उचैःश्रवा खांचे । खोलणिये ॥ ३२६ ॥
हे असो बहु ऐसें । भोग इंद्रसुखासरिसे । ते
भोगीजती जंव असे । पुण्यलेश ॥ ३२७ ॥

सारख्या अप्सरा नाचणाऱ्या असतात, व उर्वशी मुख्य आहे अशा उपभोगाच्या स्त्रिया असतात. आणि या राजधानींत रंगमहालांतील व्यवस्था ठेवणारा मदन असून चंद्र अमृताचा सडा घालतो, आणि वायूसारखे धांवणारे आज्ञाधारक असतात. आणखी अर्जुना, कल्याण इच्छिणाऱ्या ब्राह्मणांत मुख्य बृहस्पति असून पराक्रमाचें वर्णन करणारे सुरगण (देवगण) पुष्कळ असतात. आणि लोकपालांच्या रांगेचे (बरोबरीचे) घोडे असून, त्यांत उच्चैश्रव्यासारखे फेरफटक्याला घोडे असतात.-सारांश पुण्यलेश असेपर्यंत इंद्रसुखासारखे भोग पुण्यात्मक पापानें स्वर्गांत प्राप्त होतात.

पैं सर्वभावेंसीं उखितें । जे वोपिलें मज
चित्तें । जैसा गर्भ गोळ उद्यमातें । को-
ण्याही नेणें ॥ ३३५ ॥
तैसा मीवांचूनि कांहीं । आणिक गोमटेचि
नाहीं । मजचि नाम पाहीं । जिणेया
ठेविलें ॥ ३३६ ॥
ऐसें अनन्य गतिकें चित्तें । चिन्तितसाते माते ।
जे उपासिती तयाते । मीचि सेवी ॥ ३३७ ॥
ते एकवटूनि जिये क्षणीं । अनुसरले गा मा-
झिये वाहणीं । तेव्हांचि तयांचि चिंतवणी ।
मजचि पडिली ॥ ३३८ ॥
मग तिही जें जें करावें । तें मजचि पडिलें आ-
घवें । जैसी अजातपक्षाचेनि जिवें ।
पक्षिणी जिये ॥ ३३९ ॥
आपुली ताहानभूक नेणें । तान्हया निकें तें
माऊलीसचि करणें । तैसे अनुसरले मज प्राणें।
तयांचे सर्व मी करीं ॥ ३४० ॥
तयां माझिया सायुज्याची चाड । तरी
तेचि पुरवि कोड । कां सेवा ह्मणती तरी
आड । प्रेम सुये ॥ ३४१ ॥
ऐसा मनीं जो जो धरिती भावो । तो पुढां पुढां
लागे तया देवो । आणि दिधलियाचा निर्वाहो ।
तोही मीचि करीं ॥ ३४२ ॥
हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि

श्रीकृष्ण ह्मणाले-अर्जुना, भक्तांचा मी सेवक कीं रे होतों, पण कोणाचा-ज्यांनीं गर्भ गोळ्याप्रमाणें दुसरा कोणताहि उद्यम न जाणतां, चित्तानें मजला विकून घेतलें आहे-अर्थात् अंतःकरणानें मला वाहलें आहेत, व मजवांचून दुसरें कांहींच ज्यांना गोड लागत नसून ज्यांनीं आपलें जीवनच मला केलें आहे, असे जे चित्तानें अनन्यगतिक होऊन माझें चिंतन करतात, त्या उपासकांची-अर्थात् भक्तांची मी सेवा करतों. असे भक्त ज्याक्षणीं आपलें चित्त एकवटून-अर्थात् आत्मरसांत मिसळून माझ्या मार्गाला अनुसरतात, त्याक्षणींच त्यांची सर्व चिंता मला पडते. ह्मणून त्यांनीं जें जें करावें, त्यांची, पंख न फुटलेल्या पिलाला तहान भूक लागलेली समजत नसल्यामुळें त्याच्या जीवित रक्षणार्थ जें कांहीं त्याच्या पक्षिणी आईला करावें लागतें, तशी काळजी घेऊन, प्राणानें जे मला अनुसरले त्यांचें करावें लागतें. अर्जुना, माझ्या कैवल्यपदाची त्यांना चाड असली, तर ती मी पुरवितों; अथवा सेवा करण्याची त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या आड प्रेम घालतों.-अर्थात् माझ्या भक्तांला दुःख दिसूं देत नाहीं. सारांश, भक्त जो जो भाव आपल्या मनांत धरतात-अर्थात भक्त जें जें मागतात तें तें मी त्यांना देऊन, त्या देणगीचें रक्षण करतों. ह्मणून हा त्यांचा योगक्षेम-अर्थात् अप्राप्त वस्तूची प्राप्ती, आणि प्राप्त वस्तूचें रक्षण मलाच करावें लागतें. आणि त्यांच्या सर्व भावनांचा आश्रयहि मीच असतों. ह्मणून मला जाणल्या वांचून जे माझें भजन करतात-अर्थात् भक्ती

पडला पांडवा । जयांचिया सर्व भावा ।
आश्रय मी ॥ ३४३ ॥
येर माते नेणोनि भजन । तें वांयाचि गा
आन आन । ह्मणोनि कर्माचि डोळे ज्ञान ।
ते निर्दोष होआवे ॥ ३९० ॥
मग मीचि डोळां देखिला । जिहीं कानीं
मीचि ऐकिला । मीचि मनीं भाविला ।
वानिला वाचा ॥ ३९९ ॥
सर्वांगीं सर्वांठायीं । मीचि नमस्कारिला
जिहीं । दान पुण्यादिकें जें कांहीं । तें
माझियाचि मोहरां ॥ ३९० ॥
जिहीं मातेंचि अध्ययन केलें । जें आंत
बाहेरि मियांचि धाले । जयांचें जीवित्व
जोडलें । मजचिलागीं ॥ ३९१ ॥
जे अहंकार वाहत आंगीं । आह्मी हरीचे
भूषावयालागीं । जे लोभिये एकचि जगीं ।
माझेनि लोभें ॥ ३९२ ॥
जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि
प्रेमें सप्रेम । जे माझिया भुली सभ्रम ।
नेणती लोक ॥ ३९३ ॥
जयांची जाणती मजचि शास्त्रें । मी जो-
डे जयाचेनि मंत्रें । ऐसें जे चेष्टामात्रें ।
भजले मज ॥ ३९४ ॥
ते मरणाऐलीचकडे । मज मिळोनि गेले
फुडें । मग मरणीं आणिकीकडे। जातील
केवीं ॥ ३९५ ॥
ह्मणोनि मद्याजी जे जाहाले । ते माझिया
सायुज्या आले । जिहीं उपचारमिषें दिध-
लें । आपणपे मज ॥ ३९६ ॥
एथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेपण मि-
रवी तेंचि उणें । आह्मी जाहलों ऐसें जो ह्मणे।
तो कांहीचि नव्हे ॥ ३९८ ॥
ह्मणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ती
आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटे होइजे ।
तैं जवळीक माझी ॥ ३७८ ॥

करतात, ती भलतेच ठिकाणीं होऊन वांया जाते. ह्मणून कर्माचे डोळे–अर्थात् कर्म करण्याची दृष्टी निर्दोष व्हायला पाहिजे ह्मणून निर्दोष दृष्टीनें ज्यांनीं मला पहालें, ज्यांनीं माझें गुणानुवाद ऐकिले, आणि ज्यांनीं मनानें माझ्या ठायीं भाव धरला असून वाचेंतहि मलाच ठेविलें, त्याच प्रमाणें सर्वांठायीं मलाच नमस्कार करीत असून दान पुण्यादिकें जीं कांहीं केलीं तींहि माझ्याच मार्गाकडे लावलीं असून ज्यांनीं माझेंच अध्ययन (भजन) केलें; आणि ज्यांनीं अंतर्बाह्य माझ्याचकडे दृष्टी ठेवून जे तृप्त झाले; आणि ज्यांनीं माझ्याच प्राप्ती करतां जीवित्व जोडलें–अर्थात देह धारण केला, आणि आह्मी श्रीहरीभूषणासाठींच आहोंत असा ज्यांनीं अहंकार बाळगला असून, माझ्या लोभाशिवाय ज्यांना दुसरा कशाचाहि लोभ नाहीं, व जे माझ्याच इच्छेनें सकाम असून माझ्याच प्रेमानें सप्रेम असतात,आणि माझ्याच भुलीनें भ्रमिष्ट होऊन लोकांना ओळखीत नाहींत. आणि ज्यांचीं शास्त्रें मलाच जाणतात, व ज्यांच्या मंत्रानें मीच जोडतों–अर्थात प्राप्त होतों.–अशा प्रकारच्या चेष्टामात्रेंकरून भिन्न भिन्न प्रकारांनीं–जे मला भजतात, ते मरणापूर्वीच माझ्या स्वरूपीं मिळून जातात, मग मेल्यावर दुसरीकडे जातील याची शंका कशाला पाहिजे ? ह्मणून मद्याजी–अर्थात् माझें यजन करणारे जे झाले, व उपचारमिषानें ज्यांनीं आपलेंपण मला वाहिलें, ते अर्जुना, माझ्या सायुज्यासच प्राप्त होतात. या भक्तांत एक गोम असते, ती लक्षांत ठेवण्या सारखी आहे. ती ही कीं,–जो जाणतेपणाचा डौल मारतो, तो नेणता–अर्थात अज्ञानी असतो; संपन्नता जो मिरवितो, तिची त्याच्या जवळ उणीव असते; आणि आह्मी (पूर्ण) झालों, असें जो ह्मणतो, त्याच्या जवळ कांहींच नसतें असें समजावें. ह्मणून आपलें थोरपण पलिकडे सोडून सर्व व्युत्पत्ती विसरून जगाला जेव्हां धाकटे व्हावें–अर्थात लीन व्हावें, तेव्हांच माझी जवळीक (सानिध्य) प्राप्त होतें. अर्जुना, सहस्र किरणांच्या–सूर्य तेजापुढें चंद्रहि लोपून जातो–अर्थात तेजहीन

अगा सहस्र किरणांचिये दिठी । पुढां चंद्रही लोपे किरीटी । तेथ खद्योत कां हुटहुटी ।
आपुलेनि तेजें ॥ ३७९ ॥
तैसें लक्ष्मीयेचे थोरपण न सरे । जेथ शंभूचेंहि तप न पुरे । तेथ येर प्राकृत हेंदरे । केवीं जाणों लाहे ॥ ३८० ॥
यालागीं शरीर सांडोवा कीजे । सकळ गुणांचे लोण उतरिजे । संपत्तिमद सां।
डिजे । कुरवंडी करूनी ॥ ३८१ ॥
मग निःसिमभाव उल्हासें । मज अर्पा-
वयाचेनि मिसें । फळ एक आवडे तैसें ।
भलतयाचे हो ॥ ३८२ ॥
भक्त माझियाकडे दावी । आणि मी दो-
न्ही हात बोडवीं । मग देंठ न फेडितां
सेवी । आदरेंसी ॥ ३८३ ॥
पैंगा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज
अर्पावें । तें लेखें तरी म्यां नुरंवावें । परि
मुखींचि घालीं ॥ ३८४ ॥
हें असो कायसीं फुलें । पानचि एक
आवडतें जाहालें । तें साजुकही न हो सुक-
लें । भलतैसें ॥ ३८५ ॥
परि सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला
अमृतें तोखे । तैसें पत्रचि परि तेणें
सुखें । आरोगूं लागें ॥ ३८६ ॥
अथवा ऐसेहि एक घडे । जे पालाही परि
न जोडे । तरी उदकाचें तंव सांकडें ।
नव्हेल कीं ॥ ३८७ ॥
तें भलतेथ निर्मोलें । न जोडितां आहे जोडलें ।
तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज ॥३८८॥
तेणें वैकुंठापासोनि विशाळें । मजलागीं
केलीं राउळें । कौस्तुभाहोनि निर्मळें ।
लेणीं दिधलीं ॥ ३८९ ॥
दुधाचीं सेजारें । क्षीराब्धी ऐसीं मनोहरें । मज-
लागीं अपारें । सृजिली तेणें ॥ ३९० ॥
कर्पूर चंदन अगरू । ऐसेया सुगंधाचा

होतो, त्याच्या पुढें काजव्याच्या तेजाची हुटहुटी (मातब्बरी) ती काय ? तसेंच जें ठिकाण जाणण्या ला लक्ष्मीचें थोरपण पुरें पडत नसून, शंभूचें तपहि पुरें होत नाहीं, तें ठिकाण जाणण्यास ही प्राकृत हेंदी माणसें योग्य कशी होतील ? म्हणून अर्जुना, शरिराची ओंवाळणी करून सकळ गुणांचे (व्युत्पत्ती-चें) निंबलोण करून उतरावें. आणि संपत्तीमदाची कुरवंडी करून फेंकून द्यावी. आणि मग निःसिम भावाच्या उल्हासानें मला अर्पण करण्याच्या मिसानें भक्ताला आवडेल असें हवें तें फळ कां होईना, त्यानें तें माझ्याकडे दाखवावें मात्र, कीं दोन्ही हात पुढें करून मी घेतों, आणि देठ न तोडतां मोठ्या आदरानें (प्रे-मानें) त्यांचें सेवन करतों-अर्थात तोंडांत टाकतों.- अर्जुना, फार काय सांगावें, परंतु भक्तीच्या नांवानें मला फूल जरी दिलें, तरी त्याचा वास न घेतां तें मी मुखांत टाकतों. अर्जुना फूलचसें काय-परंतु पान देखील आणि तेंहि कसलें आणि सुकलेलें असलें, तरी तें मला आवडतें.-आणि कशा किमतीनें आव-डतें म्हणून म्हणशील; तर-भुकेलेला जसा अमृतानें तृप्त होतो, त्याप्रमाणें तें बालकें पान पूर्णभक्तीनें दिलें अस-ल्यानें मी मोठ्या आवडीनें खाऊन तृप्त होतों. अर्जुना, एकादे वेळेस असेंहि घडून येईल, कीं पानहि मिळा-यचें नाहीं, परंतु उदकाचें तर संकट नाहीं. तें पाहि-जे त्या ठिकाणीं मोल दिल्यावांचून आणि मिळिव-ण्याची खटपट केल्यावांचून मिळतें तें जरी मला एकनिष्ठेनें अर्पण केलें, तरी मी संतुष्ट होतों. कसा म्हणशील, तर-त्यानें वैकुंठाहूनहि मोठमोठालीं राऊ-ळें मला बांधलीं, अथवा कौस्तुभमण्यापेक्षांहि उत्तम अलंकार त्यानें मला दिले, अथवा क्षीरसमुद्रासारखीं मनोहर आणि अपार दुधाचीं शय्यास्थानें त्यानें मजकरितां निर्माण केलीं; अथवा कर्पूर-चंदन-आणि अगर अशा सुवासिक पदार्थांचा मेरूपर्वता येवढा सर्याऐवजी काडवातींचा दिवा दीपमाळेला लावला,

महामेरू । मज हातिवा लाविला दिन-
करू । दीपमाळे ॥ ३९१ ॥
गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूंचीं
उद्यानें । कामधेनूंचीं गोधनें । अर्पिलीं तेणें३९२
मज अमृताहूनि सुरसें । बोनी वोगरिलीं
बहुवसें । ऐसा भक्ताचेनि उदकलेशें ।
परितोषेगा ॥ ३९३ ॥

अथवा गरुडासारखीं वाहनें, अथवा सुरतरूंचीं उद्यानें, अथवा कामधेनूंचीं गोवनें त्यानें मला अर्पण केलीं; अथवा अमृताहूनहि सुरस–रसभरित असें पुष्कळ नैवेद्य त्यानें मला वाढले–असें मी भक्तांच्या उदकलेशानें समजून संतोषित होतों.

येर पत्र पुष्प फळ । हें भजावया मिस
केवळ । वांचूनि आमुचियालागीं निष्क-
ळ । भक्तितत्व ॥ ३९६ ॥
तो मी पुससी कैसा । तरी जो सर्वभूतीं
सदा सरिसा । जेथ आपपर ऐसा ।
भाग नाहीं ॥ ४०७ ॥
जे ऐसिया मातें जाणोनि । अहंकाराचा
कुरुठा मोडोनि । जे जिवें कर्में करूनि ।
माते भजले ॥ ४०८ ॥
ते वर्तत दिसती देहीं । परि ते देहीं ना
माझ्याठायीं । आणि मी तयांच्या हृद-
यीं । समग्र असे ॥ ४०९ ॥

अर्जुना, माझ्या भजनमार्गाला पत्र–पुष्प आणि फळ हें एक मिस (सोंग) आहे, परंतु माझ्या प्राप्तीला निष्कलंक असें भक्तितत्त्वच पाहिजे–तर मी प्राप्त होणार. तो मी कसा आहें म्हणून पुससील, तर सर्व भूतांत (प्राणिमात्रांत) सदासर्वकाळ सारखा असून त्यांत आपपर असा भाग नाहीं. अशा प्रकारें ज्यांनीं मला जाणलें, आणि अहंकाराचा केलेला कुरूठा (घरटा) मोडून अंतःकरणपूर्वक कर्में करून जे मला भजतात, ते वर्तनांत जरी देही दिसले, तथापि ते देही नसून माझ्या ठायीं असतात, आणि मी त्यांच्या हृदयांत समग्र असतों.

ऐसे भजतोनि प्रेमभावें । जया शरीरहि पाठीं नपवे ।
तेणें भलतया व्हावें । जातीचिया ॥ ४१५ ॥
आणि आचार पाहातां सुभटा । तो दुष्कृताचा
कीर सेलवांटा । परि जीवित वेंचिलें चोहटां ।
भक्तीचिया कीं ॥ ४१६ ॥
अगा अंतीचिया मती । साचपण पुढिले
गती । म्हणोनि जीवित जेणें भक्ती ।
दिधलें शेखीं ॥ ४१७ ॥
तो आधीं जरी दुराचारी । तरी सर्वोत्त-
मचि अवधारीं । जैसा बुडाला महापूरीं ।
न मरत निघाला ॥ ४१८ ॥
तयाचें जीवित ऐलथडिये आलें । म्हणोनि
बुडालेपण नेवीं वायां गेलें । तेवीं नुरेचि
पाप केलें । शेवटलिये भक्ती ॥ ४१९ ॥
यालागीं दुष्कृती जरी जाहाला । तरी

अशा प्रकारच्या एकनिष्ठ प्रेमभावानें जे माझें भजन करतात, ते कोणत्याहि जातीचे असोत, त्यांना म्हणून पुनर्जन्म नाहीं. आणि अर्जुना, अशा भक्तांचा आचार पहातां, तो शेलक्या दुष्कृतीचा जरी असला, तथापि त्यांनीं भक्तीरूप चवाट्यावर आपले जीवित–अर्थात् प्राण खर्ची घातलेले असतात.–आणि ते कां म्हणून विचारशील, तर–अंतकाळच्या मती (इच्छे) प्रमाणें खरोखर पुन्हां जन्म प्राप्त होतो, म्हणून–तो चुकिवण्या करतां–ते आपला प्राण भक्तीस देतात–अर्थात अर्पण करतात. अर्जुना, भक्त पूर्वीचे जरी दुराचारी असले, तथापि महापुरांत बुडालेला मनुष्य जसा न मरतां बाहेर यावा, तसे ते भक्तीच्या योगानें संसारसागरांत न बुडतां सर्वोत्तमच बनतात. महापुरांत बुडालेला मनुष्य ऐलथडावर आला असता, त्याचें बुडालेंपण जसें जातें, तसें शेवटल्या चौथ्या भक्तींत मागील पाप रहात नाहीं. कारण तो पूर्वीचा दुष्कृती असला, तथापि (चौथ्या भक्तींत) अनुताप तीर्थांत नाहल्यावर तो सर्वभावेंकरून

अनुतापतीर्थीं न्हाला । ह्मणूनि मज-
आंत आला । सर्वभावें ॥ ४२० ॥
मग माझी नित्यशांती । तया दशा तेचि कांती ।
किंबहुना जिती । माझेनि जीवें ॥ ४२९ ॥
तैसें भक्तिहीनाचें जिणें । जो स्वप्नींहि
परि सुकृत नेणें । तेणें संसारदुःखासी
भाणें । वोगरिलें ॥ ४४० ॥

माझ्यांत येतो.–आणि तो अशा प्रकारें माझ्यांत आला, ह्मणजे माझी निरंतर शांती, हीच त्याची कांती बनते; अर्जुना फार काय सांगावें–माझा जीवच तो असतो, अथवा माझ्या जिवानें तो जिवंत असतो.– आणि याच्या उलट भक्तीहीनाचें जिणें पहाशील, तर त्याच्या स्वप्नांतहि सुकृताची गोष्ट येत नसल्या कारणानें तो आपल्यापुढें संसार दुःखाचीं ताटेंच वाढून ठेवतो.

अगा नांवें घेतां वोखटीं । जे आघवेया
अधमाचिये शेवटीं । तिये पापयोनीही
किरीटी । जन्मले जे ॥ ४४३ ॥
ते पापयोनि मूढ । मूर्ख जैसे कां दगड ।
परि माझ्याठायीं दृढ । सर्वभावें ॥ ४४४ ॥
जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टी
भोगी माझेंचि रूप । जयांचे मनसंक-
ल्प । माझाचि वाहे ॥ ४४५ ॥
माझिया कीर्तीवीण । जयांचें रितें नाहीं श्रवण ।
जयां सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥ ४४६ ॥
जयांचें ज्ञान विषो नेणे । जाणीव मज
एकातेंचि जाणे । जयां ऐसे लाभे तरी
जिणें । येऱ्हवीं मरण ॥ ४४७ ॥
ऐसा आघवाचि परी पांडवा । जिहीं आ-
पुलिया सर्वभावा । जियावयालागीं वो-
लावा । मीचि केला ॥ ४४८ ॥
ते पापयोनीही होतुकां । ते श्रुताधीत-
ही न होतु कां । परि मजसीं तुकितां
तुका । तुटी नाहीं ॥ ४४९ ॥
भक्तीचेनि आथिलेपणें । दैत्यीं देवां
उणें । माझें नृसिंहत्व लेणें । ज-
याचिये महिमें ॥ ४५० ॥
द गा मजसाठीं । घेतां बहुतें
रीटी । कां जें मियां द्यावें तें
गोष्टी । तयाचिया जोडे ॥ ४५१ ॥
त्यकुळ साचोकारें । परि इंद्रही
काहे उपरें । ह्मणोनि भक्ती गा
य सरे । जाति अप्रमाण ॥ ४५२ ॥

अर्जुना, नांवें घेतांना ओखटीं–अर्थात् कंटाळवाणी आणि अधमाच्याहि शेवटल्या ह्मणजे अत्यंत निकृष्ट योनींतहि ज्यांचा जन्म झाला असेल, आणि ते पापयोनी मूर्ख दगडासारखे जरी असले, तथापि सर्व भावानें–अर्थात् एकनिष्ठेनें माझ्याठायीं असतील, आणि ज्यांच्या वाचेंत सदासर्वकाळ माझा नामोच्चार असून जे दृष्टीनें माझेंच रूप पहातील, आणि ज्यांच्या मनाचा संकल्पहि माझ्याचविषयीं झाला असेल, आणि माझ्या कीर्तीवांचून–अर्थात् गुणानुवाद श्रवणावांचून ज्यांचे कान रिते (कोरडे) राहिले नाहींत, आणि माझी सेवा हेंच ज्यांनीं आपल्या सर्वांगाचें भूषण केलें असून, ज्यांच्या ज्ञानाला इंद्रियविषय कसें ते माहित नाहींत, परंतु ज्यांचें ज्ञान मला एकट्यालाच जाणतें,–अशी ज्यांना स्थिती लाभते, तेच अर्जुना, जिवंत-येरवीं ही ज्यांना स्थिती नाहीं त्यांचें जिणें–अर्थात जिवंत असणें मरणासारखेंच आहे, असो. आतां सांगितल्या प्रकारानें ज्यांनीं जगण्या करतांच सर्व भावानें मीच अथवा मला आपला जिव्हाळा करून ठेवला आहे, ते मग पापयोनींत जन्म पावलेले असोत, अथवा शास्त्रमूढ असोत, तथापि मजबरोबर त्यांची तुलना करतांना ते एक रेसभरहि तुटत नाहींत. अर्जुना, भक्तीच्या सामर्थ्यानें दैत्यांनीं देवांन उणें आणलें–अर्थात् कमीपणा आणला, आणि माझा नृसिंह अवतार तरी दैत्यांच्या भक्तीमहिमे करतांच आहे. अर्जुना, प्रल्हादानें मजसाठीं बहुत संकटें भोगलीं, ह्मणून मी जें कांहीं त्याला देईं, तें त्याला ताबडतोब प्राप्त होई. अर्जुना, प्रल्हादाचें खरोखर दैत्यकुळ असतां, त्याच्या कुलाची इंद्रहि आपल्या मोठेपणानें बरोबरी करूं शकत नाहीं. ह्मणून माझ्या प्राप्तीकरतां जाती अप्रमाण असून भक्तीच एक प्रमाण आहे. ह्मणून

ह्मणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि
गा अकारण । एथ अर्जुना माझेपण ।
सार्थक एक ॥ ४५६ ॥
तेंचि भलतेणें भावें । मन मज आंतु येतें होआ-
वें । आलें तरी आघवें । मागील वावो ॥ ४५७॥

जन्मास आल्याचें खरें सार्थक माझेपण मिळिवण्यांत आहे. बाकी कूळ–जाती–वर्ण हे सगळेंच अकारण आहे.–ह्मणजे एकनिष्ठ भक्ती नसेल, तर नुस्त्या कूळ–जाती–वर्णानें माझेपण प्राप्त होणार नाहीं असा सांगण्याचा भावार्थ.–ह्मणून अर्जुना, कोणत्याहि भावानें कां होईना, माझ्या स्वरूपाच्या ठिकाणीं मन आणलें असतां, मागील सर्व व्यर्थ होतें–अर्थात् मी होण्याच्या पूर्वीच्या दुष्कृतींचा नाश होतो.

तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्य-
जादि इया । जाती तंवचि वेगळालिया ।
जंव न पवती मातें ॥ ४६० ॥
पाहें पां वल्लभाचेनि व्याजें । तिया व्र-
जांगनाचि निजें । मज मिनलिया काय
माझें । स्वरूप नव्हती ॥ ४६१ ॥
नातरी भयाचेनि भिसें । माते न पविजे-
चि काय कंसें । कीं अखंड वैरवशें ।
चैद्यादिकीं ॥ ४६२ ॥
अगा सोयरेपणेंचि पांडवा । माझें सायु-
ज्य यादवां । कीं ममत्वें वसुदेवा– ।
दिकां सकळां ॥ ४६७ ॥
नारदा-ध्रुवा-अक्रूरा । शुकाहन सनत्कुमारा ।
इयां भक्ती मी धनुर्धरा । प्राप्य जैसा ॥४६८॥
तैसाचि गोपिकांसी कामें । तया कंसा
भयसंभ्रमें । येरां घातकां मनोधर्में ।
शिशुपालादिकां ॥ ४६९ ॥
अगा मी एकलाणीचें खागें । मज येवों
ये भलतेनि मार्गें । भक्ती कां विषय विरागें ।
अथवा वैरें ॥ ४७० ॥
ह्मणोनि पार्था पाहीं । प्रवेशावया माझ्याठायीं ।
उपायांची नाहीं । वाणी येथ ॥ ४७१ ॥
आणि भलतिया जाति जन्मावें । मग भजिजे
कां विरोधावें । परि भक्ता कां वैरिया व्हावें ।
माझियाचि ॥ ४७२ ॥
गा कवणें एके बोलें । माझेपण जन्ही

अर्जुना, भक्त जोंपर्यंत मला पावले नाहींत, तोंपर्यंतच क्षत्रीय-वैश्य-स्त्रिया अथवा अंत्यजादि जातीचा प्रकार (भेद) त्यांच्यांत असतो.–भक्त झाल्यावर जातीभेद नाहीं–हेंच पाहिनास, कीं व्रजांगनांनीं, गोपस्त्रियांत वल्लभाचेनि व्याजें–ह्मणजे, केवळ अंतःकरणपूर्वक प्रीतीनें मजकडे धांव घेतली, येवढ्यानेंच त्यां माझ्या स्वरूपाला मिळाल्या नाहींत का? अथवा भयानें कंस, आणि अखंड वैरानें चैद्यादिक (शिशुपालादिक) माझ्या स्वरूपाला पोचले नाहींत का ? अथवा सोयरेपणाच्या नात्यानें यादवांस व ममत्वानें वसुदेवादि आदिकरून सगळ्यांना माझें सायुज्य प्राप्त झालें नाहीं का ?–शंका नको–नारद–ध्रुव–अक्रूर शुक-सनत्कुमार आदिकरून भक्त मंडळीस भक्तीनें जसा मी प्राप्त आहें, त्याच प्रमाणें कामेंकरून गोपिकांना, भयसंभ्रमानें कंसाला, घातक मनोधर्मानें अर्थात् वैरेंकरून शिशुपालादिकांना मी प्राप्त झालों. कारण सर्वांचें निर्वाणीचें स्थान मी आहें, ह्मणून भक्ती– विषय-वैराग्य–अथवा वैर अशा हव्या त्या मार्गानें कोणीहि मजकडे येवोत, मी त्यांना प्राप्त व्हायचाच. ह्मणून अर्जुना, माझ्या ठायीं प्रवेश करण्याकरितां उपायांची वाण-अर्थात् कमतरता ह्मणून नाहींच. याजकरतां कोणत्याहि जातींत जन्म झाला, तरी भक्ती करावी, अथवा वैर साधावें, परंतु ती भक्ती माझी करावी अथवा माझ्याशीं वैर धरावें. कारण कोणत्याहि प्रकारानें–अर्थात भक्तीनें अथवा वैरानें कां होईना, पण त्यांत माझेपण झालें–अर्थात् माझा भक्त अथवा माझा वैरी असें झालें–ह्मणजे खरोखर मी होणें–अर्थात् मतस्वरूपीं मिळण्याचें त्याच्या हातांत येतें. ह्मणून अर्जुना पापयोनींतहि जन्म होवो, अथवा वैश्य, शूद्र

जाहालें । तरी मी होणें आलें । हाता
निरुतें ॥ ४७३ ॥
यालागीं पापयोनीही अर्जुना । कां वै-
श्य शूद्र अंगना । मातें भजतां सदना ।
माझिया येती ॥ ४७४ ॥
तूं मन हें मीचि करीं । माझिया भजनीं प्रेम
भरीं । सर्वत्र नमस्कारीं । मज एकातें ॥ ९१७॥
। अनुसंधानें देख । संकल्प जा-
ळणें निःशेष । मद्याजी चोख । या-
चि नांव ॥ ९१८ ॥
ऐसा मिया आथिला होसी । तेथ माझि-
याचि स्वरूपा पावसी । हें अंतःकरणींचें
तुजपासीं । बोलिजत असें ॥ ९१९ ॥

अथवा स्त्री या योनींतहि जन्म होवो, त्यांनीं मा भजन केलें असतां, ते माझ्या सदनाला-अर्थात् स्वरू पाला प्राप्त होतात.

ह्मणून अर्जुना, तूं माझ्याठायीं मन आणून प्रेमा माझें भजन कर, आणि सर्वत्र मीच एक समजून नमस्कार कर. अर्जुना, अशा माझ्या अनुसंधानें जे सर्व संकल्प जाळून टाकतात, त्यांनाच मद्याजी (माझें यजन करणारे) असें चोख नांव आहे; अथवा त्यांना-च मद्याजी असें चोख नांव मिळतें; अथवा माझ्या अनुसंधानानें अर्जुना तू सर्व संकल्प जाळून टाकशील, तर तुला मद्याजी असे चोख नांव मिळेल. ह्मणून अशा प्रकारानें-ह्मणजे मद्याजी होऊन-तू जेव्हां संपन्न हो-शील, त्याच वेळीं अर्जुना,तूं माझ्या स्वरूपाला पावशी-ल-हें अंतःकरणीचें गूज तुला सांगून ठेवतों.

श्रीकृष्णार्पणमस्तु.